## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८३
निर्णय दिनांक : १६.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शितोळे उमेश मनोहर,<br>रा.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, बीड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, बीड | | |

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, शहागीर बाबा विद्या मंदिर, कोल्हारवाडी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवूनही अद्यापपावेतो कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व या अर्जाद्वारे त्यांनी आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शैक्षणिक वर्ष १९९९ - २००० ते दि. १२.१२.२००८ पर्यंतच्या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"(१) श्री. शहागीर बाबा विदया मंदीर कोल्हारवाडी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शै. वर्ष १९९९.२००० ते आजपर्यत देण्यात आलेल्या वैयक्तीक मान्यतेच्या व मान्यता देता वेळेस कार्यालयीन फाईल वर टाकण्यात आलेल्या टिप्पण्यांच्या सत्यप्रती.

(२) दि. २४ ऑक्टोबर २००८ नंतर जिल्हयातील विविध संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्यास वैयक्तीक मान्यतेच्या व मान्यता देताना कार्यालयीन फाईलवर टाकण्यात आलेल्या टिप्पण्यांच्या सत्यप्रती.

(३) श्री. शहागीर बाबा विदया मंदीर कोल्हारवाडी शाळेचा शै. वर्ष २००७-२००८ च्या वार्षिक तपासणी अहवालाची सत्यप्रत."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०२.२००९ रोजी सुनावणी घेतली तथापि त्यावर त्यांचा कोणताही आदेश न देता फक्त अपिलार्थी व संबंधित संस्थेचे मुख्याध्यापक आणि शिक्षणाधिकारी यांच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त पारित केले. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती अद्यापही प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष,मुख्याध्यापक, शहागीर बाबा विद्यामंदिर,कोल्हारवाडी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांनी ज्या संस्थेविषयी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे माहिती मागितली आहे, त्या संस्थेसंदर्भात कोणतेही अभिलेखे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे उपलब्ध नाहीत, असे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी बरीचशी माहिती संबंधित संस्थेने अपिलार्थीस पुरविली आहे.

उपरोक्त प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १२.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असावयास हवी. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र. १ व ३ च्या संदर्भातील माहिती संबंधित संस्थेमार्फत पुरविली आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात प्राप्त झालेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील काही टिपण्यांचा समावेश नसल्याचे अपिलार्थीने आयोगास अवगत केले. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती प्राप्त होणे बाकी असल्याचे आयोगास आढळून येत आहे. ही माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे तसेच अपिलार्थीच्या मुद्दा क्र. १ च्या संदर्भात अपिलार्थीस आता द्यावयाच्या राहिलेल्या टिपणीच्या प्रती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये उपलब्ध करुन द्याव्यात. जर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी माहितीचा काही भाग अथवा

संपूर्ण माहितीशी संबंधित अभिलेखे त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाल्याचे त्यांना आढळून आले तर त्यांनी हे अभिलेखे जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यावर होती, त्यांच्यावर यथास्थिती फौजदारी वा प्रशासकीय स्वरुपाची कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ मधील उर्वरित व मुद्दा क्र.२ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शितोळे उमेश मनोहर,द्वारा., राम नारायण खेडकर, स्नेहनगर,सुभाष रोड,बीड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८४
निर्णय दिनांक : १६.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय वन अधिकारी, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय वनसंरक्षक, औरंगाबाद | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य लेखापाल,
सहायक वनसंरक्षक
कार्यालय,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०१.०१.१९८४ ते दि. ३१.१२.२००८ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य म्हणून नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्यांचे पूर्ण पत्ते, स्वातंत्र्यसैनिकांनी सादर केलेल्या नामनिर्देशनपत्राची नक्कल आणि त्यांच्या सेवापुस्तिकेच्या पहिल्या पानाची फोटोप्रत, अशी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या

माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे, याचा उल्लेख (जसे टपालाद्वारे/ व्यक्तिश:)अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये केला नव्हता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, 'निरंक' असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०३.२००९ रोजी त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची अपिलार्थीने न विचारलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देता तो विनाकार्यवाही त्यांच्याकडे तसाच ठेवून दिला. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २०.०२.२००९ व नंतर २३.०३.२००९ रोजी माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

उपरोक्त प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे त्रयस्थ पक्षाशी संबंधित काही माहिती मागविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप हे सार्वजनिक असल्यामुळे ही माहिती विहित मुदतीत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नव्हता. त्यांनी त्याप्रमाणे अपिलार्थीस दि. २०.०२.२००९ रोजी तसा प्रतिसादही दिला परंतु हा प्रतिसाद, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम

अपील केल्यानंतर व चुकीचा असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यास वाटल्यावरुन त्यांनी दि. २३.०३.२००९ रोजी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील तीन कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेतील त्यांच्या नेमणूकीसंदर्भातील माहितीचा भाग ज्या पृष्ठावर आहे, त्या पृष्ठाची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस पाठविली. वास्तविकतः अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य म्हणून नोकरीला लागलेल्या सेवापुस्तिकेच्या पहिल्या पृष्ठाची फोटोप्रत आणि स्वातंत्र्यसैनिकाने नामनिर्देशन केलेल्या पत्राची प्रत आणि कर्मचाऱ्यांचे नावे व पत्ते, अशी माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीमध्ये स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य म्हणून नोकरीला लागलेल्या कर्मचाऱ्यांचे नाव व पत्ते यांचा उल्लेख नाही. (श्री. एस.यु.काळे व श्री. दामोधर चव्हाण वगळता) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाची प्रत या वेळेस पुरविल्याचे आयोगास आढळून आले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर उपस्थित राहताना त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी, श्री. दामोधर चव्हाण व श्री. संजय काळे या स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य म्हणून नोकरीला लागलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाची झेरॉक्स प्रत सोबत आणलेली आहे. या प्रतीमध्ये कर्मचाऱ्यांचे नाव व त्यांचे पत्ते याचा उल्लेख आहे. तथापि अद्यापही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधित स्वातंत्र्यसैनिकांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे पाल्य नोकरीस लावताना त्यांनी सादर केलेल्या नामनिर्देशनपत्राची प्रत त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नसल्यामुळे अपिलार्थीस दिलेल्या नाहीत, असे आयोगास अवगत केले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी त्रयस्थ पक्षाने नोकरीस लागताना त्यांच्याकडे स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य म्हणून सादर केलेल्या त्यांच्या नावाच्या नामनिर्देशनपत्राचा शोध त्यांच्या कार्यालयात घेऊन अपिलार्थीस उर्वरित संपूर्ण माहिती त्यांच्या सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठांच्या व नामनिर्देशनपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत डाकेने विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०२.२००९ रोजी प्रथम प्रतिसाद देताना, 'निरंक' अशी माहिती कळविली. तदनंतर दि. २३.०३.२००९ रोजी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठ सोडून इतर पृष्ठावरील माहिती अपिलार्थीस पुरविली, जी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितली नव्हती. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस खोटी व तदनंतर दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र असल्याचे सिध्द होत आहे. सबब मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी आणि त्यांच्या कार्यालयातील आस्थापना विभागातील संबंधित कर्मचारी, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार 'माहिती अधिकारी' असे समजावे, अशी तरतुद आहे, या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **औरंगाबाद** | **( वि. बा. बोरगे )** |
| **दिनांक : १६-०४-२०१०** | **राज्य माहिती आयुक्त** |
| | **खंडपीठ औरंगाबाद** |

प्रत,

१. श्री. पांडुरंग निवृत्तीराव मोने,रा.अंबाली निवास, समतानगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल,सहायक वनसंरक्षक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८५
निर्णय दिनांक : १६.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सय्यद हसनैन,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून दि. १८.०३.२०१० रोजी लिहिलेले एक पत्र आयोगास सादर करण्यात आले. या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. २३.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून याबाबतीत त्यांची कोणतीही तक्रार आता राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात यावे, अशी आयोगास त्यांनी या अर्जामध्ये अंतिमतः विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्याची विनंती केली असल्यामुळे त्यांची ही विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र. ९८५/०९, दि. ०६.०५.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सय्यद हसनैन, रा.इकरा स्कुल परिसर, न्यु एम.टी.कॉलनी, कटकटगेट,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८६
निर्णय दिनांक : १६.०४.२०१०

१. श्री. शिवाजी मधुकर देशमुख, : अपिलार्थी
रा.झरी, ता.जि.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,परभणी

२. जन अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., प्र.विभाग
(सर्कल),परभणी

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी लि., प्र.विभाग,परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मौ. झरी,ता.जि.परभणी येथील ३३ के.व्ही. उपकेंद्रांतर्गत येणारी गावे व मौ. झरी गाव येथे सिंगल फेज योजना का चालू झाली नाही, यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> " ३३ के.व्ही. उपकेंद्र अर्तंगत येणारी गावे व झरी गाव येथे सिंगल फेज योजनेचे काम दोन ते अडीच वर्षे पुर्वी झालेले आहे. पंरतू अध्याप पर्यंत १) सिंगल फेज योजना का चालू झाली नाही, २) अंदाजे न देता तपसीलासहीत योजनेवरती किती खर्च झाला. ३)

कोणत्या एजन्सीतर्फे काम करण्यात आले. ४) कामाचा कालावधी किती होता. ५) सिंगल फेज योजना कामाचे देयक एजन्सीला किती दिले (बिल) योजनाचा करण्यासाठी. एजन्सीकडे पाठपुरवा केला का? ६) सिंगल फेज योजना केंव्हा चालू होईल किंवा नाही."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.०३.२००९ रोजी, कंपनीच्या परभणी येथील मंडळ कार्यालयाकडे, प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न झाल्याने व अपेक्षित माहिती न मिळाल्याने,अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व सहायक जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांना सहायक अभियंता यांच्याकडून माहिती पुरविण्यात आली. सहायक अभियंता यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने ते समाधानी नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत देण्यास ते तयार आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीसंदर्भात उपस्थित सहायक जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, त्यांच्यादृष्टीने देखील अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती समाधानकारक नाही.

उपरोक्त प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, संमिश्र स्वरुपाची आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील - ३३ के.व्ही. उपकेंद्र योजनेचे काम दोन ते अडीच वर्ष पूर्ण झाले असतानाही अद्यापपावेतो सिंगल फेज योजना का चालू झ ााली नाही, मुद्दा क्र. ५ मधील, '---------------योजनेचे काम करण्यासाठी एजन्सीकडे पाठपुरावा केला का?' व मुद्दा क्र. ६ मधील, '---------------सिंगल फेज योजने केव्हा होईल किंवा नाही? ही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण व खुलासा अपेक्षित करणारी असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येमध्ये अशाप्रकारच्या माहितीचा समावेश होऊ शकत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ द्वारे, 'सिंगल फेज योजना केव्हा चालू होईल किंवा नाही', अशी भविष्यकाळातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षात ताब्यात असलेली वर्तमानकाळातील माहितीच अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागता येईल. भविष्यकाळातील आणि कोणतेही नियोजन नसलेली अमूर्त स्वरुपातील माहिती, अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, 'या योजनेसाठी झालेला एकूण खर्च, काम करणाऱ्या एजन्सीचे नाव, काम करण्यासाठी लागणारा कालावधी किती होता व संबंधित एजन्सीला सिंगल फेज योजना कामाचे देयक कधी दिले', या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर कबूल केले आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती नाकारली आहे, असे म्हणणे जास्त योग्य राहील. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्पष्टपणे दिली नाही. अपिलार्थीने सिंगल फेज योजनेचे काम करणाऱ्या एजन्सीचे नाव विचारले असता, त्यासंदर्भातील माहिती या कार्यालयास उपलब्ध नाही, अशी माहिती सहायक अभियंत्याने अपिलार्थीस दिली आहे आणि बहुतेक सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस नकारात्मक स्वरुपात पुरवून ती एकप्रकारे अपिलार्थीस देण्याचे नाकारले आहे. अपिलार्थीस ज्या सहायक अभियंत्याने ही माहिती दिली आहे, ते सहायक अभियंते हे या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी यांचे सहायक आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सहायक अधिकारी/कर्मचाऱ्यास देखील 'माहिती अधिकारी' समजावे अशी तरतुद आहे. ही तरतुद पाहता, या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी, श्री. बेग व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक, सहायक अभियंता या दोघांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २,३,४ व ५ या मुद्यांवर वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई यांना संबंधित माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, परभणी, श्री. बेग व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक, सहायक अभियंता या दोघांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी मधुकर देशमुख,देशमुख गल्ली, मु.पो.झरी, ता.जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित प्र.विभाग,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्रकाशगड,बांद्रा (पूर्व), मुंबई-५१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११०
निर्णय दिनांक : १६.०४.२०१०

१. श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, : अपिलार्थी
रा.गडगा, ता.नायगाव (खै.),जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय, नायगाव खै.,
जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, नायगाव खै.,
जि.नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार
(महसूल),नायगाव (खै.)
जि. नांदेड.
त्रयस्थ पक्ष : श्री. चव्हाण,पेशकार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे तहसील कार्यालयातील पुरवठा विभागातील त्रयस्थ पक्ष, श्री. चव्हाण, पेशकार यांची जात कोणती, अशी माहिती पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेऊन निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित होती. त्रयस्थ पक्षाने ती त्यांना दि. १२.०४.२०१० रोजी सादर केल्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या शिपायामार्फत दि. १३.०४.२०१० रोजी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य हस्तांतरित केली आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीस दि. १३.०४.२०१० रोजी माहिती मिळाल्याची त्यांची पोचसही आयोगास दाखविली.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही.

उपरोक्त प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष, श्री. चव्हाण यांच्या जातीची माहिती जन माहिती अधिकारी यांना मागितली होती. त्रयस्थ पक्षाकडून ही माहिती जन माहिती अधिकाऱ्याकडे दि. १२.०४.२०१० रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ती माहिती अपिलार्थीस दि. १३.०४.२०१० रोजी विनामूल्य हस्तांतरित केली आहे, हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक असलेली त्रयस्थ पक्षाशी संबंधित

माहिती त्यांना आता उपलब्ध झाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले,रा.गडगा, ता.नायगाव(खै.),जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),नायगाव (खै.),जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव(खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७८

निर्णय दिनांक १६-०४-२०१०

१ श्री. विठ्ठलदास गंगादास शहा, : अपिलार्थी

रा. बी. ३०१, दिशा करिश्मा, अंगुरीबाग, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.), जिल्हा परिषद,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : वरिष्ठ लेखाधिकारी (वित्त विभाग), जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : मुख्य लेखा व वित्त अधिकारी (वित्त विभाग), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अपेक्षित माहिती संबंधितांच्यांकडून प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "त्यांचे वेतन रोखल्याबाबत" या विषयावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून एकूण ९ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उद्देशून केला होता. त्यांनी तो दिनांक ०४-११-२००८ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडे पाठविला. मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याने तो दिनांक १४-११-२००८ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद यांच्याकडे वर्ग केला. या प्रकरणाच्या या सर्व संबंधितांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जास विहित मुदतीत कधीही प्रतिसाद दिला नाही व परिणामी अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न होऊ शकल्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०२-२००९ रोजी निर्णय देऊन मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्याने, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सामान्य प्रशासन विभागाकडून व गट विकास अधिकाऱ्याकडून घेऊन ती अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना आदेशित केले. परंतु अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती अपिलार्थीस त्यापूर्वीच पुरविली होती. गट विकास अधिकारी, पंचायत समिती खुलताबाद यांनी दिनांक ०४-०२-२००९ रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) मध्ये बसत नसल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. या सर्व प्रकारे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील सर्व मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वसाधारण स्वरुपाची व जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित असणारी माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ........................... वेतन/भत्त्याची रक्कम स्थगित / वसुली कार्यवाही करता येते का?, वसूल केलेली रक्कम परत अदा करण्यास जबाबदार असलेल्या विरुध्द कार्यवाही करण्यात येते का? व कधी कार्यवाही करणार, सेवानिवृत्ती-नंतर नो-डयूज प्रमाणपत्र दिल्यावर खाते चौकशी करता येते का? शासन नियमावलीची माहिती ...... .................... कर्मचारी निर्दोष / दोष मुक्त झाल्याने प्रस्ताव सादर करणारे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर प्रशासनास कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत काय ? असल्यास काय व कधी कार्यवाही करणार, चौकशी मधील आरोप सिध्द करण्याची जबाबदारी कोणाची व तो सिध्द करता न आल्याने शासनाचा अमूल्य वेळ व पैसा निष्कारण खर्च करण्यास जबाबदार कोण? याची चौकशी करण्यात येईल काय व त्यांच्या विरुध्द कार्यवाही करण्यात येईल काय?, ना खाते प्रमाणपत्र देण्यास जबाबदार असलेल्याविरुध्द काय व कोणती कार्यवाही करण्यात येईल, आयुक्त कार्यालयात किती कर्मचारी किती वेळा हजर होते त्या सर्वांची गरज / आवश्यकता होती काय?, जे कर्मचारी चौकशी संबंध नसताना हजर होते त्यांचेवर झालेल्या खर्चाची वसूली

करण्यात येईल काय आणि माहे डिसेंबर २००४ च्या प्रवास भत्त्याची रक्कम केव्हा व कधी अदा करण्यात येणार तसेच आजपर्यंत ती अदा न करण्याबाबत संबंधित दोषीवर काय कार्यवाही करणार व कधी करणार, - अशी माहिती मागविली होती. या सर्व माहितीचे स्वरुप पाहिले असता, यातील प्रत्येक मुद्यास अपिलार्थीने कोणताही संदर्भ दिला नाही. त्यांना निश्चितपणे कोणत्या कालावधीची माहिती आवश्यक आहे, याचा उल्लेख त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची, संदर्भहीन आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे खुलासे अपेक्षित करणारी अशा स्वरुपाची असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाचे कारण अथवा त्याचे स्पष्टीकरण त्यांनी माहिती म्हणून अर्जदारास देण्याच्या प्रक्रियेचा समावेश नाही. या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देण्यासंदर्भात कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रस्तावित व भविष्यकाळातील माहितीची मागणी केली आहे. ही माहिती अर्थातच जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्तमानकाळात उपलब्ध असणार नाही. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली प्रस्तावित व भविष्यकाळातील माहिती देखिल त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. एवढे जरी असले तरी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या, 'सेवानिवृत्तीनंतर नो - डयुज प्रमाणपत्र दिल्यावर खाते चौकशी करता येते का? शासन नियमावलीची माहिती मिळावी,' या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, कोणताही शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याची खातेनिहाय चौकशी करण्यासंदर्भात शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी त्यांच्या स्तरावर परिपत्रके जारी केली आहेत. या परिपत्रकांच्या प्रती, या प्रकरणी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन

विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ मधील सेवानिवृत्तीनंतर शासकीय कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यासंदर्भात सर्व प्रचलित शासन निर्णयाच्या / जिल्हा परिषदेच्या प्रशासनाच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विठ्ठलदास गंगादास शहा, बी. ३०१, दिशा करिश्मा, अंगुरीबाग, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी (वित्त विभाग), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी (वित्त विभाग), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९७९

निर्णय दिनांक १६-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रमाकांत धोंडोपंत बन्सोड,<br>मु. पो. भक्ती-निवास, जय योगेश्वर हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १७, शिवाजीनगर, पंचायत समितीच्या पाठीमागे, गंगापूर, जि. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या मूळ अर्जातील ४ मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक १ व ३ ची माहिती त्यांना, त्यांनी प्रथम अपील केल्यानंतर प्राप्त झाली व मुद्दा क्रमांक २ व ४ ची माहिती त्यांना आजतागायत न मिळाल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर (विशेष प्रकल्प) व सार्वजनिक बांधकाम उप विभाग, गंगापूर यांच्या कार्यालयातर्फे विविध योजनेअंतर्गत केल्या गेलेल्या कामाच्या संदर्भात दिनांक ०१-०१-२००४ ते १५-११-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या चार मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली. परंतु मुद्दा क्रमांक २ व ४ शी संबंधित माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने, त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे गंगापूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभागामार्फत करण्यात आलेल्या कामासंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. त्यापैकी अपिलार्थीस आता संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २- गंगापूर तालुक्यातील संजरपूर ते भालगांव भाग-२ कि.मी. २ ते ४ या रस्त्याचे काम पूर्ण झाले काय, असल्यास ते कोणत्या योजनेतून पूर्ण झाले, अशी माहिती मागविली होती. या मुद्यामधील, '...................... रस्त्याचे काम पूर्ण झाले काय,' या भागावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण ती माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. मात्र हे काम कोणत्या योजनेअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण करण्यात आले या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ द्वारे, सिद्नाथ वाडगाव ते झोडेगाव या रोजगार हमी योजनेअंतर्गत, मयुरेश्वर मजूर सहकारी संस्थाने केलेल्या कामाच्या मोजमापपुस्तिका क्रमांक १५८१०१ ते १५८२०० च्या झेरॉक्स प्रती, बी- १२०८ च्या झेरॉक्स व या कामाच्या बिलाच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या. ही संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर दिली असल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही. त्यामुळे अद्यापपावेतो उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ४ शी संबंधित माहिती त्यांना दिली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन, उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ४ मधील वर स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील.

अपिलार्थी यांना उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी लागेल. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ४ शी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली, अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमाकांत धोडोंपत बन्सोड, मु. पो. भक्ती-निवास, जय योगेश्वर हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १७, शिवाजीनगर, पंचायत समितीच्या पाठीमागे, गंगापूर, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८०

निर्णय दिनांक १६-०४-२०१०

१ श्री. वामन भावजी पाटील, : अपिलार्थी
रा. हरदेवजी कृपा हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. जी.- ६, फ्लॅट नं. १६, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य, नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअन्वये मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या वेतन निश्चितीबाबत दिनांक १२-०१-२००३ ते २३-१२-२००३ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीमध्ये - दिनांक १२-०१-२००३ रोजी वेतन निश्चिती कॅम्पमध्ये सादर केलेल्या त्यांच्या वेतन निश्चितीच्या संपूर्ण कागदपत्राच्या सत्यप्रती, दिनांक २३-१२-२००३ रोजी वेतन निश्चिती तक्त्याच्या सत्यप्रती व वेतन निश्चिती कॅम्पमध्ये वेतन निश्चित केलेल्या प्राध्यापकांची यादी - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, नुतन मराठा महाविद्यालय श्री. ए. यु. वाघ यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ५,०००/- इतके त्यांच्या महाविद्यालयात जमा करण्याचे सूचित केले व सदरचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर १ महिन्यात अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांना आश्वासित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे न करता, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०१-१२-२००८ रोजी कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या प्रकरणी कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली नसल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस तसे त्यांच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. अशाप्रकारे सर्व संबंधितांच्याकडून नकारात्मक प्रतिसाद प्राप्त झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे, असा आयोगासमोर युक्तिवाद करुन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ हे वेतन निश्चितीचे नियमीतपणे कॅम्प घेत

असल्यामुळे त्यांनी या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्याकडे केले असल्याचे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद त्यांच्या प्रतिनिधीमार्फत आयोगास सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार केलेले प्रथम अपील हे योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाकडे केले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आणि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास प्राचार्य, नुतन मराठा महाविद्यालय यांनी दिलेला चुकीचा प्रतिसाद आणि अपिलार्थीने ज्या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे त्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता, अपिलार्थीने आयोगाकडे केलेला द्वितीय अपील अर्ज हा त्यांचा माहिती अधिकार अधिनियमातील कलम १८ प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे केलेला तक्रार अर्ज आहे, असे समजून पुढील निर्णय देण्यात येत आहे.

कलम १८ मधील उपकलम (ग) व (घ) मधील तरतुदीअन्वये, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव यांनी दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या व त्यावरील दिनांक ०१-१२-२००८ रोजीच्या अपील अर्जावर संबंधितांनी दिलेला प्रतिसाद हा पूर्णतः चुकीचा आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविणे त्यांना भाग आहे. तथापि प्राचार्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे कळविलेले शुल्क अवाजवी आहे, असे आयोगाचे मत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जर अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असेल व ती अर्जदारास देय असेल तर अशी माहिती अर्जदारास देण्याकरिता शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११-१०-२००५ रोजीच्या क्र. आर.टी.आय २००५/सि.आर. ३१५/०५/५ या अधिसूचनेप्रमाणे अर्जदारास प्रतिपृष्ठ रु. २ या दराने त्यांना शुल्क आकारणे गरजेचे असताना, या प्रकरणी प्राचार्यांनी अपिलार्थीकडून ५,०००/- रु. इतक्या रकमेची मागणी केली आहे, या मागणीमध्ये "मेहनताना" बाबीचा देखिल समावेश आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्याकरिता आकरण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये "मेहनताना" व इतर अनुषंगीक खर्चाचा त्यामध्ये समावेश, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणास करता येणार नाही. कोणत्याही परिस्थितीत त्यांना अर्जदारास जर अर्जदाराने मागणी केलेली माहिती ए ४ अथवा ए ३ च्या आकारमानामध्ये द्यावयाची असेल तर ती त्यांना प्रतिपृष्ठ रु. २ या दराने द्यावी लागेल. अपिलार्थीस अशाप्रकारे अवाजवी शुल्क कोणत्याही तपशीलाविना कळवून संबंधित प्राचार्यांनी अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीचा भंग केला असल्यामुळे, त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या कालावधीमध्ये जर अपिलार्थीस प्राचार्यांकडून माहिती प्राप्त झाली नाही तर ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र राहतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. प्राचार्य, नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. वामन भावजी पाटील, हरदेवजी कृपा हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. जी.- ६, फ्लॅट नं. १६, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, नुतन मराठा महाविद्यालय, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलगुरु, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८१

निर्णय दिनांक १६-०४-२०१०

१ श्री. प्रमोद तानाजीराव साळुंके, : अपिलार्थी
रा. विकासनगर, एम.आय. डी. सी. रोड, उस्मानाबाद, ता.
जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, माहे डिसेंबर २००८ अखेर उस्मानाबाद जिल्हा परिषदेमध्ये, जवाहर रोजगार योजना (२०५९) अंतर्गत शाखा / कनिष्ठ अभियंता या तांत्रिक संवर्गाची पदे मंजूर आहेत किंवा नाहीत ? आणि असल्यास, शाखा / कनिष्ठ अभियंता या तांत्रिक संवर्गाची किती पदे मंजूर आहेत. त्यापैकी किती भरलेली व किती रिक्त आहेत व तसेच कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांची नावनिहाय यादी, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते दिनांक ११-०२-२००९ व १२-०२-२००९ रोजी ही माहिती कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेण्यासाठी दोन वेळा उपस्थित राहिले. परंतु त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांच्याकडे या संदर्भात दिनांक २४-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ८ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०३-२००९ व तदनंतर दिनांक ०९-०९-२००९ रोजी आवश्यक ती माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पुरविली आहे. या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविल्यापृष्ठ्यर्थचा पुरावा आयोगाकडे सादर केला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने  केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे केली होती.  जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यानंतर अपिलार्थी हे स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ११-०२-२००९ व १२-०२-२००९ रोजी माहिती घेण्यासाठी व्यक्तिशः कार्यालयीन वेळेत उपस्थित राहिले व त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली.  यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही व अशा प्रकरणी त्यांचे असलेले उत्तरदायित्व अपिलार्थीने व्यवस्थितपणे पार पाडून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे.  जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने  केलेल्या युक्तिवादाप्रमाणे, आयोगाने त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीची पाहणी केली असता, त्यांनी अपिलार्थीस पाठविलेली कथित माहिती ही सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे  सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे.  तथापि अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही दिनांकाचा उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती व्यक्तिशः हस्तांतरित करणे गरजेचे असताना देखिल जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस  अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे व विनादिनांकाच्या पत्राने अपिलार्थीस माहिती पाठविली आहे.  ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेली अनियमितता आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांद्वारे माहिती

मागितली आहे. त्यातील मुद्दा क्रमांक १ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, 'कनिष्ठ अभियंता या तांत्रिक संवर्गाची पदे मंजूर आहेत किंवा नाहीत?' अशा स्वरुपाची माहिती मागितली आहे. अशा स्वरुपाची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) च्या तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे आणि "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीत समाविष्ट न होऊ शकणारी असल्यामुळे, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. परंतु त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, देय होत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत, व्यक्तिशः पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व नंतर पुरविलेल्या कथित माहितीवर दिनांकाचा उल्लेख न केल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत, व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रमोद तानाजीराव साळुंके, विकासनगर, एम.आय. डी. सी. रोड, उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८२

निर्णय दिनांक १६-०४-२०१०

१ श्री. शेख सादेख शेख वाहेद, : अपिलार्थी

रा. फुले नगर, न्यु मोंढा, गौसीया मस्जीदजवळ, केज,

ता. केज, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,

परभणी

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,

परभणी

त्रयस्थ पक्ष : कामेल उर्दू प्राथमिक शाळा, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी माहिती न देता त्यांना विनाकारण माहितीपासून वंचित ठेवून कर्तव्यात कसूर केल्यामुळे व माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीचा भंग केल्यामुळे या अधिकाऱ्याना दंडीत करुन अपिलार्थीस विनाशुल्क माहिती तात्काळ देण्याची व्यवस्था करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष कामेल उर्दू इंटरनॅशनल सोसायटी, परभणी संचलित कामेल उर्दू प्राथमिक शाळा, परभणी या शाळेच्या स्थापनेपासून ते दिनांक २२-११-२००८ या कालावधीतील संस्थेने किंवा शाळेने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल केलेल्या कर्मचाऱ्यांच्या व रुजू आदेशाच्या वर्षनिहाय सत्यप्रती व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत दिल्या गेलेल्या शाळेच्या कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक संच मान्यतेच्या सत्यप्रती, अशी माहिती शिघ्र डाकेने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे त्यांचा द्वितीय अपील अर्ज, माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अर्ज यांच्या झेरॉक्स प्रती सादर केल्या आहेत. त्यांनी मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे माहितीसाठीचा प्रथम अर्ज व त्यावरील अपील अर्ज

पोस्टाने पाठविले असल्याचा पोस्टाचा पुरावा अथवा व्यक्तिशः त्या कार्यालयात त्यांचा अर्ज सादर केला असल्याची त्या कार्यालयाची पोच पावती अथवा कार्यालयाच्या लिपीकाची सही व कार्यालयाचा शिक्का या दोनही  अर्जाच्या प्रतींवर आयोगास आढळून येत नाही. अथवा या संदर्भात तोंडी युक्तिवाद करण्यासाठी ते आज आयोगासमोर उपस्थित नाहीत त्यामुळे मुळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अर्ज संबंधितांना प्राप्त झाला आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही.  अशाप्रकारे आवश्यक त्या सबळ पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख सादेख शेख वाहेद, फुले नगर, न्यु मोंढा, गौसीया मस्जीदजवळ, केज, ता. केज, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९८७

निर्णय दिनांक १६-०४-२०१०

१ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, : अपिलार्थी
रा. गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना कुठल्याच प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाअंतर्गत संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेच्या २० टक्के व ३० टक्के कामाची, सन २००४-०५ व २००६ या कालावधीतील नायगांव तालुक्यातील मंजूर झालेल्या कामांची संख्या, पूर्ण झालेल्या कामांची संख्या, ज्यांच्या नावाने बिले निघाली त्यांची नावे, कामांचे अंदाजपत्रक व मोजमाप पुस्तिकाच्या प्रती आणि कामाची गावनिहाय यादी, अशी माहिती शीघ्र टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०२-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दिनांक १५-०२-२००९ पर्यंत माहिती देण्याचे सूचित केले, तथापि या नंतरच्या कालावधीतही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती अद्यापपावेतो उपलब्ध झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. तथापि आयोगाने अपिलार्थीस पुरविलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अवलोकनार्थ मागितली असता, ती माहिती जन माहिती अधिकारी आयोगास सादर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील ' सर्व कामांचा तपशील ' हा मुद्दा वगळता, उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ' सर्व कामांचा तपशील ' या मुद्दयाव्दारे, अपिलार्थीस नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, याचा कोणासही बोध होणे शक्य नाही. अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्दयावरील ही माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ' सर्व कामांचा तपशील ' या मुद्दयावरील माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून पुरविण्यात आलेली कथित माहिती आयोगास दाखविली असता, या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या कालावधीचा उल्लेख नाही, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस कशी पाठविली या संदर्भातील कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. त्यांनी आयोगास फक्त अपिलार्थी यांच्या नावाने अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविलेल्या पोस्टाची पावती दाखविली, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच यासंदर्भातील माहिती दिली होती किंवा कसे याचा बोध होत नाही आणि याही उपर या माहितीमध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील, कामाची गावनिहाय यादी व मोजमाप पुस्तिकाच्या प्रती आयोगास आढळून आल्या नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती पूर्णतः पुरविली नाही, हा अपिलार्थीचा मुद्दा सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील ' सर्व कामांचा तपशील ' हा मुद्दा वगळता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना देय होत असल्याने, ही माहिती जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व मुद्देनिहाय पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री. अब्दुल समद व श्री. एस. एम. वारकड, पंचायत समिती कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व मुद्देनिहाय पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री. अब्दुल समद व श्री. एस. एम. वारकड, पंचायत समिती कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, रा. गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११११

निर्णय दिनांक १६-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. साळवे विठ्ठल किशनराव,<br>गौतमनगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी,<br>तालुका पाथरी, जिल्हा परभणी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी,<br>तालुका पाथरी, जिल्हा परभणी | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक १७-११-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याने, त्यांनी मागणी केलेली माहिती नक्कल स्वरुपात दाखवून जास्तीची फी आकारुन माहिती देण्याचे टाळले असल्यामुळे आणि त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय

अधिकारी यांनी सुनावणी न घेतल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, तलाठी, मंडळ अधिकारी यांच्या तपासणीनुसार वगळण्यात आलेल्या संजय गांधी, इंदिरा गांधी व वृध्द भूमिहीन शेतमजूर योजनेच्या लाभार्थ्यांची यादी, वगळण्यात आलेल्या कारणासह, लाभार्थी तपासणीसाठी शासनाने काढलेले नियम, अटी इत्यादींची माहिती व लाभार्थी वगळण्यात आल्यापासून काढण्यात आलेले अनुदान वेगवेगळ्या तारखेसह, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २,४८४ इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील कळविला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळवून, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी योग्य तो प्रतिसाद दिल्याचे त्यामध्ये नमूद करुन अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी हा निर्णय देण्यापूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व तत्कालीन, सध्याचे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः दाखविली. त्यांनी अपिलार्थीस दाखविलेल्या माहितीमध्ये लाभार्थ्यांच्या यादीचा समावेश होता, परंतु अपिलार्थीचे ही माहिती पाहून समाधान झाले नाही व त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न करता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, इंदिरा गांधी, भूमिहीन शेतमजूर योजना, या योजनांचे स्वरुप स्थायी नसून या योजना निरंतर चालणा-या आहेत. तसेच या योजनांची अंमलबजावणी करताना लाभार्थी तपासणीसाठी शासनाने अद्यापपावेतो एकदाच आदेश जारी केले आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अस्थायी स्वरुपाची असून, अपिलार्थीने ज्या योजनांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे, त्या माहितीचे स्वरुप कालपरत्वे बदलत असते. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या कालावधीशी संबंधित माहिती अपेक्षित आहे, त्या कालावधीचा उल्लेख त्यांनी योग्य प्रकारे केला नसून, ' माहितीशी संबंधित कालावधी ' या मुद्दयासमोर अपिलार्थीने ' ३० दिवसाचे आत ' असे आपले अभिप्राय नमूद केले आहेत. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून तीस दिवसाच्या आत माहिती अपेक्षित असावी, असे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीने या

प्रकरणी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, त्याचा उल्लेख केला नसल्यामुळे, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे. अशा प्रकारची मोघम स्वरुपाची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही, परिणामी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील कोणतीही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादामध्ये, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात, या योजनेच्या अंमलबजावणीकरिता लाभार्थी तपासणीसाठी शासनाने एक आदेश काढला असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले आहे. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित, या आदेशाची प्रत अपिलार्थीस सशुल्क देण्यास हरकत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ' व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर, या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्यासाठी, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करणे हे त्यांचे उत्तरदायित्व असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उतरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले नाही, एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २,४८४ इतके अपिलार्थीस कळविले आहे. या शुल्काचा भरणा करण्याची तयारी अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही दर्शविली नाही, ही वस्तुस्थिती पाहता व विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जावर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या विशिष्ट कालावधीचा उल्लेख केला नसल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलाशी

संबंधित त्यांचा मूळ अर्जच अवैध ठरत असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्या-योग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. साळवे विठ्ठल किशनराव, गौतमनगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६०

निर्णय दिनांक १६-०४-२०१०

१ श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे, : अपिलार्थी
जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी,
ऑ. नं. २७, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) सर्व्हेक्षण उपविभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जालना जिल्ह्यामध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत दिनांक ०१-०४-२००७ ते ३१-०३-२००८ या कालावधीमध्ये किती पतमर्यादा प्राप्त झाली व ती कशी वितरीत करण्यात आली त्याची गावनिहाय, कामनिहाय, मजूरनिहाय, शाखानिहाय व संपूर्ण ग्रामीण योजने अंतर्गत झालेल्या कामांची माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४२,७३५ इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न करता, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, जालना यांना उद्देशून दिनांक १७-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. त्यांनी ही माहिती अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०६-०४-२०१० रोजीच्या पत्राव्दारे तयार असल्याचे

कळविले असतानाही, अपिलार्थी ही माहिती व्यक्तिशः घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत, त्यामुळे अद्यापपावेतो अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनसार, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ' व्यक्तिशः ' माहितीची मागणी केल्यानंतर, या अर्जाच्या संदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व हे अर्जदाराचे असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे हे उत्तरदायित्व योग्य प्रकारे पार पाडले आहे किंवा कसे हे आवश्यक त्या सबळ पुराव्याअभावी आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याशी या माहितीच्या संदर्भात जर काही पत्रव्यवहार केला असेल तर, अशा पत्रव्यवहाराच्या प्रती देखील जोडलेल्या नाहीत किंवा या मुद्दयावर त्यांचे तोंडी म्हणणे स्पष्ट करण्यासाठी ते आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ' मजूरनिहाय पतमर्यादेचे वाटप ' अशी माहिती मागितली आहे. परंतु वरिष्ठ कार्यालयाकडून कोणत्याही कामासाठी पतमर्यादा वितरीत केली गेल्यानंतर ती कामनिहाय अथवा जास्तीत जास्त शाखा अभियंतानिहाय वितरीत केली जाते. मजूरनिहाय पतमर्यादा वितरीत करण्याची पध्दत नसल्यामुळे, मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जन माहिती अधिका-याने मजूरनिहाय वितरीत केलेली पतमर्यादा या मुद्दयावरील मागणी केलेली माहिती, ती अस्तित्वातच नसल्यामुळे त्यांना देय होणार नाही. उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी तयार आहे व ती अपिलार्थीने मागणी केलेली माहितीशी सुसंगत आहे, या माहितीची पृष्ठे एकूण ४२ इतकी असून, माहितीच्या पृष्ठाचे आकारमान ए/४ इतक्या कागदाच्या आकारमानाच्या दुप्पट आहे, त्यामुळे अपिलार्थीस ही ४२ पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असल्यास, त्यांनी १६८ रुपये इतक्या रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी

यांच्याकडे केल्यास, त्यांना ती  जन माहिती अधिकारी यांच्याकडून लागलीच प्राप्त होऊ शकेल, असे येथे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.  या प्रकरणाशी संबंधित वरील वस्तुस्थिती पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर टाळलेले नाही, उलट अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविल्याप्रमाणे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरण्यासाठी या घटनाक्रमामध्ये कधीही स्वतः होऊन तयारी दर्शविली नाही, जी त्यांनी अधिनियमातील कलम ७ (५) प्रमाणे दाखवावयास हवी होती.  अशा प्रकारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बद्रिनारायण रामेश्वर उपरे, जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे, म्हाडा कॉलनी, ऑ. नं. २७, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) सर्व्हेक्षण उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६१

निर्णय दिनांक १६-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. प्रल्हाद चितांबरराव पाटील,<br>कल्पेश किराणा स्टोअर्सच्या मागे, समतानगर, उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-०८-२००८ रोजीच्या दिलेल्या अर्जावर, जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली याबाबतची माहिती त्यांना आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिका-याने मुख्याध्यापिकेकडे अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित करण्याचे काहीही कारण नव्हते, माहिती पुरविताना मुख्याध्यापिका यांनी अपिलार्थीस, व्यथित झाल्यास त्यांनी कोणाकडे व कधी अपील करावे याची माहिती दिली नाही आणि मुख्याध्यापिकेने त्यांना दिनांक १६-१२-२००८ रोजी माहिती

पुरविली असल्याने, उशिरा माहिती पुरविल्याबद्दल संबंधितांना दंड करावा अथवा त्यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांच्याकडे, त्यांनी दिनांक ०२-०८-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज देऊन, त्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली पूरग्रस्तांची मदत रक्कम मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक कन्या शाळा, उस्मानाबाद यांनी जिल्हाधिका-याकडे जमा केली नाही. सदर प्रकरणी चौकशी होऊन गुन्हेगारावर योग्य ती कार्यवाही व्हावी अशी विनंती संदर्भिय अर्जाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती व या अर्जावर जिल्हाधिकारी कार्यालयाने काय कार्यवाही केली, याचा तपशील अपिलार्थीने जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश मागितला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक कन्या शाळा, उस्मानाबाद यांना पाठविली असून अपिलार्थीच्या तक्रारीवर त्यांनी केलेली कार्यवाही अपिलार्थीस कळविण्याचे सूचित केले व यानंतर दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात, त्यांच्या मूळ अर्जाची प्रत मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक कन्या शाळा, उस्मानाबाद यांच्याकडे पाठविल्याचे अवगत केले व अपिलार्थीच्या दिनांक ०२-०८-२००८ रोजीच्या तक्रारीवर त्यांनी केलेली कार्यवाही अपिलार्थीस कळविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१२-२००८ रोजी निर्णय देऊन, संबंधित

मुख्याध्यापिका, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक कन्या शाळा, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस दिनांक १६-१२-२००८ रोजी माहिती दिल्याने, अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी प्रथमत: दिनांक १८-१०-२००८ रोजी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविली असून, संबंधित मुख्याध्यापिकेने देखील त्यांच्या दिनांक १६-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मूळात त्यांच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०८-२००८ रोजीच्या दिलेल्या तक्रार अर्जावर जिल्हाधिकारी कार्यालयाने केलेली कार्यवाही, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीचा दिनांक ०२-०८-२००८ रोजीचा तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर, सदरचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेस त्यांच्या अभिप्रायार्थ पाठविला, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविली, याचाच अर्थ असा की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत व विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये या विषयावर जिल्हाधिकारी,

उस्मानाबाद यांना उद्देशून तक्रार केली होती, त्या तक्रारीचा ऊहापोह करणे आणि त्या तक्रारीवर निर्णय घेणे, या बाबी आणि अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, या दोनही बाबी पूर्णतः भिन्न असून या दोनही बाबींचा एकमेकांशी काहीही संबंध नाही आणि याहीउपर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेने अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये अपिलार्थीच्या वेतनातून कपात केलेल्या रकमेसंदर्भात आवश्यक तो तपशील अपिलार्थीस कळविला आहे हे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील सर्व मुद्दयांचे निराकरण झाले असल्याने व विशेषतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती विहित मुदतीत आणि विनामूल्य कळविली असल्यामुळे, अपिलार्थीच्या अपिलावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही, परिणामी अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १६-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रल्हाद चितांबरराव पाटील, कल्पेश किराणा स्टोअर्सच्या मागे, समतानगर, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६३
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पतंगे सुनिल भानुदास,<br>रा.वडाळा बहिरोबा, ता.नेवासा, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>पुरवठा अधिकारी,तहसील कार्यालय, नेवासा,<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, नेवासा,जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "त्यांच्या नावावर (कार्ड क्र.५७) एक गॅस टाकी असून ३६५०१६ या क्रमांकाचे रेशन कॉर्ड आहे त्यावर त्यांना किती रॉकेल मिळते", अशी माहिती मागितली होती. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,नेवासा

यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अर्ज अनुक्रमे पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय,नेवासा व तहसीलदार, नेवासा यांना प्राप्त झाला आहे. या अर्जांवर कोणतीही कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली नाही.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पतंगे सुनिल भानुदास,रा.वडाळा बहिरोबा, ता.नेवासा, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,नेवासा, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६४

निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

१. श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे, रा.लोणी खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा पुरवठा अधिकारी,तहसील कार्यालय, राहाता, जि.अहमदनगर : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, राहाता,जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.११.२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी तहसील कचेरी राहाता मधील पुरवठा अधिकारी यांच्याकडे दि.२४.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये काही माहिती मागितली होती. तथापि संबंधित अधिकाऱ्यास ते माहिती अधिकारी आहेत, हे माहिती नाही. या प्रकरणी संबंधित माहिती अधिकाऱ्याने व अपिलीय अधिकारी यांनी आपली जबाबदारी दुसऱ्यांच्या खांद्यावर टाकून अंग झटकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यावर दंड व शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी व त्यांनी मागितलेली माहिती त्यांना सात दिवसात विनामूल्य देण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील गॅस एजन्सीच्या संदर्भात एकूण ११ मुद्यांवर काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्याचे त्रयस्थ पक्ष,प्रवरा गॅस एजन्सी,बाभळेश्वर,ता.राहाता यांना सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि यापूर्वीच संबंधित गॅस एजन्सीने तहसीलदार,राहाता यांच्याकडे त्यांच्याकडे असलेल्या एक सिलेंडरधारक, दोन सिलेंडरधारक अशी एकूण ग्राहकांची संख्या कळविली. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व ही माहिती विलंबाने प्राप्त झाल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.१०.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.११.२००९ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी,तहसील कार्यालय,राहाता यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित माहिती अधिकाऱ्यास पाच दिवसांच्या आत पाठविण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन  अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने  जन माहिती अधिकारी यांच्याकडे खाजगी गॅस एजन्सीच्या संदर्भात ११ मुद्यावर त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे माहिती मागणी केली होती. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ११ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती ही, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे, या मुद्यावरील माहिती, माहिती जन

माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देणे भाग आहे. उर्वरित सर्व मुद्यावरील ही माहिती संबंधित गॅस एजन्सीला ज्या यंत्रणेमार्फत गॅसचा पुरवठा होतो, त्या यंत्रणेकडे उपलब्ध असणे स्वाभाविक आहे. जीवनावश्यक वस्तुच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील 'घरगुती वापरासाठीचा गॅस' हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असल्यामुळे व राज्य शासनाच्या जीवनावश्यक वस्तुंच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेसंदर्भातील विषयाचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० वगळता इतर कोणत्याही मुद्यावर, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही तहसीलदार यांच्याकडे प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे असणे संभवत नाही. खाजगी गॅसवर तहसीलदार व जिल्हा पातळीवरील पुरवठा अधिकाऱ्याकडे फक्त सुरक्षिततेच्यासंदर्भात नियंत्रण असते व इतर पातळीवरील नियंत्रण हे केंद्र शासनाच्या अंगीकृत व्यवसाय असणाऱ्या तेल कंपन्यांकडून केले जाते. हे पाहता,अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ११ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १० वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी भारत पेट्रोलियम/हिंदुस्तान पेट्रोलियम या केंद्र शासनाच्या गॅस पुरवठा करणाऱ्या प्राधिकरणाकडे त्यांना आवश्यक असलेल्या त्रयस्थ पक्ष, बाभळेश्वर गॅस एजन्सीच्या संदर्भात त्यांनी माहिती मागावी व या प्रकरणाशी संबंधित मुद्दा क्र. १० वगळता उर्वरित १० मुद्यांवर केंद्रीय माहिती आयोगाशी पुढे, त्यांना आवश्यकता वाटल्यास, संपर्क साधावा.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० शी संबंधित माहिती ही तहसील कार्यालय, राहाता यांच्या कार्यालयातील पुरवठा अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्राशी संबंधित असल्यामुळे त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १० शी संबंधित माहिती ही तहसील कार्यालय,राहाता येथील पुरवठा अधिकारी यांच्या कार्यक्षेत्राशी सरळ संबंधित असूनही त्यांनी ही

माहिती अपिलार्थीस न पुरविल्याबद्दल व ती अपिलार्थीपासून दडवून ठेवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस महसूल आयुक्त, नाशिक यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१० शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. विभागीय आयुक्त, नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे,रा.लोणी खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,राहाता, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, राहाता,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त,नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६५
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

१. श्री. अंतोन शामसुंदर गायकवाड, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : जिल्हा प्रकल्प अधिकारी, नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर

त्रयस्थ पक्षः श्री. पोपट बारस्कर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्ज फेटाळला असल्यामुळे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दिनांक ३०.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष तथा नगरसेवक श्री. पोपट बारस्कर वॉर्ड क्र.११ यांनी मनपाच्या हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी विनापरवानगी बांधलेल्या त्यांच्या बांधकामाविरुध्द जन माहिती

अधिकारी यांच्याकडे दि. १८.०६.२००९ रोजी केलेल्या अर्जावर, त्यांनी कोणती कार्यवाही केली, अशी माहिती पोस्टाद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांनी त्यांच्या दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने संदर्भित केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात महानगरपालिकेतर्फे कारवाई होणे अपेक्षित असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस त्यांचा दि. १८.०६.२००९ रोजीचा संदर्भित तक्रार अर्ज आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांच्याकडे मूळ प्रतीत, त्यांच्याकडील पत्र क्र. नपा/कार्या-६अ/७८७/२००९ अन्वये दि. २९.०६.२००९ रोजी पाठविला असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व ही माहिती विलंबाने प्राप्त झाल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ११.०८.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), अहमदनगर यांच्याकडे या विषयासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०८.२००९ रोजीच्या निर्णयाद्वारे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे, जिल्हाधिकारी कार्यालयाकडे त्यांनी त्रयस्थ पक्ष श्री. पोपट बारस्कर यांनी अनधिकृतपणे बांधलेल्या बांधकामाच्याविरुध्द केलेल्या तक्रार अर्जावर जिल्हाधिकारी कार्यालयाने काय कार्यवाही केली, अशी माहिती त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मागितली होती. अपिलार्थीस अपेक्षित

असलेली कार्यवाही आयुक्त,महानगरपालिका यांनी करावयाची असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाने अपिलार्थींचा तक्रार अर्ज महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे पाठविला व अपिलार्थीस या वस्तुस्थितीची कल्पना त्यांच्या दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेली माहिती सुसंगत असल्याचे दिसून येते. महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे हटविण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावयाची नसून ती आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांनीच करावयाची आहे. आज रोजी अपिलार्थी, त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत. परंतु त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावरुन त्यांना त्रयस्थ पक्षाने केलेल्या कथित अतिक्रमित बांधकामावर कार्यवाही होणे अपेक्षित असल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्त, महानगरपालिका यांच्या कार्यालयातील माहिती अधिकाऱ्याकडे, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून त्यांना प्राप्त झालेल्या दि. २९.०६.२००९ पत्रावर महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली, अशी माहिती मागितली तर, त्यांना त्यांच्या संदर्भित दि. १८.०६.२००९ रोजीच्या तक्रार अर्जासंदर्भातील पुढील घडामोडी ज्ञात होऊ शकतील.

अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जापुरते या प्रकरणाकडे पहावयाचे झाल्यास, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंतोन शामसुंदर गायकवाड,रा.नागापूर बेथेल चर्चच्या पाठीमागे,अहमदनगर ता.जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा प्रकल्प अधिकारी,नगरपालिका शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल),जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६६
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

१. श्री. आबिद हुसैन, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसील कार्यालय, श्रीरामपूर, जि. अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, श्रीरामपूर, जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी अपूर्ण माहिती देण्यात आली व मुदत संपल्यानंतरही त्यांना देण्यात आलेल्या माहितीस्तव फी आकारण्यात आली, त्यांना देण्यात आलेल्या माहितीने समाधान न झाल्याने पहिले अपील कुठे करावयाचे हे त्यांना सांगितले नाही त्यामुळे त्यांनी दि. ०२.०९.२००९ रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु दि.३१.१०.२००९ पर्यंत त्यांनीही अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्यामुळे व सुनावणीस न बोलाविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्रीरामपूर तहसील कार्यालयाअंतर्गत वाळूच्या गाडयांवर दि. ०१.०६.२००९ ते ३०.०६.२००९ या कालावधीमध्ये झालेल्या दंडात्मक कारवाईची माहिती एकूण पाच मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - आर.टी.ओ. व तहसील कार्यालयाने केलेली दंड आकारणी ज्या शासनपरिपत्रकाच्या आधारे केली आहे त्या शासन परिपत्रकाची छायाप्रत, तहसीलदाराने आर.टी.ओ.च्या ताब्यात कोणत्या आदेशान्वये वाळूच्या गाडया दिल्या त्या आदेशाची प्रत, एकाच वेळी वाळूच्या गाडयांवर आर.टी.ओ.ची व तहसीलची दंडात्मक कारवाई झालेल्या गाडयांचे - तहसील पंचनामा, पकडण्यात आलेल्या गाडयांचे महसूल परवाने (रॉयल्टी), आर.टी.ओ.च्या दंड भरलेल्या पावत्या, तहसीलच्या दंड भरलेल्या पावत्या, यांच्या छायाप्रती, फक्त तहसीलच्या दंड आकारण्यात आलेल्या गाडयांचे पंचनामा रिपोर्ट, तहसीलचे दंड भरलेले पावती व महसूल परवाना (रॉयल्टी पावती) यांची छायांकित प्रत, तहसीलचा जो दंड आकारण्यात येतो, तो ब्रासवर की टनवर आकारण्यात येतो,यासंबंधीची माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०२.०९.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जिल्हा खनिकर्म अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी आयोगास सदर प्रकरण तहसील कार्यालय, श्रीरामपूर यांच्याकडे वर्ग केले असल्याचे व या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी, तहसीलदार, श्रीरामपूर असल्याचे व या प्रकरणाशी संबंधित त्यांना काहीही माहिती नाही, असे आयोगास अवगत केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देय होत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार देणे भाग आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांना त्यांच्याशी संपर्क साधून हस्तगत करणे अपेक्षित आहे. तथापि या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे निश्चितपणे कोणती कार्यवाही झाली, हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तथापि अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, श्रीरामपूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०४.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील.त्यामुळे अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती

अधिकारी,तहसील कार्यालय,श्रीरामपूर यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,श्रीरामपूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. आबिद हुसैन,५१७३, पंचपीर चावडी, अहमदनगर,ता.जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, श्रीरामपूर,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, श्रीरामपूर,जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हा खनिकर्म अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६७
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख सलमान अहमद ऊर्फ सलमान आर्मेचरवाला, रा.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख, महानगरपालिका, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), महानगरपालिका, अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख, अहमदनगर महानगरपालिका यांच्याकडून आजपर्यंत कोणतीही माहिती मिळालेली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८.०५.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर, महानगरपालिका आयुक्त,श्री. कल्याण केळकर व उपायुक्त श्री. अच्युत हंगे यांचे सेवापुस्तक पाहण्याचे आणि गरज पडल्यास सेवापुस्तिकेतील नोंदीच्या साक्षांकित प्रती प्राप्त होण्यासंदर्भात व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०६.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे उपआयुक्त श्री. अच्युतराव हंगे यांची सेवापुस्तिका पाहण्यासाठी उपलब्ध असल्याचे व आयुक्त श्री. कल्याण केळकर यांची सेवापुस्तिका विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांच्याकडे असल्यामुळे अपिलार्थीस श्री. अच्युतराव हंगे यांच्या सेवापुस्तिकेची पाहणी करण्यासाठी दि. १९.०६.२००९ रोजी दुपारी ०४.०० ची वेळ निश्चित करुन दिली. यानंतर अपिलार्थी दि. १९.०६.२००९ रोजी उपआयुक्त श्री. अच्युत हंगे यांची सेवापुस्तिका पाहून गेले, तथापि अपिलार्थीस आयुक्त, श्री. कल्याण केळकर यांच्या सेवापुस्तिकेची प्रत तपासणीसाठी उपलब्ध न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १३.०७.२००९ रोजी या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), महानगरपालिका, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व आयुक्त श्री. कल्याण केळकर यांच्या सेवापुस्तिकेबाबत विभागीय आयुक्त यांच्याशी पत्रव्यवहार करुन सदर सेवापुस्तिका उपलब्ध झाल्यानंतर ती अर्जदारास तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या निर्णयानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर महानगरपालिका आयुक्त,श्री. कल्याण केळकर यांची सेवापुस्तिका त्यांच्याकडे प्राप्त झाली होती. तथापि या सेवापुस्तिकेची पाहणी करण्यासाठी अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर कधीही उपस्थित न राहिल्याने अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्रयस्थ

पक्ष - श्री. कल्याण केळकर,तत्कालीन आयुक्त, महानगरपालिका,अहमदनगर यांनी आता शासकीय सेवेतून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली असल्यामुळे श्री. कल्याण केळकर यांची सेवापुस्तिका त्यांच्या सेवानिवृत्तीवेतनाच्या निश्चितीसंदर्भात सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तत्कालीन महानगरपालिका आयुक्त,श्री. कल्याण केळकर व उपआयुक्त श्री. अच्युत हंगे यांच्या सेवापुस्तिका तपासणीची मागणी केली होती. यापैकी उपायुक्त,श्री. अच्युत हंगे यांच्या सेवापुस्तिकेची तपासणी त्यांनी दि. १९.०६.२००९ रोजी करुन तशी पोच जन माहिती अधिकारी यांना दिली आहे. तथापि श्री. कल्याण केळकर यांची सेवापुस्तिका आता महानगरपालिका कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने त्यांना ती सेवापुस्तिका अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन देता येत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेली संपूर्ण माहिती जरी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील असली तरी, ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे त्रयस्थ पक्षास, ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी कोणताही प्रत्यवाय असू नये. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी तत्कालीन महानगरपालिका आयुक्त,श्री.कल्याण केळकर यांची मूळ सेवापुस्तिकेची प्रत सचिव, नगर विकास विभाग यांच्याशी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत पत्रव्यवहार करुन प्रथमतः त्यांच्या ताब्यात घ्यावी व एका विशिष्ट कालावधीसाठी, पूर्वनियोजित वेळी, कार्यालयीन कामकाजाच्या कालावधीमध्ये अपिलार्थीस ती तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीने या सेवापुस्तिकेची तपासणी केल्यानंतर, त्यांनी ती प्रत त्यांना ज्या स्वरुपात नगर विकास विभागाकडून प्राप्त झाली, त्या स्वरुपात नगर विकास विभागास परत पाठवावी.

जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, श्री. कल्याण केळकर यांची सेवापुस्तिका त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी याबाबतची कल्पना अपिलार्थीस योग्य वेळी लेखी पत्राद्वारे द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन महानगरपालिका आयुक्त,श्री.कल्याण केळकर यांची मूळ सेवापुस्तिकेची प्रत सचिव, नगर विकास विभाग यांच्याशी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत पत्रव्यवहार करुन प्रथमतः त्यांच्या ताब्यात घ्यावी व एका विशिष्ट कालावधीसाठी पूर्वनियोजित वेळी कार्यालयीन कामकाजाच्या कालावधीमध्ये अपिलार्थीस ती तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख सलमान अहमद ऊर्फ सलमान आर्मेचरवाला,रा.फलटण पोलीस चौकी मागे, आहेर गवळीवाडा, कोठला रोड,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा आस्थापना प्रमुख,महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.),महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६८
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. गोविंद निळकंठ जोशी,<br>रा.कोपरगाव, जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य लिपीक,<br>नगरपालिका शिक्षण मंडळ,कोपरगाव,<br>जि. अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रशासन अधिकारी,<br>नगरपालिका शिक्षण मंडळ,<br>कोपरगाव,जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी कलम ८-क खाली नामंजूर केले असल्यामुळे आणि पक्षपातीपणे व कोणतेही कारण न देता त्यांचे पहिले अपील फेटाळल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून जन अपिलीय अधिकारी यांच्यावर सेवेतील दोष व शिस्तभंगविषयक योग्य ती कारवाई करण्याची व जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे शास्तीची कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.०७.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, "गीता प्रशाला, कोपरगाव या शाळेने दि. १३.११.२००० रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी कोणता निर्णय घेतला, निर्णय घेतला नसेल तर का घेतला नाही, निर्णय घेणार असाल तर किती दिवसात", अशी माहिती मागविली होती. अपिलार्थीने या अर्जासोबत गीता प्रशाला नावाच्या शाळेने नगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकाऱ्यास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि. १०.११.२००० च्या पत्राची प्रत सोबत जोडली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन हेडमास्तर, गीता प्रशाला, कोपरगाव यांच्या दि. १०.११.२००० (प्राप्त दि.१३.११.२०००)च्या पत्रावर प्रशासन अधिकारी, नगरपालिका,शिक्षण मंडळ कोपरगाव यांनी निर्णय घेतला नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही दिनांकाचा उल्लेख केलेला नाही. तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांच्या कथित प्रथम अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर त्यांची सही देखील नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत आहे. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.०९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय दिला असून अपिलार्थीचे अपील कलम ८(क) नुसार नामंजूर केल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीस हा निर्णय कळविताना जन अपिलीय अधिकारी यांनी शासन परिपत्रक क्र. ममाअ-२००४/प्र.क्र.१३५/०४/०५,दि. १६.१०.२००४ चा उल्लेख केलेला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गीता प्रशाला या शाळेने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १३.११.२००० रोजी दिलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय, निर्णय घेतला नसेल तर का घेतला नाही आणि घेणार असाल तर किती दिवसात, अशी माहिती मागितली होती.अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील गीता प्रशाला या शाळेच्या मुख्याध्यापकाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. १३.११.२००० रोजी पाठविलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नसल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १५.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्यावरील माहितीचे अवलोकन करता, या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण व भविष्यकाळातील माहिती मागविली असल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेली आहे.

> **“ ‘माहिती’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके,आदेश,रोजवहया,संविदा,अहवाल,कागदपत्रे,नमुने,प्रतिमाने(मॉडेल),कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.”**

या व्याख्येचे अवलोकन करता, माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती, ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती

माहिती अर्जदारास देणे अभिप्रेत असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कारणे विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील कृती अथवा निर्णयाचे स्पष्टीकरण अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत नाहीत. जन माहिती अधिकारी यांना, ते भविष्यकाळामध्ये कोणते निर्णय घेणार अथवा गीता प्रशाला या शाळेच्या पत्रावर काय कार्यवाही करणार,(या संदर्भातील त्यांची भूमिका लेखी स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध असणे) अशी भविष्यकाळातील माहिती त्यांना वर्तमानकाळात माहित असणे अथवा ती माहितीच्या वरील परिच्छेदात स्पष्ट केलेल्या व्याख्येप्रमाणे त्यांच्याकडे उपलब्ध असणे हे, या प्रकरणी संभवत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण तीन मुद्यांपैकी, "निर्णय घेतला नसेल तर का घेतला नाही" व "घेणार असाल तर किती दिवसात" या दोनही मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र उर्वरित मुद्यावरील माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १५.०७.२००९ रोजी अपिलार्थीस ती विनामूल्य पुरविली गेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याचे सिध्द होत असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीच्या 'निरंक' दिनांकाच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०९.२००९ रोजी दिलेला निर्णय हा चुकीचा आहे. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी ज्या परिपत्रकाच्या आधारे निर्णय दिला आहे, ते परिपत्रक महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम, २००२ शी संबंधित असावे, असे वाटते. माहिती अधिकार अधिनियम २००२ हा निरसीत झाला असल्यामुळे या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने वेळोवेळी काढलेली परिपत्रके या अधिनियमाबरोबरच रद्द होत असल्यामुळे प्रशासन

अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ,कोपरगाव यांचा या प्रकरणी, अपिलार्थीस दि. ०९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविलेला त्यांचा निर्णय अवैध असल्याचे सिध्द होत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोविंद निळकंठ जोशी,रा.पोलीस स्टेशनसमोर कोपरगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपीक,नगरपालिका शिक्षण मंडळ,कोपरगाव,जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,नगरपालिका शिक्षण मंडळ, कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०६९
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

१. श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे, : अपिलार्थी
रा.कोळपेवाडी, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता,
जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग,
कोपरगाव, जि.अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : उपअभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे
उपविभाग,कोपरगाव, जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व तसेच या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत, कोळपेवाडी, ता. कोपरगाव यांच्या हद्दीतील समाजमंदिर व

प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या जागेबाबत सन १९९० ते २००९ या कालावधीतील काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना उद्देशून केला होता. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तो उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, ल.पा. उपविभाग, कोपरगाव यांच्याकडे पाठविला. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उपअभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग कोपरगाव यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अर्जास दि. ०९.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीचा अर्ज उपअभियंता, जिल्हा परिषद, ल.पा.उपविभाग,कोपरगाव यांच्याकडे पाठविण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. संबंधित जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग, कोपरगाव यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २८.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दहा वर्षांची असल्यामुळे सदर माहिती संकलीत करण्यास तीन महिन्याचा कालावधी लागेल, असे अपिलार्थीस कळवून अपिलार्थीस या माहितीपोटीचे शुल्क रु. १००/- इतके चलनाद्वारे बँकेत भरण्याचे सूचित केले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०७.१०.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग यांनी अपिलार्थीचे अपील या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, ल.पा.उपविभाग, कोपरगाव यांच्याकडे त्यांच्या दि. १२.१०.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठवून अपिलार्थीस तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.१०.२००९ व ०४.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठपुरावा करुनही त्यांना जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे उपविभाग, कोपरगाव यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या एकूण ३ मुद्यांपैकी मुद्दा क्र. ३ द्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी "३ गुंठे जागेवर एकूण बांध किती चौरस फूट असणार याबाबत मंजूर पत्राची माहिती, प्लान,इस्टिमेट"अशी मोघम स्वरुपाची आणि जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली होती. अशाप्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकणार नाही. मात्र त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित २ मुद्यांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे, उपविभाग, कोपरगाव यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ वगळता उर्वरित दोनही मुद्यांवरील माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत विनामूल्य व पोस्टाद्वारे पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ व २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत पोस्टाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १७-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाळासाहेब पोपटराव कोळपे,मु.पो.कोळपेवाडी, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग,कोपरगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे उपविभाग, कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७०
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

१. श्री. घोरपडे आण्णा देवराव, : अपिलार्थी
रा.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
उपप्रादेशिक परिवहन कार्यालय,अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत आणि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर शहरातील रिक्षा नं. एमएच-१६-क्यू ८४५२ परमीट नं. १५० ANR व इतर दस्तऐवजाची दि. ०१.०२.२००५ ते ३१.०७.२००९ या कालावधीशी संबंधित काही

माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -या रिक्षाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडील नोंदणी रजिस्टरवर असलेल्या दस्तऐवजाचा तसेच फॉर्म नं. २०,२१,२२ व परवाना नं. १५० ANR यांच्या छायांकित प्रती, परवाना नं. १५० ANR मध्ये आतापर्यंत झालेल्या चढउतार व रिप्लेसमेंट यांच्या छायांकित प्रती, या परमीटविषयी प्रादेशिक परिवहन कार्यालय,नाशिक यांचेकडून प्राप्त झालेले दस्तावेज- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या दि. ०३.०८.२००९ रोजीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०८.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे रु.६०/- इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. या नंतर दि. २४.०९.२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे परत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची मागणी केली, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता, वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आजही तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. या प्रकरणी केवळ अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे आणि व्यक्तिशः माहिती अर्जाद्वारे मागवूनही त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जासंदर्भातील पुढील घडामोडी ज्ञात करुन घेण्यासाठी अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाशी कधीही व्यक्तिशः संपर्क साधलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी केलेला पत्रव्यवहार हा यु.पी.सी.द्वारे केला असून यासंदर्भात आवश्यक तो पुरावा जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केला.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'व्यक्तिशः' माहितीची मागणी केल्यानंतर त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या संदभात पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याच्या दृष्टीने अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आवश्यक ती माहिती त्यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे हस्तगत करुन घेणे हे अर्जदाराचे संपूर्ण उत्तरदायित्त्व असते.तथापि या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिलेले नाहीत. एवढेच नव्हेतर जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्यानंतर अपिलार्थीने स्वयंस्फुर्तीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची तयारीही या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर दर्शविलेली नाही. आज रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असल्याचे आयोगास अवगत केले व त्याप्रमाणे त्यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती आयोगास दाखविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस देण्यासाठी तयार असलेली माहिती ही, सकृतदर्शनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीच्या मागणीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे.तसेच अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीची आहे. सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेली माहिती, अधिनियमातील

कलम ७(५) च्या तरतुदीनुसार माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले शुल्क त्यांच्याकडे भरुन, तदनंतर कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. घोरपडे आण्णा देवराव,स्वर्णलक्ष्मी रो हौसिंग को-ऑप.घर नं.९, भुषणनगर, केडगाव देवी,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७१
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पानगव्हाणे अविनाश प्रभाकर,<br>रा.माहेगाव देशमुख, ता.कोपरगाव,<br>जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहमदनगर. | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>विभागीय आयुक्त (विकास आस्थापना शाखा),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही आदेश दिला नाही अथवा त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्याकडे विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडून प्राप्त झालेल्या दि. २८.०७.२००९ रोजीच्या पत्राशी संबंधित काही माहिती साध्या टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्या दि. २८.०७.२००९ रोजीच्या पत्रावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, सादर केलेले अभिप्राय व त्यांनी कनिष्ठ कार्यालयास केलेल्या सूचना - या मुद्यांचा समावेश होता. सदर माहिती माहे जुलै २००९ ते ऑगस्ट २००९ या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.१०.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दि. २९.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून तीस दिवसांच्या आत सशुल्क देय होत होती. परंतु अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या कार्यालयाकडून अधिनियमातील तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद दिला गेलेला नाही. अपिलार्थीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे मागणी केलेली माहिती म्हणजे, विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या दि. २८.०७.२००९ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी जुलै, २००९ ते २९ ऑगस्ट, २००९ या कालावधीमध्ये त्या

प्रकरणाशी संबंधित विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयावरील त्यांच्याकडील अभिलेख्यांवर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती, ही होय. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस देय होत असलेली वर स्पष्ट केलेली ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती दोन महिन्याच्या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप साधे व व्याप्ती ही अत्यंत मर्यादित होती. तथापि एवढे असूनही अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद न देण्याचे कारण आयोगास समजू शकत नाही. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एवढी साधीही माहिती न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २०(२) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दि. २९.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत पोस्टाद्वारे विनामूल्य पाठवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. घोरपडे आण्णा देवराव,मु.पो.माहेगाव देशमुख,ता.कोपरगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, विभागीय आयुक्त (विकास आस्थापना शाखा),विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७२
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

१. श्री. भागीनाथ गोरक्षनाथ शिरसाठ, : अपिलार्थी
रा.वरखेड, ता. शेवगाव, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
वसंतराव नाईक वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई.

२. जन अपिलीय अधिकारी,
वसंतराव नाईक वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने आणि त्यांच्या दि. १९.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडे,त्यांच्या कार्यालयास सन २००८ ते दि.२०.०८.२००९ या कालावधीमध्ये शासनाकडून प्राप्त झालेला निधी, प्राप्त निधी कोणत्या योजनेमधून व कशासाठी खर्च झाला, कोणत्या जिल्हयाला किती निधी दिला, निधी दिलेल्या लाभार्थ्यांचे नाव, योजनेचे नाव, मंजूर रक्कम कोणत्या व्यवसायासाठी दिली, तो व्यवसाय, प्रस्ताव तपासणाऱ्या जिल्हा व्यवस्थापकाचे नाव आणि अर्जदाराने कर्ज काढण्यासाठी

सादर केलेल्या कागदपत्राची झेरॉक्स प्रत, अशी माहिती मागितली होती व लाभार्थ्यांची कागदपत्रे या मुद्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर, बीड,सोलापूर या जिल्हयातीलच लाभार्थ्यांशी संबंधित माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.०९.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. एवढेच नव्हेतर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी बऱ्याचशा भागाशी संबंधित माहिती, माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ४(ख) च्या (सात), (अकरा) व (बारा) च्या तरतुदीप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची, अशा स्वरुपाची माहिती आहे. तथापि ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार अशाप्रकारची माहिती ही अर्जदारास, त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत देणे जन माहिती अधिकारी यांचे प्रथम कर्तव्य असल्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई यांना असे सूचित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने

त्यांच्या दि. २०.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. २०.०८.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भागीनाथ गोरक्षनाथ शिरसाठ,रा.वरखेड,पो. हसनापूर, ता. शेवगाव, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी, वसंतराव नाईक वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, वसंतराव नाईक वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७३
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पत्की सुहास विजयराव,<br>रा. संगमनेर, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी,<br>नवजीवन एज्युकेशन सोसायटी,<br>विंचुर गवळी, ता.जि.नाशिक | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी,<br>नवजीवन एज्युकेशन सोसायटी,<br>विंचुर गवळी, ता.जि.नाशिक | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, नवजीवन एज्युकेशन सोसायटी, विंचुर गवळी, ता.जि.नाशिक यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या वेतनासंदर्भात काही माहिती एकूण सात मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी हा सन २००५-२००६ ते २००८ - २००९ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, या संस्थेच्या माहिती अधिकाऱ्याकडून प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२.०८.२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी

यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३०.०६.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी,नवजीवन एज्युकेशन सोसायटी, विंचुर गवळी, ता.जि.नाशिक अथवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलिय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी, नवजीवन एज्युकेशन सोसायटी,विंचुर गवळी, ता.जि.नाशिक यांनी अथवा या प्रकरणी नियुक्ती झालेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २२.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी, नवजीवन एज्युकेशन सोसायटी,विंचुर गवळी, ता.जि. नाशिक यांनी अथवा या प्रकरणाशी संबंधित नियुक्ती झालेले जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२२.०८.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पत्की सुहास विजयराव,ओमकारनाथ मालपाणी लॉ कॉलेज, पुणे - नाशिक हायवे, संगमनेर, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी, नवजीवन एज्युकेशन सोसायटी,विंचुर गवळी, ता.जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, नवजीवन एज्युकेशन सोसायटी,विंचुर गवळी, ता.जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०७४
निर्णय दिनांक : १७.०४.२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. विजयकुमार भंडारी,<br>रा.लोणी खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,<br>इंदापूर, जि.पुणे | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),<br>पुणे | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.११.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. २७.०४.२००९ रोजीच्या अर्जातील माहिती, संबंधित उपअभियंता यांच्याकडून न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना उलटसुलट बोलून त्यांचे प्रथम अपील निकाली काढले. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर अपिलार्थीस माहिती मिळेपर्यंत प्रत्येक दिवसाकरिता रु.२५०/- इतकी शास्ती आकारण्यात येऊन जन अपिलीय अधिकारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७.०४.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इंदापूर यांच्याकडे दि. ०१.०१.२००८ ते ०१.०४.२००९ या कालावधीतील काही माहिती एकूण पाच मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात झालेल्या लहानमोठया कामांची संख्या, उपअभियंत्यांनी आजपर्यंत शासनाला वेळोवेळी सादर केलेली विवरणपत्रे, उपअभियंता हे शासकीय निवासस्थानी राहतात की खाजगी निवासस्थानात या संदर्भात त्यांच्या निवासाचा पुरावा म्हणून भाडेपावती, लाईटबील व गॅस कार्ड, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या शाखा अभियंता यांना नेमून दिलेले काम, त्यापैकी पूर्ण झालेले, अपूर्ण असलेले आणि चालू असलेले काम व जन माहिती अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली येत असलेली सीआर आणि एसआरची झालेली कामे कोणकोणती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०७.२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०९.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेले अभिलेख अपिलार्थीस पडताळणीस उपलब्ध करुन देण्याचे आणि या अभिलेख्यातील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या दस्तऐवजांच्या छायाप्रती अपिलार्थीस सशुल्क देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७.०४.२०१० रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. या अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने, 'उपअभियंत्यांनी शासनास वेळोवेळी सादर केलेल्या विवरणपत्राच्या छायाप्रती', अशास्वरुपाची माहिती मागितली आहे. तथापि उपअभियंता हे शासनाकडे कोणत्या विषयावर विवरणपत्र दाखल करतात व कोणत्या विषयावरील माहिती अपिलार्थीस या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अभिप्रेत आहे, ती त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केली नसल्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित माहिती ही, मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येते व परिणामी ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ द्वारे, 'जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये कार्यरत असलेल्या शाखा अभियंत्यांच्या निवासस्थानाचा पुरावा' या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मूळात देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती"या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णपणे विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अथवा त्यांच्या कृती अथवा निर्णयाबद्दल स्पष्टीकरण व कारणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जादारास त्यांच्या कृतीबद्दलची आणि निर्णयाबद्दलची कारणे/स्पष्टीकरणे देणे अशाप्रकारच्या माहितीच्या देवाणघेवाणीच्या प्रक्रियेचा समावेश नाही. त्यामुळे मुद्दा क्र.३ च्या या उपमुद्यावर अपिलार्थीस

माहिती देय होत नाही. अपिलार्थीच्या या मुद्यातील उर्वरित भागासंदर्भात त्यांनी संबंधित शाखा अभियंता यांच्या वास्तव्याचा पुरावा म्हणून त्यांच्या भाडेपावत्या, लाईट बीले, गॅस कार्ड यांच्या छायांकित प्रती अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती पूर्णतः त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबींशी संबंधित आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात शाखा अभियंत्यांच्या खाजगी निवासस्थानाच्या भाडेपावत्यावरुन त्यांना घरभाडे भत्ता अदा करणे, अशाप्रकारची कार्यपध्दती प्रचलित नाही. लाईट बील, गॅस कार्ड ही माहिती संबंधित त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती आहे. ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची नाही, अशाप्रकारची त्रयस्थ पक्षाशी संबंधित खाजगी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षपणे ताब्यात असणे, हे प्रचलित शासकीय कार्यप्रणालीनुसार मूळात अभिप्रेत नाही. तसेच माहिती अधिकार अधिनियम,२००५ मध्ये अर्जदाराने सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सार्वजनिक माहिती म्हणून उपलब्ध नसताना त्यांच्या कर्मचाऱ्याकडून ती प्राप्त करुन घेऊन नंतर ती पुरावा म्हणून अर्जदारास पुराव्याच्या स्वरुपात देण्याची कोणतीही तरतुद नाही.

तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,४ व ५ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, देय असल्याचे सिध्द होत आहे. या प्रकरणी ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली नाही. जी त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सशुल्क देऊ करणे, हे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार मूलतः अभिप्रेत होते.परंतु जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अशी कृती केलेली नाही. सबब आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,४ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २७.०४.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकाऱ्यास सकारण नाकारण्याची तरतुद देखील या अधिनियमामध्ये आहे. परंतु या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही आणि ती उपलब्ध का करुन देता येत नाही, याची कारणे देखील अपिलार्थीस कळविलेली नाहीत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग,इंदापूर,जि.पुणे यांनी अशाप्रकारच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० (२) मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,पुणे यांना या प्रकरणातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,४ व ५ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,पुणे यांना या प्रकरणातील संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : १७-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजयकुमार भंडारी,रा.लोणी खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इंदापूर,जि.पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग (पूर्व),सेंट्रल बिल्डींग, रेल्वेस्टेशन कंपाऊंडजवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सेंट्रल बिल्डींग, रेल्वेस्टेशन कंपाऊंडजवळ,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०००

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ श्री. विठ्ठलदास गंगादास शहा, : अपिलार्थी

रा. बी. ३०१, दिशा करिश्मा, अंगुरीबाग, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद,

जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधितांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये गट

विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांचे स्वतःचे प्रवास भत्ता बिल, वेतन भत्त्याची रक्कम, त्यांची प्रस्तावित विभागीय चौकशी या मुद्यांसंदर्भात त्यांच्याकडे एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज कोऱ्या कागदावर केला असून त्या कागदावर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्जदाराने त्यांच्या मूळ अर्जावर डकवावयाचे १० रु. किंमतीचे तिकीट डकविलेले नाही. अपिलार्थीचा दिनांक ०४-११-२००८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २४-११-२००८ रोजी प्राप्त झाला.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २३-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०२-२००९ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज, या अर्जावर १० रु. इतके कोर्ट स्टॅम्प त्यांनी न डकविल्यामुळे, या अर्जास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत करण्यात येणाऱ्या अर्जाची वैधता प्राप्त होऊ शकत नाही. अपिलार्थीने गट विकास अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीशी संबंधित ६ मुद्यांचे अवलोकन केले असता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ४ व ६ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही त्यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी व भविष्यकाळातील असल्याची दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलचे कारण अथवा त्यांच्या निर्णयाचे स्पष्टीकरण विचारणे आणि भविष्यकाळातील माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीचे स्पष्टीकरण करणारी व प्रस्तावित माहिती जी कागदोपत्री कोठेही उपलब्ध नाही, अशी अमूर्त स्वरुपातील भविष्यकाळातील माहिती देणे हे या अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणी संदर्भातील प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १,४ व ६ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ५ शी संबंधित माहिती ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, अपिलार्थीस देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस १० दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या आयोगास सादर केलेल्या मूळ प्रथम अर्जावर त्यांना कोणत्या माध्यमाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती अपेक्षित आहे, याचा उल्लेख केल्याचे आयोगास आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. एवढे जरी असले तरीही अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास वैधता प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने

जन माहिती अधिकारी यांना पुढे असेही सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीकडून १० रु. इतक्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प प्रथमतः प्राप्त करुन घेऊन ते त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास डकवून नंतरच त्यांना ही माहिती दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः हस्तांतरित करावी. अपिलार्थीस ही माहिती हस्तगत करुन घेण्याच्या दृष्टीने असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी १० रु. इतक्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करुन तदनंतर वरील कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २,३ व ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ५ शी संबंधित वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीकडून १० रुपये किंमतीचा कोर्ट स्टॅम्प प्राप्त करुन घेऊन व तो अपिलार्थीच्या मूळ अर्जावर डकवून नंतर त्यांना, १० दिवसाच्या आत विनामूल्य व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विठ्ठलदास गंगादास शहा, रा. बी. ३०१, दिशा करिश्मा, अंगुरीबाग, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००१

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ श्री. सुधीर प्रभाकर पवार, : अपिलार्थी

रा. घर नं. १२९७, मिशन कंपाऊन्ड, छावणी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

आगार व्यवस्थापक (वरिष्ठ), राज्य परिवहन महामंडळ,

आगार क्र.२, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाची अधिनियमातील विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये सुनावणी घेतली नाही आणि त्यांनी विनिर्दिष्ट कालावधीमध्ये माहिती देण्यासाठी कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे व तसेच अपूर्ण व दिशाभूल करणारी खोटी माहिती प्राप्त झाली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"1) Original copy of Deo no 3646/08 date 04-12-2008 2) Reason For/Neeo of Bringing out the Deo/3646, & Inform its legal effect. If, It is not served to concern & exact dt of dismissal of concern & the last date of apeal"

( टीपः- अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे)

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहतीपोटीचे शुल्क रु. ४ इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सांगितले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व आयोगास जन माहिती अधिकारी यांच्याकडून सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता यामध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती आढळून आली असल्याने, जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे, सदर निर्णय त्यांना प्राप्त झ ााल्या-पासून ९० दिवसाच्या आत द्वितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालील-प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २६-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुधीर प्रभाकर पवार, घर नं. १२९७, मिशन कंपाऊन्ड, छावणी, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक (वरिष्ठ), राज्य परिवहन महामंडळ, आगार क्र.२, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००२

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ श्री. केशव रतन चव्हाण, : अपिलार्थी

मु. जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, ता. जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

अध्यक्ष, वसंतराव नाईक आश्रम शाळा, घाटंग्री,

ता. जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

जिल्हा विशेष समाजकल्याण अधिकारी, वर्ग १, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती पुरविली नसल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-०४-२००९ रोजीच्या पत्रानुसार आयोगाकडे अपील करा असे सुचविले असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेसंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः

मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - इयत्ता १ ली ते १० वी आश्रमी विद्यार्थ्यांची यादी, बालकाश्रम विद्यार्थ्यांची यादी, कनिष्ठ महाविद्यालय निवासी आदिवासी विद्यार्थ्यांची यादी, कनिष्ठ महाविद्यालय कर्मचारी भरती प्रक्रियेची सर्व कागदपत्रे, बिंदु नामावली रजिस्टरच्या संपूर्ण छायांकित प्रती, अन्नधान्य खरेदी व सामान खरेदीच्या मूळ पावत्या, कर्मचाऱ्यांची यादी, नेमणुक आदेश व शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. तथापि या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा त्यांनी त्यांच्या माहितीाठीच्या मूळ अर्जासोबत जोडला नव्हता. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३,५२१/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अथवा ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र त्यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले. या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या सूचनेच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०३-२००९ रोजी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहिती पाठविली असता, ते पाकीट त्यांना दिनांक २५-०३-२००९ रोजी परत प्राप्त झाले. सदरच्या माहितीचे पाकीट अपिलार्थीने स्वीकृत केले नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०४-२०१० रोजी या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तांतरित केली आहे व तसेच या संदर्भात अपिलार्थीने अध्यक्ष, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, घाटंग्री यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. या पत्रावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १८-०४-२०१० रोजी संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असता ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही "व्यक्तिशः " उपस्थित राहिले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दिनांक १८-०४-२०१० रोजी ३,५२१ इतक्या पृष्ठांची माहिती विनामूल्य प्राप्त झालेली आहे. या अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीने संबंधित शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांना उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १८-०४-२०१० रोजीच्या पत्रामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांनी, त्यांच्या अज्ञानावरुन राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे अपील केलेला अर्ज ग्राह्य धरु नये आणि या संदर्भात संस्थेस जबाबदार धरण्यात येऊ नये. अपिलार्थीने संबंधित संस्थेच्या अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रामधील हा अभिप्राय पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षित असलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केशव रतन चव्हाण, मु. जहागीरदारवाडी, पो. शिंगोली, ता. जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, वसंतराव नाईक आश्रम शाळा, घाटंग्री, ता. जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा विशेष समाजकल्याण अधिकारी, वर्ग १, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००३

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी

मु. जानापुरी, पो. वडेपुरी, ता. लोहा, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

उपवनसंरक्षक, उपवनसंरक्षक विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

सहायक वनाधिकारी (रोहयो), वनविभाग, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य लेखापाल, उपवनसंरक्षक कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर, या प्रकरणी, सुनावणी घेऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि त्यांना अद्यापही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००४-०५ ते २००६-०७ या कालावधीमध्ये "कामासाठी धान्य" या राष्ट्रीय कार्यक्रमाअंतर्गत त्यांना जिल्हा ग्रामीण विकास योजना, नांदेड यांच्याकडून पुरवठा करण्यात आलेला निधी, सदर निधी ज्या कामावर खर्च करण्यात आला त्या कामाची नावे, गावाची नावे, चालू कामाचा दिनांक, पूर्ण झालेल्या कामाचा दिनांक व या कामावरील मजुरांना वाटप करण्यात आलेल्या मजुरीच्या मस्टरच्या सत्यप्रती आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून किती तांदूळ व किती धान्याचे कुपन प्राप्त झाले, प्रत्येकी कामावर गहू व तांदूळ किती वाटप झाले, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजूरांच्या मस्टरच्या सत्यप्रती आणि वन परिक्षेत्र अधिकारी यांनी केलेले तांदूळ व गहू वाटपासंदर्भात मागणी केलेली माहिती वगळता उर्वरित दोन मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उपवनसंरक्षक कार्यालय, नांदेड यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मस्टरच्या सत्यप्रती, तांदूळ व गव्हाच्या कुपनावरील आणि धान्याच्या वाटपासंदर्भातील माहिती ही उपवनसंरक्षक कार्यालयाकडे सरळ उपलब्ध नव्हती, ही माहिती उपवनसंरक्षक कार्यालयातील क्षेत्रिय पातळीवर कार्यरत असणारे वन परिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे उपलब्ध होती. वन विभागाने त्यांच्या क्षेत्रिय पातळीवरील माहितीकरिता संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांना जन माहिती अधिकारी म्हणून नेमले आहे. त्यामुळे या प्रकरणी उप वन संरक्षक कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीच्या प्रथम अर्जाच्या प्रती, सदरचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत संबंधित वन परिक्षेत्र अधिकाऱ्याकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे, त्यांना अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे भाग होते. परंतु अशाप्रकारची कोणतीही कृती त्यांनी केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक कार्यालय, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अद्यापपावेतो अपिलार्थीस त्यांच्यातर्फे न पुरविली गेलेली, मजुरांच्या मस्टरच्या सत्यप्रती, धान्य कुपन व धान्य वाटपाच्या मुद्यावरील संपूर्ण माहिती त्यांनी सर्व संबंधितांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या प्रथम प्रतिसादामध्ये त्यांच्या कार्यालयाकडे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी पुरेसे अनुदान उपलब्ध नसल्याचा उल्लेख केला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद अमान्य करण्यात येऊन त्यांना वरील आदेश देण्यात येत

आहेत. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी, आयोगाने विहित केलेल्या कालावधीमध्ये त्यांनी त्यांच्या विभागाच्या सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक तो निधी प्राप्त करुन घेऊन नंतर ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, ता. लोहा, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उपवनसंरक्षक कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००४

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ श्री. देशमुख विलास शामराव, : अपिलार्थी
श्री. विष्णु झेरॉक्स सेंटर, के. टी. सिध्दीकी क्लासेससमोर,
विसावानगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प, सब डिव्हीजन क्र. २,
इसापूर, ता. पुसद, जि. यवतमाळ

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता, उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प, विभाग क्र.-१, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. शामराव दत्तात्रय देशमुख

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी दिनांक ०२-०७-२००८, १९-०७-२००८ व १२-११-२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दिनांक ०४-०३-२००९ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. हा आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०३-२००९ रोजी पारित केला आहे. त्यानंतर दिनांक १८-०३-२००९ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पुरविली गेली. तथापि ती माहिती खोटी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील संदर्भीत तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना दिनांक १८-०३-२००९ रोजी पुरविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०७-२००८ , १९-०७-२००८ व १२-११-२००८ रोजी केलेल्या तक्रार अर्जांवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही म्हणजे, अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातर्फे विविध प्राधिकरणाशी दिनांक ३०-१२-२००८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या व याच कालावधीतील अपिलार्थीच्या मूळ अर्जाशी संबंधित विषयावरील अभिलेख्यामध्ये उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती, ही होय. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०३-२००९ रोजी पुरविलेली माहिती पाहता, ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अशाप्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास द्यावयाचा प्रतिसाद या स्वरुपात ती नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०३-२००९ रोजी पुरविलेली माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी विसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भीत केलेल्या ३ तक्रार अर्जासंदर्भात त्यांनी विविध प्राधिकारणाशी दिनांक ३०-१२-२००८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि याच कालावधीतील त्यांच्याकडील या विषयावरील अभिलेख्यावर उपलब्ध असलेल्या टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देशमुख विलास शामराव, श्री. विष्णु झेरॉक्स सेंटर, के. टी. सिध्दीकी क्लासेस-समोर, विसावानगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उर्ध्व पेनगंगा प्रकल्प, विभाग क्र.-१, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००५

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ श्री. सय्यद कमालपाशा बाशुमियाँ, : अपिलार्थी
रा. गांधीनगर, कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक, कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सह जिल्हा निबंधक, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : दुय्यम निबंधक श्रेणी-१, कळंब, जि. उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (निम्न श्रेणी), वर्ग - १, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०४-२००९ रोजी केलेले व दिनांक ०४-०५-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०७-०४-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांनी दाखल केलेले द्वितीय अपील क्रमांक १००५/२००९ हे, ते स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद कमालपाशा बाशुमियाँ, गांधीनगर, कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी (निम्न श्रेणी), वर्ग - १, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००६

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शशिकांत पेमराज चंगेडे,<br>३४६३, खिस्त गल्ली,<br>अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर | : प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : शहर अभियंता, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे तसेच त्यांनी प्रथम अपील अर्जावर केलेल्या युक्तिवादाची नोंद जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये न केल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील अमरधाम-पत्रकार चौक रस्त्याचे काम, बागरोजा हडकोसमोरील पाईपलाईन आणि सिटी सर्वे नंबर ' ५२४२ अ ' या जागेवरील बांधकामा-संदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना उद्देशून केला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३० इतके त्यांना महानगरपालिका कार्यालयात भरुन, माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने दिनांक ०६-०२-२००९ रोजी मनपा कार्यालयात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३० इतक्या रकमेचा भरणा केला, परंतु जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती ते घेऊन गेले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन न घेता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचे कारण दर्शवून दिनांक २०-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०३-२००९ रोजी, अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थी यांनी आपला लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून यामध्ये आयोगाकडील सूचना मिळाली नसल्याचे नमूद करुन, शहर अभियंता यांनी त्यांना सदर कामाबाबतची सर्व कागदपत्रे देण्याबाबत आश्वासन दिले आहे, असे आयोगास अवगत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या ६ मुद्दयावरील माहितीपैकी, ३ मुद्दयावरील माहिती शहर अभियंता कार्यालयाशी संबंधित होती आणि त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती ही नगर रचना कार्यालयाशी संबंधित होती. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी तयार करुन ठेवली आहे व अपिलार्थी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ज्यावेळी येतील त्यावेळी त्यांना ती लागलीच हस्तांतरीत केली जाईल, असे त्यांनी आयोगास अवगत केले. नगर रचना विभागाच्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, नगर रचना विभागाने अपिलार्थीस दिनांक १६-०२-२००९ रोजी, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क दिनांक ०६-०२-२००९ रोजी भरुन, ते जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती, व्यक्तिशः मागणी करुनही, घेऊन गेलेले नाहीत, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी, महानगरपालिका यांनी अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, या पत्रामध्ये, महानगरपालिकेच्या जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील, जो त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस देणे अभिप्रेत होते, तो तपशील त्यांनी अपिलार्थीस दिला नसल्याने व तसेच अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी

अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीचा भंग केला असल्यामुळे, आता जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३० इतके त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमीत होताच, सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३० इतके त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत परत करावे व या कालावधीमध्ये अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शशिकांत पेमराज चंगेडे, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००७

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ श्री. तावरे हरीभाऊ माधवराव, : अपिलार्थी
मु. पो. चिकनगांव, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, घनसावंगी तालुक्यातील अरगडे गव्हाण पाझर तलाव क्रमांक ३,

हातडी पाझर तलाव क्रमांक ४, रवना पाझर तलाव क्रमांक ११, वडी रामसगांव पाझर तलाव क्रमांक २, भेंडाळा पाझर तलाव क्रमांक ३, या पाझर तलावांची रोजगार हमी योजने अंतर्गत दिनांक ०१-०१-२००६ ते ३१-०३-२००८ या कालावधीतील, केलेल्या कामावरील मजुरांच्या यादीच्या सत्यप्रती, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्याकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, जिल्हा जालना यांना, अपिलार्थीस सात दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले, तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास, ते या पदावर नुकतेच रुजू झाल्याची कल्पना दिली व आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी श्री. ब्रम्हप्रकाश ठाकूर नावाचे उप अभियंता जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत

होते. ते सध्या लघुपाटबंधारे उपविभाग, हिंगोली, जिल्हा हिंगोली येथे कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या विभागीय कार्यालयात आता उपलब्ध असून विभागीय कार्यालया-कडून ही माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत देण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे, तसेच अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा सबळ पुरावा त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत जोडला आहे, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देणे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांनी कबूल केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असूनही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळवूनही, जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन उपविभागीय अभियंता श्री. ब्रम्हप्रकाश ठाकूर यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीही माहिती न पुरवून, आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाने त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब, सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. ब्रम्हप्रकाश ठाकूर (सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे, उपविभाग, हिंगोली या पदावर कार्यरत) यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी श्री. ब्रम्हप्रकाश ठाकूर (सध्या उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे, उपविभाग, हिंगोली या पदावर कार्यरत) यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तावरे हरीभाऊ माधवराव, मु. पो. चिकनगांव, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११३

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ श्री. इसाक उस्मान कुरैशी, : अपिलार्थी
कुरेशी मोहल्ला, मु. पो. खुलताबाद, जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, राजमाता निवासी आश्रमशाळा,
वेरुळ, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
शिक्षण विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो मागणी केलेली माहिती मिळाली नसल्यामुळे

त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या शाळेशी संबंधित सन २००१ ते २००८-०९ या कालावधीतील काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - निवासी / अनिवासी विद्यार्थ्यांची प्रवेश रजिस्टरप्रमाणे एकूण संख्या, प्रवेश घेतलेले दाखले, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संस्थेच्या व शासनाच्या वैयक्तिक मान्यतेच्या प्रमाणित प्रती, पंचायत समिती स्तरावरुन दरमहा पुरविण्यात येणारा शालेय पोषण आहार - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित मुख्याध्यापकाने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात दिनांक १६-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०६-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आणि जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांनी ज्या शाळेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागितली आहे त्या शाळेविषयी त्यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून

या शाळेमध्ये विद्यार्थ्यांची व शिक्षकांची संख्या खोटी दाखविण्यात येऊन शासनाकडून अवैधरित्या अनुदान प्राप्त करुन घेतले जात आहे. या प्रकरणाची सत्यता पडताळून पाहण्याच्या दृष्टीने त्यांना ही माहिती आवश्यक आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०१-०६-२००९ रोजी त्यांचे आदेश पारित करुन मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रम शाळा, वेरुळ तांडा, ता. खुलताबाद यांना अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि यानंतरही त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती का पुरविली नाही याचे कारण त्यांना आता सांगता येणार नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार ३० दिवसाच्या आत देय होत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीच्या अर्जामध्ये त्यांना अपेक्षित असलेली माहिती निश्चितपणे कोणत्या माध्यमाद्वारे अपेक्षित आहे, याचा खुलासा त्यांनी या अर्जामध्ये केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून 'व्यक्तिशः ' अपेक्षित असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या कालावधीमध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्याही कार्यालयीन दिवशी

पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून, ही माहिती आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकाकडून स्वतः विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज केल्यानंतर ही माहिती मुख्याध्यापकाकडे त्यांच्या दिनांक १९-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे देखिल मागितली आहे व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीवर निर्णय देताना अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. अशाप्रकारे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकास

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची संपूर्ण कल्पना असूनही त्यांनी अपिलार्थीस आजतागायत कोणत्याही प्रकारची माहिती न देऊन, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीचा भंग केला आहे. संबंधित मुख्याध्यापक यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजमाता निवासी आश्रम शाळा, वेरुळ यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच त्यांना असेही सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांना मुख्याध्यापक, राजमाता निवासी आश्रम शाळा, वेरुळ तांडा हे अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात समक्ष बोलावून घेऊन ते ही माहिती अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये आदेशित केलेल्या कालावधीमध्ये देतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजमाता निवासी आश्रम शाळा, वेरुळ तांडा, ता. खुलताबाद यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. इसाक उस्मान कुरैशी, कुरेशी मोहल्ला, मु. पो. खुलताबाद, जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजमाता निवासी आश्रमशाळा, वेरुळ तांडा, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११४

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ सौ. सुरेखा चंपतराव पाटील, : अपिलार्थी
रा. संभाजीनगर, तरोडा (बु.),
नांदेड - ०५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, टेंभी,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १९-०४-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती

अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १११४/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १११४/२००९, दिनांक ०१-०६-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सुरेखा चंपतराव पाटील, रा. संभाजीनगर, तरोडा (बु.), नांदेड - ०५.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, टेंभी, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६१

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

१ श्री. सुरेश केशवराव कसबे, : अपिलार्थी
इंदिरानगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जो

प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०६-२००७ रोजी प्राप्त झाला त्याअन्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत सन २००६-०७ या कालावधीमध्ये केल्या गेलेल्या जिंतूर, सेलू तालुक्यातील मानव विकास आणि रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात काही माहिती, एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या योजनेस शासनाकडून प्राप्त झालेला निधी, सदर निधी कोणत्या गावात, कोणत्या शेतक-याच्या शेतात, कोणत्या कामावर, किती खर्च झाला त्या शेतक-याचे नाव, कामाचे स्वरुप, या कालावधीमध्ये रोजगार हमी योजनेची कामे कोणत्या गावात व कोणाच्या शेतात झाली व यावर झालेला खर्च, रोजगार हमी योजनेच्या कामावर काम केलेल्या मजुरांची संख्या, मजुराचे नाव, गाव, मजुरांना ज्या दुकानातून धान्य मिळते त्या स्वस्त धान्य दुकानदाराचे नाव, मजुराला निवा-यासाठी चटई, बांबू आणलेले असल्यास ते कोठून आणले, त्यावर झालेला खर्च, मजुरांच्या मुलाबाळांच्या देखभालीसाठी केलेली व्यवस्था - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १९,४७० इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आणि सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर १५ दिवसात अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासीत केले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्याकडे दिनांक २८-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०५-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि नंतर ती रद्द करण्यात आली. अशा प्रकारे अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अपिलार्थीने त्यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे, त्यांना पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. तथापि अपिलार्थीस, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी, तो प्रतिसाद चुकीचा आहे, कारण अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना, अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीनुसार शुल्काचा तपशील त्यांनी अपिलार्थीस देणे त्यांना अनिवार्य आहे, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना माहिती पुरविण्यापोटी आकारण्यात येणा-या शुल्काचा तपशील दिलेला नाही. अधिनियमातील याच कलमामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे शुल्काचा भरणा केल्यानंतर, अपिलार्थीस किती मुदतीत माहिती देणे आवश्यक आहे हेही नमूद केलेले आहे आणि याचा कोणताही विचार न करता जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस, त्यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर १५ दिवसाच्या आत त्यांना माहिती देण्याचे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास अशा प्रकारे प्रतिसाद देण्याची सदरची कृती चुकीची असल्यामुळे आणि या प्रकरणी अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग जन माहिती अधिका-याकडून झाला असल्यामुळे, आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य माहिती पुरवावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश केशवराव कसबे, इंदिरानगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६२

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. सुमिता नरहरराव सावंत,<br>मस्तानपूरा, नवा मोंढा,<br>नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०७-२००८ रोजी नोंदविलेले आणि दिनांक ०१-०११-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांच्याकडे अपिलार्थीने दिनांक २६-१२-२००७ रोजी माहिती मागितली असता, त्यांनी त्यांच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस असे कळविले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जात नगर भूमापन क्रमांकाचा उल्लेख केल्यास मागणीप्रमाणे नक्कल देण्यात येईल. त्याचप्रमाणे त्यांनी संबंधित अधिका-याची भेट घेतली असता, त्यांनी अपिलार्थीस सांगितले की, त्यांचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात सापडत नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय

अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांच्याकडे दिनांक २९-०२-००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांची कागदपत्रे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांना सादर करुन आपले काम करुन घ्यावे, अशी सूचना दिली. या निर्णयाच्या नाराजीने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

' दि. ३०-१२-२००२ च्या अर्जासोबत रजिस्ट्री क्र. १०२३ दि. १-३-८३ ची विक्रीपत्र प्रत जोडुन पी. आर. कार्ड मीळण्याबाबत विनंती केली होती. पी. आर. कार्ड अद्याप मिळाले नाही. तरी पी. आर. कार्ड मिळावे. या संबंधि वेळोवेळी समक्ष भेटूनही काही उपयोग झाला नाही. पी. आर. कार्ड मीळावे. '

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये भूमापन क्रमांकाचा उल्लेख केला नसल्यामुळे अपिलार्थीस पी. आर. कार्ड देता येणे शक्य नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांच्याकडे दिनांक २९-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांना त्यांच्या दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे असे कळविले - " अपिलार्थीने माहितीसाठीची मागणी करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, ही बाब योग्य नाही. अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात अपील केले असून याबाबत संबधितांना योग्य माहिती देऊन, अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड कार्यालयास त्वरीत अनुपालन अहवाल सादर

करावा. " जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या अगम्य निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून, त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये ज्या प्रकारचे म्हणणे मांडले आहे, त्या अर्जामध्ये नगर भूमापन क्रमांकाचा उल्लेख नाही, नामांतरासाठी आवश्यक असलेले अकृषिक आदेश सोबत जोडलेले नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस नगर भूमापन क्रमांकाची माहिती देण्याबाबत सूचित करुनही त्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही न केल्याने त्यांना अपिलार्थीस पी. आर. कार्डाची माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला लेखी युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अधिकार अधिनियमांतर्गत दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या रजिस्ट्री क्रमांक १०२३, दिनांक ०१-०३-१९८३ च्या आधारे नांदेड येथील सर्व्हे नंबर ६८ पैकी ३ नंबरच्या प्लॉटचे पी. आर. कार्ड हवे आहे असे दिसून येत आहे. अपिलार्थीने माहितीच्या अधिकारांतर्गत या पी. आर. कार्डाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या लेखी युक्तिवादावरुन, मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने ज्या भूखंडाच्या पी. आर. कार्डाची प्रत त्यांच्याकडे मागितली आहे ते पी. आर. कार्ड अकृषिक आदेशा-अभावी आणि सीटीएस सर्व्हे आदेशाअभावी तयार झाले नसल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती प्रत्यक्षात

ज्या स्वरुपात उपलब्ध आहे ती माहिती त्यांनी अर्जदारास त्याच स्वरुपात अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देणे, हे मूळात या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अस्तित्वातच नसल्यामुळे, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अस्तित्वात नसलेल्या अमूर्त स्वरुपातील माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ सौ. सुमिता नरहरराव सावंत, मस्तानपूरा, नवा मोंढा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रा-तील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६३

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी बाबुराव आवटे,<br>२६, ब, सारा गौरव, तुळजापूर, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, उस्मानाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०११-२००८ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रलंबीत भविष्य निर्वाह निधीच्या प्रकरणात त्वरेने कार्यवाही होऊन, त्यांना न्याय मिळण्यासाठी आणि आवश्यक त्या त्वरेने रकमेची अदायगी होण्यासाठी, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ' भविष्य निर्वाह निधी अंतिम प्रदान ' या विषयावर महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व हकदारी) व्दितीय नागपूर यांचे पत्र क्रमांक दिनांक २८-०५-२००७, दिनांक ०६-०७-२००७, १३-०९-२००७ व दिनांक २०-११-२००७ आणि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी दिलेल्या आवेदनपत्राच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही व त्यांचे प्रकरण निकाली काढण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर होत असलेल्या विलंबाबद्दल संबंधितांच्यावर काय कारवाई केली, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, महालेखापाल यांनी त्यांच्या पत्रात कळविलेल्या त्रुटीची पुर्तता करण्याबाबत तहसीलदार, तुळजापूर व उमरगा यांच्याकडून माहिती मागविली असल्याचे अपिलार्थीस अवगत केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०८-२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित संचिका दाखवून, नियमाप्रमाणे माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या भविष्य निर्वाह निधीच्या प्रकरणासंदर्भात तहसीलदार, तुळजापूर व उमरगा यांच्याकडून, महालेखापाल यांनी

कळविलेल्या त्रुटींची पुर्तता होणे बाकी असल्याने, त्यांच्या भविष्य निर्वाह निधीतून कार्यालयास दहा टक्के रक्कम अदा करता आली नाही, तथापि तहसील कार्यालय, उमरगा यांच्याकडून आता माहिती प्राप्त झाली आहे आणि तुळजापूर तहसील कार्यालय यांच्याकडून १५ दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन घेऊन, ते अपिलार्थीचे विचाराधीन अपील मार्गी लावू शकतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, अर्जदाराच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या एखाद्या अर्जाच्यासंदर्भात त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती म्हणजे, अर्जदाराने संदर्भित केलेल्या प्रकरणावर, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित प्राधिकरणांशी अर्जदाराच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या दिनांकापर्यंत केलेला पत्रव्यवहार आणि या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या महालेखापाल यांच्या पत्रांच्या आणि अपिलार्थीच्या आवेदनाच्या पत्राच्या अनुषंगाने, त्यांनी दिनांक २६-०५-२००८ पर्यंत विविध प्राधिकरणाशी, या विषयावर केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती आणि यासंदर्भातील अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस पुरवाव्या लागतील. आज रोजी आयोगाने, अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या वरील मुद्दयांशी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य कळवावी. जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर अपिलार्थीचे प्रकरण निकाली

काढण्यासाठी केलेल्या विलंबाबाबत कोणावरही कारवाई  झाली नसल्यामुळे, या मुद्दयावरही जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तसे कळवावे लागेल, याचीही त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिवाजी बाबुराव आवटे, २६, ब, सारा गौरव, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६४

निर्णय दिनांक १९-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शामराव सुंदरराव खरात,<br>मु. पो. पाथरवाला (बु.), तालुका अंबड, जिल्हा जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक अधीक्षक अभियंता, (ला. क्षे. वि. प्रा.),<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय अधिकारी, जा. पा. उपविभाग क्रमांक १४, वडीगोद्री, तालुका अंबड, जिल्हा जालना |
| | जन अपिलीय अधिकारी | : | सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०७-२००९ रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००८ रोजी सुनावणी ठेऊनही जन अपिलीय अधिकारी गैरहजर राहिले व त्यांना

कोणतीही माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शासनाच्या दिनांक १२-०२-१९८१, दिनांक १०-०७-१९८१ व कार्यकारी अभियंता, पैठण यांच्या दिनांक १५-०१-२००८ रोजीच्या पत्रावर, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, अशा प्रकारची माहिती मागितली होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थी अनुपस्थित राहिल्याने दिनांक २३-०९-२००८ रोजी या अपील अर्जासंदर्भात आपले आदेश पारीत केले. अपिलार्थीने आयोगाकडे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्यामुळे आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी त्यांना उपलब्ध करुन न दिल्याने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या अपील अर्जावर दिनांक २८-०४-२००८ रोजी दुपारी १२-०० वाजता, सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांच्या कार्यालयात सुनावणी घेण्याचे मान्य केले. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, दिनांक २८-०४-२०१० रोजी दुपारी १२-०० वाजता सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०८-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, दिनांक २८-०४-२०१० रोजी दुपारी १२-०० वाजता सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १९-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शामराव सुंदरराव खरात, मु. पो. पाथरवाला (बु.), तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जा. पा. उपविभाग क्रमांक १४, वडीगोद्री, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९३७

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. सुभाष साहेबराव नाकलगांवकर, : अपिलार्थी
रा. सम्राट अशोकनगर, माजलगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद, माजलगाव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
नगर परिषद, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती मिळाली नसल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ३०-०३-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिनांक ३०-०४-२००९ रोजी प्राप्त झाली असल्याचे व ती समाधानकारक असल्याचे कबूल करुन त्यांनी आयोगाकडे दिनांक २९-०४-२००९ रोजी सादर केलेला त्यांचा व्दितीय अपील अर्ज ते परत घेत आहेत असे नमूद केले आहे.

आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष साहेबराव नाकलगांवकर, रा. सम्राट अशोकनगर, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी, नगर परिषद, माजलगाव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, नगर परिषद, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००८

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. लक्ष्मीनारायण छोटेलाल राठोड, : अपिलार्थी
रा. बी-९, ठाकूर निवास, गिरीराज हौसिंग सोसायटी, कामगार
चौक, पंढरपूर, वळदगांव, ता. जि. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वळदगांव,
ता. जि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय
वळदगांव, ता. जि. औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद
त्रयस्थ पक्ष : चेअरमन, गिरीराज हौसिंग सोसायटी व प्रेमीचंचल हौसिंग सोसायटी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थी यांचा दिनांक १९-१२-२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक २२-१२-२००८ रोजी प्राप्त झाला. त्याअन्वये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील गिरीराज व प्रेमीचंचल हौसिंग सोसायटी, वळदगाव यांच्या संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन १९८९ ते दि. ३१-१२-२००८ असा होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १,७३४/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १७-०२-२००९ रोजी केला. त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती तयार असून ती हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. तथापि प्राप्त माहिती पूर्ण नसल्याने व दुसऱ्या वस्तीची माहिती मिळाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक २६-०३-२००९ रोजी पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर गट विकास अधिकारी यांनी दिनांक १६-०५-२००९ व २५-०५-२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिले. यानंतर गट विकास अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिनांक २९-०६-२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिनांक ०७-०७-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील, 'दोन्ही सोसायटीचे नकाशे' या मुद्यावरील माहिती वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस दिली, असे जन माहिती अधिकारी आयोगासमोर सांगत आहेत. तथापि या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांना आयोगासमोर सादर करता आला नाही. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आणि त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, ते प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्याकडील सुनावणीसाठी हजर होते. परंतु तारीख पुढे ढकलल्याचे त्यांना माहिती नसल्यामुळे या सुनावणीबाबतचा निर्णय त्यांना कळलेला नाही.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व विशेषतः अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२०१० दुपारी १२.०० वाजता सुनावणी घ्यावी व या सुनावणीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय त्याच दिवशी लेखी स्वरुपात पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, अपिलार्थीस अधिनियमातील कलम १९ (३) नुसार सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करण्याची मुभा राहिल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांनी, अपिलार्थीच्या दिनांक २६-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, दिनांक १०-०५-२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मीनारायण छोटेलाल राठोड, रा. बी-९, ठाकूर निवास, गिरीराज हौसिंग सोसायटी, कामगार चौक, पंढरपूर, वळदगांव, ता. जि. औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वळदगांव, ता. जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१००९

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. महेश रमेश पाटील,<br>रा. जी - १/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर,<br>उस्मानपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, वेतन पथक कार्यालय (प्राथमिक), जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०५-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन पथक (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक

२०-०४-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांनी दाखल केलेले द्वितीय अपील क्रमांक १००९/२००९ हे, ते स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील आता मागे घेतले असल्यामुळे, अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महेश रमेश पाटील, रा. जी - १/६, कासलीवाल रेसीडेन्सी, प्रतापनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन पथक कार्यालय (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१०

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. केशव दत्तात्रय गव्हाणे,<br>रा. ४५३, संभाजी नगर, डिकसळ, ता. कळंब, जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, डिकसळ, ता. कळंब ,<br>जि. उस्मानाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, कळंब,<br>जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, डिकसळ, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची व अपूर्ण असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. त्यांनी या अर्जामध्ये आयोगास पुढे असेही अवगत केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधाकारी यांनी

त्यांना हेतूपुरस्सर त्यांनी मागणी केलेली माहिती दिलेली नाही. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, डिकसळ, ता. कळंब यांच्याकडे, ग्रामपंचात करबाकी, कर भरणा, नोकर भरती व भविष्य निर्वाह निधी भरणा आणि ग्रामसेवकाच्या अधिकाराबाबत सन १९९० ते जानेवारी २००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्रामपंचायत, डिकसळ हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांकडून दिनांक ३१-०३-२००७ अखेर ग्रामपंचायतीला येणे असलेली सर्व प्रकारच्या थकबाकी धारकांची सर्व्हे नंबरसह यादी आणि वसुलीसाठी केलेली कार्यवाही, दिनांक १६-०८-२००८ ते ३१-०१-२००९ या कालावधीमध्ये ग्रामपंचायतीच्या झालेल्या मासिक सभेच्या व ग्रामसभेच्या इतिवृत्ताच्या छायांकित सत्यप्रती, दिनांक १६-०८-२००८ ते ३१-०१-२००९ या कालावधीमध्ये खाते नंबर १, २ व सॅनिटरी मार्ट व बँक पास बुकाच्या छायांकित प्रती, ग्रामपंचायतीने सन १९९० पासून दिनांक ०५-०२-२००९ पर्यंत कामावर घेतलेल्या एकूण कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीबाबतच्या ठरावाच्या छायांकित सत्यप्रती व ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यावर दिनांक १७-०७-२००७ ते ३१-०१-२००९ या दरम्यान भरणा करण्यात आलेल्या रकमेचा तपशील आणि भरणा करणाऱ्याचे संपूर्ण नाव, तसेच गट विकास अधिकारी वर्ग १ यांनी ग्रामसेवकास दिलेल्या लेखी आदेशावर कार्यवाही करण्यासाठी जिल्हा परिषद किंवा इतर अधिकारी यांचा सल्ला घेण्यासाठी व ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत संमत केलेल्या ठरावाच्या काही भागाची अंमलबजावणी करण्यासाठी पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद यांचे मार्गदर्शन घेण्याची तरतूद असणारे जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत अधिनियम यामध्ये असणारे नियम व पोटकलम याबाबतचा सविस्तर तपशील - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ११००/- इतके त्यांना ग्रामपंचायत कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक २६-०२-२००९ रोजी ग्रामपंचायतीच्या कार्यालयात ११००/- रु. इतक्या रकमेचा भरणा केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०३-२००९ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००९ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत उर्वरित माहिती नियमानुसार देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या कालावधीनंतर अपिलार्थीस उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या निवेदनाशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला. आपला युक्तिवाद स्पष्ट करताना त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून गावातील घर क्रमांक २१२ शी संबंधित थकबाकीची माहिती अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही. मासिक सभेच्या इतिवृत्ताची फक्त २२ पानाची माहिती प्राप्त झाली. खाते नबंर १, २ व सॅनेटरी मार्ट यांची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. तसेच ग्रामपंचायतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीबाबतच्या ठरावाची प्रत मागितली असता, त्यांना पगारवाढीबाबत केलेल्या ठरावाच्या

सत्यप्रती जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्या आणि त्यांच्या मूळ अर्जातील शेवटच्या मुद्यावर, वरिष्ठांच्या लेखी आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी इतर यंत्रणेचा सल्ला घेण्याची जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत अधिनियमामध्ये तरतूद असल्यास त्याचा तपशील मागितला असता, ग्रामपंचपायतीचे अधिनियम जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीची मागणी केली त्यावेळी श्री. ए. बी. शेख नावाचे ग्रामसेवक जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीस द्यावयाची उर्वरित माहिती त्यांनी आता बरोबर आणली असून ते ही माहिती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास दिनांक २४-०२-२००९ रोजी दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस देण्यात येणाऱ्या प्रस्तावित माहितीच्या पृष्ठांच्या संख्येचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी या प्रथम टप्प्यावर अधिनियमातील कलम ७ (३) (क) चा भंग केल्याचे स्पष्ट होत आहे. याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे ११००/- रु. इतक्या शुल्काचा भरणा करुनही फक्त ३८९ इतक्या पृष्ठांची माहिती त्यांना दिली आहे, या माहितीमध्ये अनेक उणिवा आहेत. अपिलार्थीस सुरुवातीला द्यावयाच्या माहितीपैकी राहिलेली देय माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी बरोबर आणली आहे. त्यामध्ये देखिल अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीच्या संदर्भातील, व वरिष्ठांच्या लेखी आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता इतर यंत्रणेचा सल्ला घेण्यासाठी तरतूद असलेल्या अधिनियमाच्या प्रती ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये समाविष्ट नाही, असे आयोगास आढळून आले आहे.

अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जातील त्यांनी उपस्थित केलेल्या उर्वरित माहितीचा मुद्देनिहाय आढावा घेतला असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस पूर्णपणे दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये गावातील घर क्रमांक २१२ च्या संबंधित माहिती, त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये समाविष्ट नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. परंतु ग्रामपंचायतीकडचे अभिलेखे हे सर्वेनंबरनिहाय असून त्याच्यामध्ये घर क्रमांकाचा उल्लेख नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले आहे. तसेच त्यांच्याकडे असलेल्या माहितीसंदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्या असल्याचे आयोगास अवगत केले आहे. तेव्हा या मुद्यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना अपेक्षित असलेल्या घर क्रमांक २१२ चा सर्वे नंबर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कळविला असता तर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असती. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दिनांक १६-०८-२००८ ते ३१-०१-२००९ या कालावधीमध्ये झालेल्या ग्रामपंचायतीच्या मासिक व ग्रामसभेच्या इतिवृत्ताच्या छायांकित प्रतीबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता उर्वरित माहिती त्वरित देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. त्यामुळे या मुद्यावर प्रथमतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भातील खाते नंबर १ व २ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो दिली नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, त्यांच्या ग्रामपंचायतीमध्ये केवळ ४ कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत. तथापि या कार्यालयामध्ये एकूण ८ कर्मचारी कार्यरत असून चार कर्मचाऱ्यांचा पगार ग्रामपंचायतीच्या निधीतून दिला जातो. ४ कर्मचाऱ्यांपैकी दोन कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीबाबतची ठरावाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध असून उर्वरित २ कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीच्या ठरावाची सत्यप्रती त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. तथापि ज्या ठरावाच्या आधारे त्यांच्या नेमणूका

झाल्या आहेत त्या ठरावाची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तिकेमध्ये ज्या पृष्ठावर केली गेली आहे त्या पृष्ठांच्या प्रती त्यांना अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येतील. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या या मुद्यावर त्यांनी त्यांच्याकडील दोन कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीच्या ठरावाची प्रत व उर्वरित दोन कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीच्या ठरावाची नोंद संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये ज्या पृष्ठावर दिली आहे त्या पृष्ठांची झेरॉक्स प्रत त्यांनी अपिलार्थीस आता द्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ग्रामपंचायत अधिनियमाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले आहे की, त्यांच्या कार्यालयाकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचा अधिनियम आता उपलब्ध झाला आहे व ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन देतील. या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे या मुद्यावर जी माहिती मागितली आहे तशा प्रकारची माहिती या अधिनियमामध्ये सर्वसाधारण परिस्थितीत उपलब्ध असणे संभवत नाही. कारण सार्वजनिक प्राधिकरणाच्या सर्वसाधारण प्रशासनाची कार्यशैली पाहिल्यानंतर जर एखाद्या कर्मचाऱ्यास वरिष्ठाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता जर काही अडचणी येत असतील तर या संदर्भात त्यांनी वरिष्ठांच्याकडे मार्गदर्शन मागितले म्हणजे त्यांच्या हातून काही प्रमाद घडला किंवा वरिष्ठांच्याकडे मार्गदर्शन मागताना एखाद्या विशिष्ट नियमानुसार त्यांनी वरिष्ठांकडे मार्गदर्शन मागितले पाहिजे असे संकेत सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रचलित कार्य प्रणालीत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती ही अमूर्त (Abstract) स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

वरील परिच्छेदात अपिलार्थीने मागणी केलेली व त्यांना अधिनियमातील तरतुदीनुसार देय असणारी माहिती यांचे केलेले सविस्तर पृथक्करण पाहता, अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त होणे बाकी असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्याकडील माहितीपोटीचे रु. ११००/-

इतके शुल्क आकारुन त्यांना ३८९ पृष्ठांची अपूर्ण माहिती दिली हा अपिलार्थीचा आक्षेप देखिल या प्रकरणी सिध्द होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ११००/- इतके त्यांना परत करावे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती आणि त्यांच्याकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु. ११००/- इतके अपिलार्थीस दिनांक २८-०४-२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी आणि याच कालावधीमध्ये त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ११००/- इतके त्यांना परत करावे.

या प्रकरणी अपिलार्थीस चुकीचे शुल्क आकारुन व त्यांना अपूर्ण माहिती देऊन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. ए. बी. शेख (सध्या ग्रामपंचायत तांदुळवाडी, ता. कळंब येथे ग्रामसेवक या पदावर कार्यरत) यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी श्री. ए. बी. शेख ग्रामसेवक, ग्रामपंचायत तांदूळवाडी, ता. कळंब यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती (दिनांक २८-०४-२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. ए. बी. शेख (सध्या ग्रामसेवक, ग्रामपंचायत तांदूळवाडी, ता. कळंब या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केशव दत्तात्रय गव्हाणे, रा. ४५३, संभाजी नगर, डिकसळ, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, डिकसळ, ता. कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०११

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. सलिम महामुद शेख, : अपिलार्थी
मु. वडनेर, पो. खासगांव, ता. परंडा, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक, परंडा, जि. उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
सह जिल्हा निबंधक, वर्ग १ (निम्न श्रेणी), उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलार्थी हे दारिद्र्यरेषे- खालील व्यक्ती असूनही त्यांना माहिती देण्यासाठी अवाजवी शुल्काची आकारणी करण्यात आल्याने व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "सन २००७ या वर्षात रजिष्टर खरेदीखत क्र. १२८० व १२८१ सन २००७ च्या रजिस्टर खरेदीखत दस्तऐवजीची **नक्कल** मिळण्याबाबत", अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली असून, या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर, १० रु. न्यायालयीन मुद्रांक चिटकिवलेला नाही, डी. आर डी. दाखल्याची प्रत जोडलेली नाही या त्रुटी अपिलार्थीस कळवून या त्रुटींची पुर्तता न केल्यास प्रत्येक पानास रु. २०/- प्रमाणे फी दाखल करण्याचे अपिलार्थीला सूचित केले. याच मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-१०-२००८ रोजी स्मरणपत्र देऊन या त्रुटीची पूर्तता करण्याबाबत अपिलार्थीस सूचित केले. यानंतर दिनांक २३-१०-२००८ रोजी अपिलार्थीने त्यांचा दारिद्र्यरेषेखालील दाखला जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला. तथापि यानंतर जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस कोणतीही माहिती न देता, त्यांच्या दिनांक ०५-११-२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी जरी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असले तरीही त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु ६४०/- इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. हे शुल्क कळविताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या विभागाअंतर्गत नोंदणी प्रक्रिया ही बांधा, वापरा हस्तांतरीत करा या तत्त्वावर असल्यामुळे, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करणे अनिवार्य आहे, असे त्यांनी अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने ६४० रु. इतक्या रकमेचा भरणा केल्याशिवाय अपिलार्थीस **नक्कल** मिळणार नाही, असे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडील १२८० व १२८१ या सन २००७ च्या रजिस्टर खरेदी खताच्या दस्तऐवजांची **नक्कल** मागितली आहे, असे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक २५-०९-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद दिला असला तर हा प्रतिसाद चुकीचा आहे. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जर संबंधित विभागाने त्यांच्याकडील उपलब्ध माहितीपोटीचे शुल्क आधीच निश्चित केले असेल तर त्या निश्चित केलेल्या दराप्रमाणे कोणत्याही अपिलार्थीस संबंधित शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्याशिवाय माहिती प्राप्त करुन घेता येत नाही. अशाप्रकारच्या अधिसूचना राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११-१०-२००५ रोजी पारित केल्या आहेत. या सूचनेतील परिच्छेद क्रमांक 4 (1) (A) (a) मध्ये अशाप्रकारची तरतूद आहे. ही तरतूद पाहता, अपिलार्थी जरी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असला तरीही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्वसाधारण परिस्थितीत त्यांना आवश्यक असलेल्या "नकला" जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेताना वरील तरतुदीनुसार रु. ६४०/- इतक्या रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करणे त्यांना आवश्यक होते. परंतु या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ११-०९-२००८ रोजीच्या अर्जासोबत प्रथमत: त्यांचा दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीचा दाखला जोडला नव्हता, तो त्यांनी दिनांक २३-१०-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केल्याचे दिसून येत आहे. याचा अर्थ अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीच्या मूळ अर्ज दिनांक २३-१०-२००८ ला परिपूर्ण स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला होता. तथापि या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी

दिनांक २५-११-२००८ रोजी म्हणजेच माहिती अधिकार अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर प्रतिसाद दिला असल्याने, आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या नकलांची प्रत त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल.

अपिलार्थीस माहिती नाकारताना जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस देण्यात येणारी माहिती ही बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर देणे अभिप्रेत असल्यामुळे, त्यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देता येणार नाही असे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी कळविलेले हे कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी संयुक्तिक नाही. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जावरील त्यांनी दिनांक २३-१०-२००८ रोजी केलेल्या आक्षेप पूर्ततेनंतर जर जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस हे शुल्क कळविले असते तर, अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण नव्हती. परंतु त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीनंतर या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले असल्यामुळे, त्यांना आता ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सलिम महामुद शेख, मु. वडनेर, पो. खासगांव, ता. परंडा, जि. उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक, परंडा, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, वर्ग १ (निम्न श्रेणी), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१२

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, : अपिलार्थी
मु. पो. गडगा, ता. नायगांव खै., जि नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
पंचायत समिती, नायगांव खै., जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "नायगांव तालुक्यातील राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत इ.स. २००६ ते ३१ डिसेंबर २००८ पर्यंत ज्या गावामध्ये त्यांच्या कार्यालयामार्फत जे काम करण्यात आले त्या कामाचे अंदाजपत्रक, मोजमापपुस्तिकाच्या प्रती, कामगाराचे नावासह व गावासह पेमेंट केलेल्या मस्टरच्या प्रती व यादी," अशी माहिती १५ दिवसाच्या आत शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. तथापि अपिलार्थीस माहिती न देऊनही अपिलार्थीस माहिती दिल्याचे दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०१-२०१० रोजी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला आहे. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

अपिलार्थीच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी जन माहिती वा अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-१२-२००९ रोजी म्हणजे अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर अंदाजे ९ महिन्यांनी त्यांना हा निर्णय दिला आहे. निर्णयाचे लेखी आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०१-२०१० रोजी पारित केले आहेत. म्हणजेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अंदाजे १० महिन्यांनी त्यांना निर्णय प्राप्त झाला आहे. तथापि सदर निर्णय मान्य नसल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राद्वारे दिनांक

०४-०७-२००९ रोजी माहिती दिल्याचे जन अपिलीय अधिकारी यांना अवगत केल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. तथापि हा निर्णय देताना संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीची तपासणी केली किंवा कसे, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली कथित माहिती ही अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे किंवा कसे या संदर्भात कोणतेही अभिप्राय त्यांच्या निर्णयामध्ये दिलेले नाहीत. आज रोजी आयोगासमोर, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती दिल्याचा कोणताही सबळ पुरावा आयोगास उपलब्ध करुन देण्यात आला नसल्यामुळे, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन, जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव, जि. नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ०२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना अपेक्षित असलेली माहिती त्यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव यांच्याकडून हस्तगत करुन घेण्यासाठी या कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी पंचायत समिती, नायगांव येथील कार्यालयात स्वतः उपस्थित राहून, ती गट विकास अधिकाऱ्यांच्याकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापले, मु. पो. गडगा, ता. नायगांव खै., जि नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती, नायगांव खै., जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१३

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. भिंगे शिवाजी रामचंद्र, : अपिलार्थी
द्वारा, श्री. विश्वनाथराव म्हेत्रे, भगणपुरा, राजश्री शाळेजवळ,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा कोणताही निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे, "जिल्हा

परिषद नांदेडमधील ऑक्टोबर महिन्यामध्ये झालेल्या डाटा ऑपरेटर भरती प्रक्रियेच्या टिपणीसह पूर्ण पंजिका आणि लेखी व तोंडी परीक्षेच्या मार्कलिस्ट", अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या संदर्भात दिनांक ३०-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेला त्यांचा दिनांक २०-०२-२००९ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे "व्यक्तिशः" माहिती मागितल्यानंतर या अर्जाच्या पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेणे ही अपिलार्थीची जबाबदारी होती. परंतु या प्रकरणी ही जबाबदारी अपिलार्थिने प्रथमतः कशा प्रकारे पार पाडली या संदर्भात कोणतीही कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन दिलेली नाहीत. एवढे जरी असले तरीही अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे व ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१) व (९) च्या तरतुदीस कोणत्याही प्रकारे, प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे बाधा येणे संभवत नसल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता उघड करावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात या कालावधीत कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भिंगे शिवाजी रामचंद्र, द्वारा, श्री. विश्वनाथराव म्हेत्रे, भगणपुरा, राजश्री शाळेजवळ, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१४

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, : अपिलार्थी
नगर परिषद शाळा क्रमांक ९, मंठाळेनगर, तालुका जिल्हा
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, जयहिंद प्राथमिक विद्यालय, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर

त्रयस्थ पक्ष : सह शिक्षिका सय्यद रुकसाना दस्तगीर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जयहिंद प्राथमिक विद्यालय, लातूर यांना प्रथमतः माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागणारा अर्ज टपालाव्दारे पाठविला असता तो स्वीकारण्यास जन माहिती अधिकारी यांनी नकार दिला. त्यानंतर त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले,

तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्यानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देण्याचे व कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची, आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जयहिंद प्राथमिक विद्यालय, लातूर या शाळेच्या त्रयस्थ पक्ष श्रीमती सय्यद रुकसाना दस्तगीर सहशिक्षिका यांच्यासंदर्भातील वैयक्तिक माहिती इतर माहितीसह एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाळेतील अतिरिक्त शिक्षकांची यादी, शालेय पोषण आहारासंबंधी योजना सुरु झाल्यापासून २००८ पर्यंतची माहिती, सहशिक्षिका सय्यद रुकसान दस्तगीर यांच्या प्रथम, व्दितीय व कायम वैयक्तिक मान्यतेच्या सत्यप्रती, त्रयस्थ पक्ष या शाळेमध्ये शिकवत असलेले विषय व त्यांच्या सन २००७-०८ या संपूर्ण वर्षाच्या टाचणाची छायांकीत प्रत, संस्थेने घेतलेले वेतनेतर अनुदान, अनुदानाचा विनियोग कसा केला, सन २००२ पासून सय्यद रुकसानाने घेतलेल्या रजेचे विश्लेषण - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न होता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारे पत्र पाठविल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने या मुद्दयावर अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे दिनांक १४-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांच्या दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या निर्णयाव्दारे मुख्याध्यापक, जयहिंद प्राथमिक विद्यालय, लातूर यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले, परंतु यानंतरही अपिलार्थीस मुदतीत संबंधित जन माहिती

अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण सहा मुद्दयांवरील माहितीपैकी, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनमधील, ' शालेय पोषण आहारासंबंधीची योजना सुरु झाल्यापासून ते २००८ पर्यंतची माहिती ' या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शालेय पोषण आहाराची माहिती अशी सर्वसाधारण स्वरुपाची व मोघम माहिती मागितली आहे. ' शालेय पोषण आहाराची माहिती ' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावरील माहिती, हे या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये स्पष्ट केलेले नाही. अशा प्रकारची मोघम माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्यामुळे, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व ४ च्या संदर्भात, त्रयस्थ पक्ष श्रीमती सय्यद रुकसाना दस्तगीर यांच्या वैयक्तिक मान्यतेच्या सत्यप्रती, संबंधित शाळेमध्ये त्या शिकवत असलेले विषय आणि त्यांच्या टाचणाच्या प्रती, अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. ही माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी तिचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे व ही माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या कोणत्याही खाजगी बाबीत आंगतुक हस्तक्षेप होणे संभवत नसल्याने, या मुद्दयावरील त्रयस्थ पक्षासंदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित १, ५ व ६ या मुद्दयांवरील माहिती, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने

अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे, ' त्रयस्थ पक्षाने घेतलेल्या रजेचे विश्लेषण ' अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी त्रयस्थ पक्ष श्रीमती सय्यद रुकसाना दस्तगीर यांनी सन २००२ ते दिनांक ०४-१२-२००८ या कालावधीमध्ये घेतलेल्या सर्व रजेच्या अर्जांच्या प्रती अपिलार्थीस, या मुद्दयांच्या संदर्भातील माहिती म्हणून पुरवाव्यात.

अशा प्रकारे वरील परिच्छेदामध्ये, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली व त्यांना देय असलेली माहिती यांचे केलेले पृथक्करण पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती वगळता उर्वरित पाचही मुद्दयाव्दारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, नगर परिषद शाळा क्रमांक ९, मंठाळेनगर, तालुका जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जयहिंद प्राथमिक विद्यालय, प्रकाशनगर, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१५

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय कोंडीबाराव शिंतळे,<br>मु. पो. लिंबगाव (रेल्वेस्टेशन), तालुका जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख कार्यालय, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही अप्राप्त असल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे " शिपाई " या पदावर करण्यात आलेल्या भरतीसंदर्भात एकूण दोन मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. यापैकी पहिल्या मुद्दयाव्दारे, जन माहिती अधिकारी यांना तहसीलदार यांनी दिलेले डोमेसाईल सर्टिफिकेट कोणत्या शासन निर्णयाने ग्राह्य धरले नाही, त्या शासन निर्णयाची प्रत व दुस-या मुद्दयाव्दारे, अर्जासोबत डोमेसाईल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असल्याचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांनी जाहिरातीत केला नसल्याने, जन माहिती अधिकारी यांनी एम. के. सी. एल. कंपनीला तसे आदेशित का केले नाही व जर आदेशित केले असेल तर या कंपनीने उमेदवारांचे अर्ज कसे स्वीकृत केले, या प्रक्रियेमध्ये दोषी कोण, उमेदवार, एम. के. सी. एल. कंपनी की विभागीय कार्यालय, उमेदवारांच्या होणा-या नुकसानीची भरपाई कोण करणार, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, संदर्भित निवडीची प्रक्रिया ही जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली झाली असल्याने, त्यांनी मूळ अर्जातील माहिती जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अर्ज करुन मागवावी, असे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०१-२००९ रोजी निर्णय देऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा निष्कर्ष काढला व अपिलार्थीस दिनांक १९-०१-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०१-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट

ऑफ पोस्टींगव्दारे माहिती पुरविली, तथापि ही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे, आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकूण दोन मुद्दयाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण या मुद्दयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. अर्जदाराने माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडील माहिती देणे या प्रक्रियांमध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाची कारणे व स्पष्टीकरणे विचारणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाची स्पष्टीकरणे देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नाहीत, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक दोनशी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एकशी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही

माहिती अपिलार्थीस प्रथमतः देताना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांच्याकडून घेण्याचे सूचित करणा-या माहितीतील ' शिपाई ' या पदाच्या भरती प्रक्रियेबाबतची संपूर्ण जबाबदारी उपसंचालक भूमि संचालाक यांच्या कार्यालयाची असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५-०१-२००९ रोजीच्या दिलेल्या आदेशावरुन स्पष्ट होते, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध असूनही त्यांची अपिलार्थीस जमाबंदी आयुक्ताकडे माहिती मागण्याचे सूचित करण्याची कृती ही अपिलार्थीची दिशाभूल करणारी आहे, असे आयोग मानतो. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर मात्र दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती पुरविलेली आहे. हीच माहिती जर जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली असती तर, कदाचित अपिलार्थीस प्रथम व व्दितीय अपील करण्याचा खटाटोप करावा लागला नसता. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय संबंधित जन माहिती अधिकारी यांनी प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस प्रथमतः दिशाभूल करणारी माहिती देण्याच्या व त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देण्याच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावामुळे ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (उपसंचालक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांच्या कार्यालयात दिनांक १८-०९-२००८ रोजी व तदनंतर ३० दिवसांच्या कालावधीपर्यंत जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत असलेले अधिकारी) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगास असे आढळून आले

आहे की, जन माहिती अधिकारी यांनी जरी, अपिलार्थीस दिनांक २३-०१-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे माहिती मिळाल्याचा पुरावा, आयोगास सादर केला असला तरीही, त्यांनी त्यांच्या दिनांक २३-०१-२००९ रोजीच्या पत्राची एक अतिरिक्त प्रत आता अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एकशी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी (उप संचालक भूमि अभिलेख औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांच्या कार्यालयात दिनांक १८-०९-२००८ रोजी व तदनंतर ३० दिवसांच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय कोंडीबाराव शिंतळे, मु. पो. लिंबगाव (रेल्वेस्टेशन), तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख

कार्यालय, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, भूमि अभिलेख, औरंगाबाद प्रदेश, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, साधुवासवाणी, चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१६

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर, : अपिलार्थी

व्दारा, मनोज बाबुराव शिंदे, मोतीनगर, रिंग रोड, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

नगर परिषद, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

नगर परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी श्री. अनिल ह. मुळे यांच्याकडून त्यांना कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याने आणि आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, लातूर नगर परिषदेच्या आवक जावक रजिस्टरच्या संदर्भात, सन

२००० ते दिनांक ३१-१२-२००८ या कालावधीशी संबंधित एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - आवक जावक रजिस्टर सन २००० पासून आजपर्यंतच्या दररोजच्या होत असलेल्या प्रत्येक दिवसाच्या नोंदीच्या छायांकीत प्रती, गांधी चौकातील नगर परिषदेच्या गाळे हे सन २००१ ते दिनांक ३१-१२-२००८ पर्यंत ज्या गाळेधारकांना वाटले त्या गाळेधारकांची नावे, संबंधित गाळे ट्रान्सफर झाले याची सूची व सद्यस्थितीत ते कोणाच्या नावावर आहेत, त्याच्या करारनाम्याच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे अनिवार्य आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे, तथापि आयोगाकडे सादर करण्यात

आलेल्या व्दितीय अपील अर्जाच्यासोबत, त्यांनी त्यांचे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही, त्यामुळे जरी अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसतील तरीही, आता त्यांना सशुल्क माहिती देण्याचा अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेला कालावधी व्यपगत झाला असल्याने, अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आता अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, त्यांना असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून ही माहिती संबंधितांकडून स्वतः हस्तगत करुन घ्यावी. अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती विनामूल्य देय असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रमेश बाबुराव क्षीरसागर, व्दारा, मनोज बाबुराव शिंदे, मोतीनगर, रिंग रोड, लातूर.

२ जन माहिती अधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, नगर परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१७

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, : अपिलार्थी

रा. ठाकूर निवास, बढाई गल्ली, औरंगपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, विचाराधीन अपील मंजूर करण्याची आयोगास विनंती केली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २०-०४-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १०१७/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, रा. ठाकूर निवास, बढाई गल्ली, औरंगपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१८

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. अंभुरे नथुराम मुंजाजी, : अपिलार्थी
आंबेडकरनगर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या अपील अर्जावर अद्यापपर्यंत कोणतेही उत्तर जन अपिलीय अधिकारी यांनी न दिल्याने व त्यांना आवश्यक असलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याकरिता, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ' सेलू तालुका दक्षता समिती ' च्या संदर्भात काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सेलू तालुका दक्षता समिती नेमली गेल्यापासून ते अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करेपर्यंत झालेल्या बैठकांची संख्या, तालुका दक्षता समितीची बैठक प्रत्येक महिन्याला घेता येते का ?, अपरिहार्य कारणास्तव अध्यक्षांकडून बैठकीची तारीख निश्चित करुन मिळाली नाही तर, दक्षता समितीचे सचिव यांना बैठक बोलाविता येते का ? - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याच्या कारणाने, यानंतर, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे तहसीलदार, सेलू यांना, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सेलू तालुका दक्षता समितीच्या संदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती

मागितली होती, त्यातील ' सेलू तालुका दक्षता समिती नेमली गेल्यापासून ते दिनांक २५-०९-२००८ पर्यंत दक्षता समितीच्या झालेल्या बैठकांची संख्या, ' या मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती वगळता, उर्वरित दोनही मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही, कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागविल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीमध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना देण्यासंदर्भात कार्यवाही करणे, इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या अधिनियमामध्ये, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरणे मागविणे व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या शंकांना उत्तरे देणे, स्वतःची मते मांडणे, अभिप्राय देणे अशा प्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती देय होत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती मात्र देय होत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणी त्यांच्या दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत तहसीलदार, सेलू यांच्याकडून कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी स्वतः हस्तगत करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीच्या दिनांक २५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंभुरे नथुराम मुंजाजी, आंबेडकरनगर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११५

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अंकुश बाबाराव भालेराव,<br>रा. नितिन सोळंके यांचा वाडा, रेल्वेगेट, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, बळीराम पाटील महाविद्यालय, गोकुंदा,<br>ता. किनवट, जि. नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्राचार्य, बळीराम पाटील महाविद्यालय, गोकुंदा,<br>ता. किनवट, जि. नांदेड | : प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी : | प्राध्यापक, बळीराम पाटील महाविद्यालय, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी : | सहसचिव, किनवट शिक्षण संस्था, किनवट, जि. नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन

त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बळीराम पाटील महाविद्यालय, गोकुंदा यांच्याकडे त्यांच्या दिनांक २१-१२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्यांच्या संस्थेसंदर्भात सन २००२ ते २००९ या कालावधीशी संबंधित विस्तृत व्याप्ती असलेली काही माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यासाठी ५५६/- रु. इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयाकडे करण्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काचा संपूर्ण तपशील कळविला आहे आणि हा पत्रव्यवहार अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या रजिस्टर्ड पत्राचा स्वीकार अपिलार्थीने न करता दिनांक २१-०३-२००९ रोजी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००९ रोजी अपिलार्थीस परत अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे त्यांच्या दिनांक १६-०३-२००९ रोजीच्या पत्राची प्रत पाठविली. या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे कळविले होते. तथापि ही रजिस्ट्री

अपिलार्थीने सोडवून न घेतल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जावर व प्रथम अपील अर्जावर केलेल्या सहीमध्ये फरक आहे. अपिलार्थी हे आपला पत्ता सतत बदलत असतात आणि माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग करुन, खंडणी घेताना त्यांना रंगेहाथ पकडून त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ दैनिक लोकमतच्या नांदेड आवृत्तीमधील दिनांक २४-०३-२००९ रोजीच्या बातमीचे कात्रण त्यांनी आयोगास सादर केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपील व जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागताना माहितीच्या अर्जावर दिलेला त्यांचा पत्ता या दोन्ही पत्त्यामध्ये फरक आहे. अपिलार्थीच्या दिनांक २१-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदी प्रमाणे आवश्यक असलेला तपशील देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना कळविले आहे. तथापि अपिलार्थीने या पत्राचा स्वीकार न केल्यामुळे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितपोटीच्या शुल्काची कोणतीही कल्पना आली नाही. यामध्ये जन माहिती अधिकारी हे कोणत्याही प्रकारे दोषी असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत. त्यामुळे अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांना अद्यापही त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आवश्यक असेल तर त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी सूचना केलेले शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी. या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे वर नमूद केल्याप्रमाणे सिध्द होत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अंकुश बाबाराव भालेराव, रा. नितिन सोळंके यांचा वाडा, रेल्वेगेट, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक, बळीराम पाटील महाविद्यालय, गोकूंदा, ता. किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहसचिव, किनवट शिक्षण संस्था, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११६

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

१ श्री. मठपती दत्तात्रय शिवलिंगअप्पा, : अपिलार्थी
मु. पो. कोठारी (सिं) व्हाया मांडवी, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या दिनांक २९-०६-२००४ रोजीच्या प्राथमिक पदवीधर आदेशा-संदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्ष श्री सोमशेटवार संतोष राजेश्वर, सह शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपरी,

तालुका हिमायतनगर यांची जन्मतारीख, श्री. सोमशेटवार यांना प्राथमिक पदवीधर म्हणून दिलेल्या आदेशाची प्रत, श्री. मठपती डी. एस. यांना दिनांक २९-०६-२००४ रोजी प्राथमिक पदवीधर म्हणून आदेश न देण्याचे कारण व सदरील यादीतून दिनांक ०१-०१-२००८ प्रथम नेमणूक असलेल्या किती लोकांना डावलले त्यांची नावासह संख्या - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून साध्या टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, एकूण चार मुद्दयाव्दारे, काही माहिती सार्वजनिक स्वरुपाची व काही माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित मागितली आहे. अपिलार्थीने या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे श्री. डी. एस. मठपती यांना प्राथमिक पदवीधर म्हणून दिनांक २९-०६-२००४ रोजीचे आदेश न देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशा प्रकारे मागितलेल्या या मुद्दयावरील माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे ती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी

यांच्याकडून देय असणार नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाची कारणे मागणे आणि जन माहिती अधिका-याने अर्जदारास अशा प्रकारची कारणे अथवा त्याचे स्पष्टीकरण देणे, अशा प्रकारची प्रक्रिया मूळात अभिप्रेत नसल्यामुळे, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती देय असणार नाही, उर्वरित तीन मुद्यांपैकी मुद्दा क्रमांक १ व २ व्दारे, अपिलार्थीने जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असली तरी, तिचे सार्वजनिक स्वरुप पाहता, ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिका-याने उघड करण्यास त्यांना कोणताही प्रत्यवाय असू नये. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ वगळता, उर्वरित तीन मुद्दयावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज आणि त्यावरील अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे सादर केले असल्याचे व त्यांना ते प्राप्त झाल्याचे या प्रतींवरील त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपिकाच्या सहीवरुन आणि त्यांच्या कार्यालयाच्या शिक्क्यावरुन आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या जन माहिती अधिका-याने प्रथमतः नाकारली नाही अथवा ती त्यांना देण्याबाबत अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहारही केला नाही. अशा प्रकारे अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००९ रोजीच्या अर्जावर अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही न करुन, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक तीन वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मठपती दत्तात्रय शिवलिंगअप्पा, मु. पो. कोठारी (सिं) व्हाया मांडवी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६५

निर्णय दिनांक २०-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण,<br>एस. पी. ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,<br>नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०१-२००८ रोजी नोंदविलेले आणि दिनांक ०३-०२-२०१० रोजी फेरसादर केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना, अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली नसल्याने व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणीवपूर्वक अपुरी माहिती दिल्याचे निदर्शनास येत असल्याने, संबधितांवर विभागीय चौकशी करुन त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आणि अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्याचे आदेश द्यावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन २००२ ते २००६ या कालावधीतील नांदेड सरहद्द ते - निळा - नांदेड प्रजिमा ७१, कि. मी. ०/० ते ११/० या रोडवर हुडको, नाबॉर्ड, सी. आर. एस. आर., गट (ब) गट (अ) गट (इ) या शिर्षाखाली करण्यात आलेल्या कामांचे मंजूर अंदाजपत्रक, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त इस्टीमेट, मंजूर निविदा, स्वीकृत केलेले टेंडर व त्याचे इन्व्हलप, दिलेल्या बिलाच्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, फर्स्ट रनिंग बिल ते फायनल बिलापर्यंत सी. सी. तसेच आणलेल्या डांबराच्या मूळ गेटपासच्या सत्यप्रती, आर. एम. आर., अशी माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने दिनांक २६-०९-२००७ रोजी शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-१०-२००७ रोजी माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-११-२००७ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस दिनांक २९-११-२००७ पर्यंत उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि यानंतरही अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील काही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आणि अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीतील, दिलेल्या बिलाच्या मोजमाप पुस्तिकेच्या प्रती, नाबॉर्ड योजने संबंधित प्रती, आर. एम. आर. आणि डांबराच्या

गेटपासच्या सत्यप्रती आणि सी. सी. रनिंग बिलाच्या प्रती, ही माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरीत मिळावी आणि त्यांना माहिती न पुरविणा-याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात यावी.

अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वत: किंवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे बाकी असलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत व तिचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे, ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे पुरविणे भाग आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, त्यांनी युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेली, त्यांना अद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांचा प्रथम अर्ज केलेला दिनांक, अपिलार्थीस शुल्क भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या पत्राचा दिनांक, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्याचा दिनांक पाहता, अधिनियमातील कलम ७ (३) (क) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस ही माहिती दिनांक २८-०९-२००७ पूर्वी सशुल्क देणे गरजेचे असताना, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ०३ ऑक्टोबर २००७ रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्यासाठी घेतलेला कालावधी हा अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त असल्यामुळे, आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी-

कडून माहितीपोटीचे आकारलेले शुल्क रुपये १,७०० इतके त्यांना परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १,७०० इतके त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच दहा दिवसाच्या आत परत करावे, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न पुरवता व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशाव्दारे विहित केलेल्या कालमर्यादेमध्ये देखील न पुरवून, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या सहायकांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये १,७०० इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत परत करावे.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाशी संबंधित सहायकांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २०-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शर्मा राजेंद्र हरीनारायण, एस. पी. ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२४
निर्णय दिनांक: २१-०४-२०१०

१. श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, : अपिलार्थी
रा.गडगा, ता.नायगाव (खै.), जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पंचायत समिती कार्यालय,नायगाव खै., जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नायगाव तालुक्यातील एकूण गावांची संख्या व प्रत्येक गावातील डी.आर.डी.च्या लाभधारकांची संख्या,सन २००२-२००३ च्या यादीत समाविष्ट असलेल्या लाभधारकांची संख्या,प्रतिक्षा यादीतील लाभधारकांची संख्या,आजपर्यंत २००२-०३ च्या डी.आर.डी. व प्रतिक्षा यादीतील लाभ मिळालेल्या लाभधारकांची संख्या,प्रतिक्षा यादीतील ग्रामपंचायतच्या फलकावर गुणनिहाय असणाऱ्या लाभार्थ्यांच्या नावासह व गावासह माहिती, प्रतिक्षा यादीतील लाभधारकांना गुणनिहाय घरकुल वाटप करण्यात आले आहे काय? व

डी.आर.डी.च्या व प्रतिक्षा यादीतील सर्व लाभधारकांच्या नावासह व गुणक्रमांकासह गावनिहाय यादी, अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २७.०२.२००९ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकरी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना संबंधितांच्याकडून त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०२.०१.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाच्या सहीवरुन आणि त्यांच्या कार्यालयाच्या शिक्क्यावरुन स्पष्ट होत आहे.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी, "प्रतिक्षा यादीतील लाभधारकांना गुणनिहाय घरकुल वाटप करण्यात आले आहे काय?" या मुद्यावरील माहिती,ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती, ती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. त्याचप्रमाणे अधिनियमातील सशुल्क

माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाल्यामुळे अपिलार्थीस देय होणारी ही माहिती जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, नायगाव यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील परिच्छेदातील मुद्दा वगळता उर्वरित सर्व माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती मागितली असता, अर्जदाराचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत अर्जदारास माहिती देणे अथवा ती नाकारणे असे दोनही पर्याय उपलब्ध आहेत. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक अथवा नकारात्मक यापैकी कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन,अंतिमतः अपिलार्थीस माहिती न दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीचे वेळी ते अनुपस्थित आहेत. त्यांना बचावाची संधी देण्याच्या दृष्टीने, त्यांचेवर शास्ती लावण्यापूर्वी या प्रकरणी त्यांचा खुलासा प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. सबब जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, नायगाव यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०२.०१.२००९ रोजीच्या (अर्जावरील दि.०१.०१.२००९) अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याबद्दल व अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास,

अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगाव,जि.नांदेड यांनी या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगाकडे या कालावधीमध्ये खुलासा सादर करतील, असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व देय असलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले,रा.गडगा, ता.नायगाव(खै), जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,नायगाव खै., जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(नोंदणीकृत टपालाद्वारे)

३.	जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,नायगाव (खै.),जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२५
निर्णय दिनांक: २१-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. भाऊसाहेब कऱ्हाळे पाटील,<br>रा. औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय,<br>गंगापूर, जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, गंगापूर,<br>जि.औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकाराखाली अपिलामध्ये मागितलेली माहिती त्यांना समाधानकारक प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, त्यांनी दि. २७.०१.२००९ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जवाहर योजनेअंतर्गत मागितलेल्या माहितीचा अर्ज व त्यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती, सोबत जोडली आहे. या विषयामध्ये भ्रष्टाचार झाला असावा, असे अपिलार्थीस वाटते म्हणून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना दंड लावण्याकरिता शिफारस करावी आणि माहिती

अधिकाऱ्यावर नियमानुसार चौकशी करावी व तसेच अपिलार्थीचा वेळ वाया गेल्यामुळे मानसिक त्रास व आर्थिक नुकसान झाल्यामुळे अपिलार्थीस नुकसान भरपाई देण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, गंगापूर पंचायत समिती कार्यालय,गंगापूर यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत सन २००७-०८ या कालावधीमध्ये जवाहर रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर विहिरीसंदर्भात एकूण १० मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी नेमका कशाप्रकारे प्रतिसाद दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांअभावी आढळून येत नाही, परंतु अपिलार्थीने त्यांना समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांअभावी कळण्यास मार्ग नाही, परंतु अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०१.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत आणि त्या संदर्भातील त्यांच्या दि. २३.०३.२००९ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जाची प्रत एवढीच कागदपत्रे आयोगास त्यांच्या द्वितीय अपिलासोबत सादर केली आहेत. आयोगास," जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती सोबत जोडली आहे", असे त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.तथापि अपिलार्थीने

अशाप्रकारची कोणतीही माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेली नाही, तसेच अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे, असे असे नमूद केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून नेमकी कोणती माहिती प्राप्त होणे बाकी आहे व प्राप्त माहितीने त्यांची कशाप्रकारे दिशाभूल झाली आहे, याचे स्पष्ट विवेचन आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांनी केलेले नाही अथवा त्यांचे म्हणणे तोंडी अथवा लेखी स्वरुपात सादर करण्यासाठी ते आज रोजी सुनावणीस आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, आवश्यक त्या कागदपत्रांअभावी व सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भाऊसाहेब कऱ्हाळे पाटील, जी-१/२८२,त्रिवेणीनगर, सिडको,एन-७,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय,गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२६
निर्णय दिनांक: २१-०४-२०१०

१. कु.मनिषा आण्णासाहेब थेटे, रा. वैजापूर,जि.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २०.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषदेने सन २००८-०९ या कालावधीमध्ये नियुक्त केलेल्या शिक्षणसेवकांसंदर्भात काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये जिल्हा परिषदेने नेमणूक केलेल्या शिक्षणसेवकांची यादी (नियुक्तीच्या गावासह), नियुक्ती दिलेल्या शिक्षण सेवकांपैकी हजर होऊन राजीनामा दिलेल्या

उमेदवारांची यादी व संबंधित पंचायत समितीकडून परस्पर मूळ कागदपत्रे घेऊन गेलेल्या उमेदवारांची यादी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही विशिष्ट माध्यमाद्वारे मागितल्याचे आयोगास आढळून येत नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयीन दि. ०३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, प्राथमिक शिक्षण सेवकांच्या भरती विषयीची प्रवर्गनिहाय उमेदवारांची यादी, तसेच दि. १८.०२.२००९ व २०.०२.२००९ रोजी नेमल्या गेलेल्या उमेदवारांची यादी, जिल्हा परिषद कन्या प्रशाला, येथील नोटीस बोर्डावर दि. १५.१२.२००८ रोजी लावली असल्याचे व त्या माहितीचे अवलोकन करावे, असे अपिलार्थीस सूचित केले व शिक्षण सेवकांपैकी हजर होऊन राजीनामा दिलेल्या व पंचायत समितीमधून परस्पर कागदपत्रे घेऊन गेलेल्या कागदपत्रांच्या बाबतीत अपिलार्थीस गट शिक्षणाधिकारी तथा जन माहिती अधिकारी सर्व पंचायत समिती यांच्याकडून परस्पर माहिती घेण्याचे सूचित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे यासंदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील एकूण ३ मुद्यांपैकी मुद्दा क्र. ३ च्या संदर्भातील माहिती ही शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरांबाद यांच्या कार्यालयाशी संबंधित नव्हती अथवा ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध

असणे हे कोणत्याही प्रकारे संभवत नव्हते. परंतु ही कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याच प्राधिकरणाचा एक भाग असलेल्या गट शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध असण्याची शक्यता होती. अशावेळी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदींचा वापर करुन अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्यासंदर्भात औरंगाबाद जिल्हयातील सर्व पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकाऱ्यांकडे अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत, अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत, पाठवून,या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीस संबंधित पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकाऱ्यांकडून परस्पर माहिती घेण्याचे सूचित केले. तसेच अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असतानाही अपिलार्थीस दि. ०३.०३.२००९ रोजी जिल्हा परिषद, कन्या प्रशाला,औरंगाबाद यांच्या नोटीस बोर्डावर दि. १५.१२.२००८ रोजी लावलेली व तदनगर दि. १८.०२ व २०.०२.२००९ रोजी लावलेल्या यादीचे अवलोकन करण्याचे सूचित केले.जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अशाप्रकारे प्रतिसाद देण्याची कृती पूर्णतया चुकीची आहे. अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतुपूरस्सर टाळाटाळ केली, असे म्हटल्यास ते फारसे वावगे होईल, असे आयोगास वाटत नाही. केवळ जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या चुकीच्या कृतीमुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिल्याचे आयोगास आढळून येत आहे. कारण ज्या याद्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने नोटीस बोर्डावर लावल्या होत्या, त्या याद्यांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सशुल्क देणे, ही बाब जन माहिती अधिकारी यांच्याकरिता फारशी अवघड किंवा अशक्य कोटीतील होती, असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली इतक्या सीमित व्याप्तीची माहिती देखील अपिलार्थीस विहित मुदतीत न देऊन संबंधित शिक्षणाधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावच अधिक स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय

अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दि. १६.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची कोणतीही दखल न घेता अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यासाठी वंचित ठेवण्यामध्ये अधिकची भरच, त्यांनी या प्रकरणी घातल्याचे आयोगास आढळून आले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे व ती देण्यासाठी वरील परिच्छेदामध्ये निर्देशित केलेल्या अनियमितता पाहता,ती आता शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती जरी संबंधित पंचायत समितीकडे असली तरी, आता अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी असमर्थनीय विलंब झाला असल्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती देखील शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती पुढे आदेशित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २०.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतुपूरस्सर टाळल्याचे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे नि:संशयपणे सिध्द होत असल्यामुळे व परिणामी शिक्षणाधिकारी यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस स्वत:ला पात्र ठरविले असल्यामुळे सचिव (शालेय शिक्षण) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) नुसार 'माहिती अधिकारी', असे समजावे, अशी तरतुद आहे, या

सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दि. २०.०२.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरवावी.

३. सचिव (शालेय शिक्षण) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. कु.मनिषा आण्णासाहेब थेटे,रियल मोटर ट्रेनिंग स्कूल, मुरारी पार्क, वैजापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०९८
निर्णय दिनांकः २१-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अजित किसनलाल कोठारी,<br>रा.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, जालना | | |

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (संजय गांधी योजना), तहसील कार्यालय,जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून, असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ०१.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ०१.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी यासंदर्भात कोणतीही सुनावणी घेतली नाही व अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दि. ०१.०१.२००५ ते ३१.१०.२००८ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे राष्ट्रीय कुटुंब सहाय्य योजना व संजय गांधी निराधार योजना

यामध्ये ज्या कुटुंबांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे, त्यांची यादी, कुटुंबाचे संपूर्ण नाव व पत्ता, अशी माहिती अतिशीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.१२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. या प्रकरणी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर आणि त्यासंदर्भात केलेल्या प्रथम अपील अर्जावर नायब तहसीलदार आणि तहसीलदार, जालना यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यांच्या कार्यालयात माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी कोण आहेत, हे आवश्यक त्या फलकाअभावी त्यांना समजू न शकल्यामुळे त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अर्ज तहसीलदार,जालना यांच्याकडे केला होता.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो),जालना यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नुकतेच बदलून आले असून अपिलार्थीने ज्यावेळी तहसील कार्यालयाकडे माहिती मागितली होती, त्यावेळी श्री. खरात नावाचे नायब तहसीलदार या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती का दिली नाही, याचे कारण ते आता सांगू शकणार नाहीत. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संजय गांधी निराधार योजनेच्या संदर्भातील माहिती त्यांनी आता त्यांच्यासोबत आणली असून ते ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार

आहेत.अपिलार्थीच्या मूळ अर्जातील राष्ट्रीय अर्थसहाय्य योजनेच्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, ही माहिती ज्या लिपीकाच्या ताब्यात आहे, त्या लिपीकाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत पुरविण्याचे त्यांनी आयोगासमोर आपल्या युक्तिवादामध्ये आश्वासित केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती केवळ माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगतच नव्हे तर अधिनियमातील कलम ४(ख)(बारा)मधील तरतुदीनुसार ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्राधिकरणासारख्या प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने घोषित करावयाची अशी माहिती आहे. या प्रकरणी अशाप्रकारची माहिती ही स्वयंप्रेरणेने घोषित करणे तर सोडाच परंतु ही माहिती तहसीलदाराकडून मिळविण्यासाठी जनसामान्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा वापर करुन ती मागावी लागते, ही बाब राज्य शासनाच्या महसूल विभागाला निश्चितच भुषणावह नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ४ च्या तरतुदीप्रमाणे महसूल विभागात कोणतीही कार्यवाही न केली गेल्यामुळे औरंगाबाद महसूल विभागाच्या कारभारात पारदर्शकता येण्याऐवजी ते अधिकाधिक अपारदर्शक झाले असल्याचे आयोगास आढळून येत आहे. विचाराधीन प्राधिकरणामध्ये देखील अपिलार्थीने दि. ०१.११.२००८ रोजी माहिती मागविली असता त्यांना अंदाजे सव्वा वर्ष जास्तीचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त झालेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपिलाची कोणतीही दखल घेतली नाही. परिणामी अपिलार्थी हे त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून, सदर माहिती प्राप्त होण्याचा त्यांचा हक्क असतानाही, या हक्कापासून त्यांना, यासंदर्भातील जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार श्री. खरात यांनी वंचित ठेवल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी,श्री. खरात यांनी या

प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवून स्वत:ला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. आज रोजी सुनावणीसाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यांचे या प्रकरणी म्हणणे नोंदविण्याच्यादृष्टीने, त्यांना त्यांच्या बचावाची एक संधी उपलब्ध करुन देण्याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी श्री. खरात (नायब तहसीलदार (निवडणूक शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.११.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याबद्दल व अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यासंदर्भात सध्याचे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (सं.गा.यो.)जालना,श्री. के.बी.बहुरे यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी तहसीलदार, जालना यांनी अपिलार्थीच्या दि. ०१.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची उपेक्षा करुन व अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून अप्रत्यक्षपणे वंचित ठेवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद सचिव (महसूल) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

मराठवाडा विभागामधील महसूल विभागामध्ये, महसूल विभागाकडे अंमलबजावणीसाठी असलेल्या अशाप्रकारच्या अर्थसहाय्याचा समावेश असलेल्या योजनांची तसेच अन्नधान्य आणि रॉकेल वितरणासंदर्भात जनसामान्यांना कोणतीही माहिती सहज उपलब्ध होऊ शकत नाही, असे आयोगास त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या विविध प्रकरणांवरुन आढळून आले आहे. सबब सचिव (महसूल) यांना अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) अन्वये आयोगातर्फे असे सूचित करण्यात येत आहे की,त्यांनी त्यांच्या पातळीवरुन त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शासनाकडून अर्थसहाय्य प्राप्त होणाऱ्या योजनेंच्या संदर्भात व तसेच जीवनावश्यक वस्तुंच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेसंदर्भात आवश्यक ती माहिती (उदा. योजनेचे नाव, दिलेले आर्थिक सहाय्य,निकष, लाभार्थ्यांची यादी, प्रत्येक तालुक्याला करण्यात येणाऱ्या धान्य व रॉकेल पुरवठा, पुरवठा करण्यात आलेल्या एजन्सीचे नाव इत्यादी संदर्भातील माहिती) स्वयंप्रेरणेने घोषित करण्याच्यासंदर्भात त्यांच्या स्तरावर एक परिपत्रक निर्गमित करावे.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जालना,तहसील कार्यालयामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक अद्यापपावेतो लावले गेले नसल्याचे म्हटले आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी, जालना यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व तहसील कार्यालयाअंतर्गत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक अभ्यागतांना सहजरित्या दृष्टोत्पत्तीस येतील, अशापध्दतीने लावली गेली आहेत, याची खात्री करुन घ्यावी व तसा अहवाल आयोगास सदर आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. खरात (सध्या नायब तहसीलदार (निवडणूक शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय,जालना या पदावर कार्यरत) यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित किसनलाल कोठारी,घर नं. २.२०.१५,पारसी गल्ली, बेंझजी रोड, काद्राबाद,जालना

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संजय गांधी योजना), तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. श्री. खरात,नायब तहसीलदार तत्कालीन जन माहिती अधिकारी (सध्या नायब तहसीलदार (निवडणूक शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय,जालना या पदावर कार्यरत) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(नोंदणीकृत टपालाद्वारे)

४. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जिल्हाधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१११७
निर्णय दिनांकः २१-०४-२०१०

१. श्री. विठ्ठल तुळशीराम माने, : अपिलार्थी
रा.नागराळ, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसील कार्यालय,उमरगा, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद.

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,उमरगा, जि.उस्मानाबाद.

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, उमरगा, जि.उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. एम.आर.नटवे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारल्यामुळे आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या त्रयस्थ पक्षाच्या मालमत्तेसंदर्भातील मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १५.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, उमरगा यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील लिपीक,श्री. एम. आर. नटवे, या कर्मचाऱ्यांच्या वडिलोपार्जित व अपिलार्थीने अर्ज करण्याच्या दिनांकाच्या वेळी

अस्तित्त्वात असलेल्या मालमत्ता, जमिनजुमला, इमारत, दागदागिने, रोख रक्कम, बँकेतील गुंतवणूक व इतर स्थावर व जंगम मालमत्तेविषयी माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०३.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०३.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुाावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले असल्याचे आयोगास अवगत केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील लिपीक,श्री. नटवे या कर्मचाऱ्याच्या स्थावर व जंगम मालमत्तेची माहिती मागविली आहे. तथापि ही माहिती उघड झाल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होणार आहे, हे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केलेले नाही व तसेच या मुद्यावर तोंडी खुलासा करण्यासाठी देखील ते आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची नोंद घेण्यात येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, ही निश्चितपणे कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा

हितसंबंधितांशी काहीही संबंध नसलेली, अशाप्रकारची आहे. मात्र ही माहिती उघड केल्यास अधिनियमातील कलम ८(१)(ञ) च्या तरतुदीचा भंग होऊन त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही माहिती अपिलार्थीस उघड केल्याने वर नमूद केल्याप्रमाणे कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल, असे आयोगास वाटत नाही व यासंदर्भातील कोणताही युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत, अशाप्रकारच्या विषयावर या खंडपीठाने वेळोवेळी सार्वजनिक प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मालमत्तेचा तपशील उघड करणे हे वरील कारणास्तव योग्य होणार नाही, अशाप्रकारची भूमिका घेतली आहे, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २१-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल तुळशीराम माने,रा.नागराळ (गुं.),मु.पो.गुंजोटी, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय,उमरगा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उमरगा,जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०१९

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

१ श्री. चव्हाण प्रमोद राजेश्वरराव, : अपिलार्थी
मु. पो. नानेगांव, ता. बदनापूर, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत नानेगांव, ता. बदनापूर, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बदनापूर,
जि. जालना

त्रयस्थ पक्ष : १) श्रीमती कुशवर्ता रघुनाथ नहाने
२) श्रीमती रुख्क्मनबाई गोपीनाथ माणेकर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती संबंधितांच्याकडून त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही आजपर्यंत उपलब्ध न झाल्याने त्यांच्यावर योग्य ती शास्ती लावण्यात यावी व त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्रीमती कुशवर्ता रघुनाथ नहाने, व माणेकर या दोन महिलांच्या संदर्भात आणि ग्रामपंचायतीने घेतलेल्या ग्रामसभेच्या संदर्भात एकूण १० मुद्यांद्वारे विविध प्रकाराची माहिती विचारली होती.

अपिलार्थीने त्यांचा सदरचा माहितीचा अर्ज राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११-१०-२००५ रोजीच्या क्रमांक आर. टी. आय. २००५ / सिआर / ३१५/ ०५/ ५ या अधिसूचनेप्रमाणे न करता एका साध्या कागदावर अर्ज केला आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे, याचा उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने त्यांना माहिती विहित वेळेत न मिळाल्याच्या कारणास्तव अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्याकडे दिनांक २६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नानेगांव यांना आदेशित केले. तथापि या नंतर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे प्रतिपादन करुन, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या साध्या कागदावर केलेल्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १० मुद्यांवर माहिती मागविली होती. यातील बहुतांश मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती ही त्यांचे अभिप्राय व खुलासे अपेक्षित करणारी असल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासे वजा त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी  माहिती विचारणे अभिप्रेत नाही.  माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येची व्याप्ती व अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्ष श्रीमती नहाने व श्रीमती माणेकर यांचे वारसा प्रमाणपत्र, ग्रामपंचायत नानेगांव येथे दिनांक २६-०१-२००९ रोजी झालेल्या ग्रामसभेच्या नोटिशीची प्रत, सभेच्या प्रोसेडींगची प्रत व ग्रामस्थांची उपस्थिती आणि ग्रामपंचायतीच्या जमा खर्चास सन २००३ ते २००८ या कालावधीमध्ये प्रत्येक वर्षी संबंधितांच्याकडून घेतलेल्या मंजुरीचा दिनांक व मंजूरीची रक्कम एवढीच माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे ही माहिती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू नये. सबब जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, नानेगांव, ता. बदनापूर यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या माध्यमाद्वारे माहिती अपेक्षित आहे याचा खुलासा केला नसल्यामुळे, अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितल्याचे गृहीत धरुन, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त कालावधीमध्ये ग्रामसेवक, ग्रामपंचायत नानेगाव यांच्याशी कोणत्याही कार्यालयीन दिवशी, पूर्वनियोजित वेळी स्वतः संपर्क साधून ही माहिती त्यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चव्हाण प्रमोद राजेश्वरराव, मु. पो. नानेगांव, ता. बदनापूर, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नानेगांव, ता. बदनापूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, बदनापूर, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२०

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मरकड अंकुशराव दादाराव,<br>मु. पो. गोंदी, ता. अंबड, जि. जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, गोदावरी शिक्षण संस्था (प्रशाला), मुलांची<br>शाळा, गोंदी, ता. अंबड, जि. जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, अंबड,<br>जि. जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गोदावरी शिक्षण संस्था, मौजे गोंदी, ता. अंबड यांच्या विरुध्द दिनांक ०३-०३-२००९ रोजी दिलेले अपील जन अपिलीय अधिकारी यांनी दाखल न करुन घेतल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गोदावरी शिक्षण संस्था (प्रशाला), मुलांची शाळा, गोंदी, ता. अंबड यांच्याकडे, त्यांच्या शाळेविषयी एकूण १४ मुद्यांद्वारे वेगवेगळ्या मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी कोणत्या साली पदभार स्वीकारला त्यांचा दिनांक, त्यांचा सुरुवातीचा पगार, संस्थेला शासकीय ग्रॅन्ट मिळाल्यापासून त्यांना मिळणारा पगार, शाळेतील शिक्षकांची संख्या, त्यांची नावे, शैक्षणिक पात्रता, प्रत्येक शिक्षकाला दरमहा दिला जाणारा पगार, शिक्षकांच्या नावासहीत त्यांना मिळणारे मूळ वेतन, गोंदी येथील शाळेतील एकूण वर्गाची संख्या, १ली ते ४ थी वर्ग आहेत काय, प्रत्येक वर्गात किती विद्यार्थी आहेत, वर्ग १ ला, २ रा, ३ रा व ४ था यामध्ये एकूण किती विद्यार्थी आहेत त्यांची नावे, जन माहिती अधिकारी हे जालना येथे राहत असल्यामुळे ते रोज जाणेयेणे करतात काय, ते गोंदी येथील शाळेत सकाळी किती वाजता हजर राहतात, जन माहिती अधिकारी हे सन २००५-०६- व २००७-०८ मधील स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनास झेंडावंदनासाठी उपस्थित न राहण्याचे कारण काय, मौजे गोंदी येथील गोदावरी शिक्षण शाळेत मुख्याध्यापक स्त्री आहे किंवा पुरुष व मुख्याध्यापकाने दिनांक २६-०१-२००९ रोजीच्या प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहनासाठी कोठे हजेरी लावली - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी, सदरील संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण नसल्याने, अपिलार्थीचा माहिती अधिकाराचा अर्ज विहित नमुन्यात नसल्याने, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (ज) चा भंग होणार असल्याने, अपिलार्थीस ही माहिती देण्याचे, त्यांच्या दिनांक २४.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९

(१) च्या तरतुदीनुसार गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अंबड यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००९ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री. एम. एम. शेख व गट शिक्षणाधिकारी आयोगासमोर उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विहित प्रपत्रात केलेला नाही, केलेल्या अर्जामध्ये त्यांना आवश्यक असेलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख नाही व अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे या संदर्भात त्यांनी कोणताही खुलासा न केल्यामुळे व तसेच अपिलार्थीने या प्रकरणी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे प्रथम अपील करण्याऐवजी गट शिक्षणधिकाऱ्याकडे प्रथम अपील केले असल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील या तांत्रिक मुद्यावर फेटाळण्यात यावे.

गट शिक्षणाधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या कार्यालयाच्या सहायक जन माहिती अधिकारी यांनी संबंधित मुख्याध्यापकास अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांच्या दिनांक ०६-०३-२००९ रोजीच्या पत्राद्वारे सूचित केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने उपस्थित केलेल्या मुद्दयांमध्ये आयोगास तथ्य आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, त्या कालावधीचा उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक

२८-०१-२००९ रोजीच्या अर्जाद्वारे एकूण १४ मुद्यांद्वारे संमीश्र स्वरुपाची माहिती मागितली आहे. त्यामध्ये मुद्दा क्रमांक १ ते ४ संपूर्ण आणि मुद्दा क्रमांक ५ मधील, "मौजे गोंदी येथील शाळेत असलेल्या एकूण वर्गाची दिनांक २८-०१-२००९ रोजीची संख्या" हा भाग वगळता, मुद्दा क्रमांक ५ चा उर्वरित भाग आणि मुद्दा क्रमांक ६ ते ९ यातील कोणतीही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण मुद्दा क्रमांक ६ ते ९ द्वारे अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती अस्थायी स्वरुपाची असल्यामुळे आणि ती कालपरत्वे सतत बदलणारी असल्यामुळे, अपिलार्थीस निश्चित कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही व परिणामी ती मोघम स्वरुपाची असल्याचे सिध्द होत असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती देय होत नाही. अपिलार्थीच्या या अर्जातील मुद्दा क्रमांक १० ते १४ द्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्याचे अभिप्राय अपेक्षित करणारी व सार्वजनिक स्वरुपाची नसलेली अशी माहिती मागितली आहे, जी अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीत समाविष्ट होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १० ते १४ या मुद्यांवरील माहितीही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ शी संबंधित अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती अधिनियमातील कलम ४ (ख) (दहा) द्वारे विहित केलेल्या, स्वयंप्रेरणेने घोषित करावयाच्या माहितीचा एक भाग असल्यामुळे, ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील, "गोंदी येथील शाळेतील एकूण वर्ग संख्या" ही माहिती स्थायी स्वरुपाची असल्यामुळे ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. मात्र या मुद्यातील उर्वरित भाग "पहिली ते चौथी पर्यंत वर्ग आहेत काय" हा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, या भागावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

अशाप्रकारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली आणि प्रत्यक्षात त्यांना देय असलेली माहिती यांचे वरील परिच्छेदात केलेले पृथक्करण पाहता, जन

माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ संपूर्ण व मुद्दा क्रमांक ५ मधील, "गोंदी येथील शाळेतील वर्ग संख्या" ही माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत टपालाद्वारे पुरवावी. अपिलार्थीच्या दिनांक २८-०१-२००९ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला असला तरीही सदर प्रतिसाद चुकीचा असल्यामुळे व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य पुरवावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात दिनांक २४-०२-२००९ रोजीच्या पत्रामध्ये त्यांची संस्था ही सार्वजनिक प्राधिकरण नाही, अशा अर्थाचे विधान केले आहे. हे विधान चुकीचे असून या संस्थेने शासनाकडून शिक्षकांच्या पगारापुरते दरमहा नियमितपणे अनुदान मिळविले असल्यामुळे ही संस्था (प्रशाला) सार्वजनिक प्राधिकरण आहे, याची मुख्याध्यापकाने नोंद घ्यावी व इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या अर्जावर त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे योग्य प्रकारे प्रतिसाद द्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ संपूर्ण व मुद्दा क्रमांक ५ मधील, "मौजे गोंदी येथील शाळेतील वर्गाची संख्या" ही माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मरकड अंकुशराव दादाराव, मु. पो. गोंदी, ता. अंबड, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गोदावरी शिक्षण संस्था (प्रशाला), मुलांची शाळा, गोंदी, ता. अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, अंबड, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२१

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुहास किसनराव देशमुख,<br>रा. सन्मित्र कॉलनी, माजलगांव, जि. बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जि. बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जि. बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या संदर्भातील आदेशाची प्रत दिली नाही आणि अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे अवमान करुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न देऊन केलेल्या कसुरीमुळे त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही व्हावी व कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य माहिती देण्याचे आदेश द्यावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नगर परिषदेच्या विविध कामासंदर्भात काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - नगर परिषदेमार्फत

लावलेल्या पथदिव्याची निविदा जाहीर केली होती काय, पथदिवेबाबत कोणते धोरण अवलंबिले होते, पथदिव्याबाबत देयक अदा केले का, पथदिव्याचे काम कोणास दिले होते, त्याचे नियम व अटी काय आहेत, मदिना कापड दुकान ते चाऊस इलेक्ट्रीकचे दरम्यान असलेला सिमेंट रस्ता कोणत्या निकषानुसार केला आहे, नवीन नगर परिषदेच्या इमारतीचे बांधकाम अद्याप का सुरु झाले नाही, श्री. अजित पवार व आर. आर. पाटील यांच्या कार्यक्रमात किती रुपये नगर परिषदेने खर्च केले याचे विवरण, किती पथदिवे आले त्यांची रेकॉर्डवर नोंद आहे का - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जाचा निर्णय अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. परंतु या नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०३-२००९ रोजी त्यांना अपेक्षित असलेली माहिती पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि माहिती विहित मुदतीच्या आत उपलब्ध न झाल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १, २, ३ व मुद्दा क्रमांक ५ मधील, "नवीन नगर परिषद इमारतीचे बांधकाम अद्याप का सुरु झाले नाही" हा भाग व मुद्दा क्रमांक ६ मधील, "किती पथदिवे आले त्यांची रेकॉर्डवर नोंद आहे का" या भागातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती

अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्यामुळे, देय होत नाही. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागवल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारच्या प्रश्नोत्तराच्या स्वरुपातील आणि जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे अपेक्षित करणारी माहिती अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणे व जन माहिती अधिकाऱ्याने त्यांच्या कृतीबद्दलचे कारण व खुलासे अर्जदारांना देणे अशाप्रकारच्या प्रक्रियेचा माहिती अधिकार अधिनियमामध्ये समावेश नाही, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित, "पथदिव्याचे काम कोणास दिले होते" या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली आहे. तथापि कामाचे नियम व अटी या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात येत आहे की, त्यांनी माजलगांव नगर परिषेदत पथदिव्याचे जे काम योगेश इलेक्ट्रीकल्स, माजलगांव यांना दिले होते त्या कामाच्या व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ मधील, "मदिना कापड दुकान ते चाऊस इलेक्ट्रीकल्स दरम्यान असलेल्या सिमेंट रस्त्याच्या निकषासंदर्भात या रस्त्याच्या करारपत्राच्या व निविदेच्या प्रती त्यांना अपिलार्थीस या संदर्भात पुरवाव्या लागतील. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ मध्ये अपिलार्थीने श्री. अजीत पवार व आर. आर. पाटील यांच्या कार्यक्रमात झालेल्या खर्चाचे विवरण जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितले होते. तथापि या मुद्यावर अपिलार्थीस माहिती देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, रस्ते दुरुस्तीच्या कार्यक्रमासाठी ५८,०००/- इतका खर्च करण्यात आला असल्याची अपिलार्थीस माहिती दिली. या ५८,०००/- रु. खर्चाचा संपूर्ण तपशील त्यांना आता अपिलार्थीस द्यावा लागेल. कारण त्यांनी अपिलार्थीस या मुद्यावर, "मा. अजीत पवार व आर. आर. पाटील यांच्या कार्यक्रमाच्या रस्ते दुरुस्तीसाठीच्या ५८,०००/- रु. खर्च करण्यात आला आहे", असे नमूद केले आहे. अपिलार्थीने श्री. आर. आर. पाटील व अजीत पवार यांच्या कार्यक्रमासाठी नगर परिषदेने केलेल्या खर्चाचे विवरण मागितले असता त्यांच्या कार्यक्रमासाठी

केलेल्या रस्ते दुरुस्तीच्या खर्चाची जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही या प्रकरणी गैर लागू आहे. त्यामुळे या मुद्यावर नगर परिषदकडे श्री. अजीत पवार व आर. आर. पाटील यांच्या कार्यक्रमासाठी नगर परिषदेने केलेल्या बाबनिहाय खर्चाची माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शीघ्र टपालाद्वारे माहिती मागितली असताना देखिल या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यांना दिनांक १२-०३-२००९ रोजी म्हणजेच, अधिनियमाद्वारे माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर अपूर्ण माहिती पुरविली. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल संचालक, नगर परिषद प्रशासन मुंबई यांना अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी, नगर परिषद, माजलगांव (दिनांक २०-१०-२००८ रोजी कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व टपालाद्वारे पुरवावी.

३. संचालक, नगर परिषद प्रशासन यांना संबंधित जन माहिती अधिकारी, नगर परिषद, माजलगांव (दिनांक २०-१०-२००८ रोजी कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुहास किसनराव देशमुख, सन्मित्र कॉलनी, माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगर परिषद (प्रशासन) संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ४०० ०३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२२

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

१ श्री. केरुबा निवृत्ती उंबरे, : अपिलार्थी
मु. पो. पानेवाडी, ता. घनसावंगी, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
घनसावंगी, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २,
जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील घनसावंगी ते बोरगाव डांबरी रस्त्यावरील पॉट

होल फिलींगच्या , दुरुस्तीच्या व डांबरीकरणाच्या सन २००७ व २००८ मधील केल्या गेलेल्या कामाच्या बिलाच्या प्रतीची नक्कल, २००७ -०८ मधील एस. आर., सी. आर. अंतर्गत झालेल्या कामाची सी.सी. ची सत्यप्रत, घनसावंगी अंबड रस्त्यावरील रस्ता दुरुस्तीची पॉट होल फिलींग आणि रस्ता दुरुस्ती कामाच्या सी सी ची नक्कल व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाअंतर्गत घनसावंगी रेग्युलर मधून तालुक्यात किती काम झाले व किती राहिले, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ यांच्याकडे या संदर्भात दिनांक १६-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, श्री. एम. आर. सिध्दीकी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक ०५-०५-२००९ पर्यंत उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झालेली नाही. त्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर कार्यकारी अभियंता यांच्याकडे ते दिनांक ०५-०५-२००९ रोजी उपस्थित राहून त्यांना माहिती न मिळाल्याचे त्यांनी कार्यकारी अभियंता यांना लेखी पत्राद्वारे कळविले आहे. यावरुन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांचे माहिती प्राप्त करुन घेण्याबाबतचे त्यांचे अपेक्षित उत्तरदायित्व पार पाडल्याचे आयोगास आढळून येत आहे. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०२-२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्या दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या पत्रातील सूचनेप्रमाणे कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ मधील तरतूदीप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

वरील प्रकरणी श्री. एम. आर. सिद्दिकी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग घनसावंगी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व कार्यकारी अभियंता यांच्या दिनांक २८-०४-२००९ रोजीच्या पत्रासंदर्भात कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना श्री. एम.

आर. सिद्दिकी, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग  घनसावंगी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपरोक्त कालावधीमध्ये, कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी, स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना,  हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी श्री. एम. आर. सिद्दिकी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. केरुबा निवृत्ती उंबरे, मु. पो. पानेवाडी, ता. घनसावंगी, जि. जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, घनसावंगी, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२३

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

१ श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, : अपिलार्थी
रा. दाना बाजार, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
भोकरदन, जि. जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१,
जालना

त्रयस्थ पक्ष :- श्री. पवार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. पवार कनिष्ठ लिपीक, हे त्यांच्या कार्यालयात किती वर्षापासून कार्यरत आहेत, त्यांचा मूळ वास्तव्याचा पत्ता, त्यांनी नोकरीला असताना सादर केलेल्या सर्व कागदपत्राच्या सत्यप्रती, स्वातंत्र्यसैनिक यांनी करुन दिलेले

शपथपत्र व तहसील कार्यालयातून त्रयस्थ पक्षास त्यांचे पाल्य म्हणून दिलेले संबंधित पुरावे व श्री. पवार यांच्या सेवापुस्तिकेच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्षाच्या मूळ वास्तव्याचा पत्ता, स्वातंत्र्यसैनिक यांनी करुन दिलेले शपथपत्र त्याबाबत जिल्हाधिकाऱ्याने दिलेला पुरावा आणि श्री. पवार यांच्या सेवापुस्तिकेच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस दिनांक ०१-०४-२००९ रोजी उपलब्ध करुन दिली. तथापि अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये त्रयस्थ पक्ष हे नोकरीला लागताना त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रती प्राप्त न झाल्याने व तसेच श्री. पवार हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीपासून कार्यरत आहेत याची माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित व त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्ष श्री. पवार यांच्या नेमणूकीसंदर्भातील मूळ संचिकेची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही. त्या संचिकेची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जरी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागितली असली तरीही ती माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती अपिलार्थीस उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नसावा व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०४-२००९ रोजी श्री. पवार याच्या संदर्भातील त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे आढळून येत आहे. तथापि त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित, "श्री. पवार हे त्यांच्या कार्यालयात किती वर्षापासून कार्यरत आहेत" आणि मुद्दा क्रमांक ३ मधील, "त्रयस्थ पक्ष श्री. पवार यांना नोकरी लागताना त्यांच्या कार्यालयात सादर केलेल्या कागदपत्राच्या प्रती" ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस देणे बाकी असल्याचे आढळून येत आहे. वरील निर्णयाप्रमाणे ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरित करावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस न दिलेली त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपरोक्त कालावधीमध्ये कोणत्याही कार्यालयीन दिवशी पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद नदीम सय्यद फहीम, रा. दाना बाजार, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भोकरदन, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२७

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

१ श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, : अपिलार्थी
रियाज कॉलनी, शामनगर,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग,
लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः माहिती न मिळाल्याने त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, त्यांनी दिनांक २६-०२-२००९ रोजी सुनावणीनुसार अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित केले असताना देखील त्यांना, योग्य स्वरुपाची माहिती न मिळाल्याने त्यांनी, विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आयोगास, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण

माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी व तसेच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी, अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, आर्थिक वर्ष २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ मध्ये त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेल्या निधीमधून केलेल्या खर्चासंदर्भात, सन २००५ ते दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वरील कालावधीमध्ये शासनाकडून प्राप्त झालेला निधी, या निधीपैकी ज्या संस्थांना अनुदानाचे वाटप करण्यात आले त्या संस्थांच्या संबंधित मंजुरी आदेशाची सत्यप्रत व योजनानिहाय तीनही आर्थिक वर्षाची माहिती, या वर्षात अनुदान दिलेल्या संस्थांनी केलेल्या कामांचा अहवाल आणि वरील आर्थिक वर्षात व्यायामशाळा बांधकामासाठी देण्यात आलेले अनुदान, या निधीतून खर्च झालेली रक्कम व लाभ घेतलेल्या प्रत्येक संस्थेच्या व्यायामशाळेच्या व संस्थेच्या कामाचे फोटो व सीडी - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या १०,२२० इतकी असल्यामुळे, प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २०,४४० अधिक टपालखर्च रुपये १०० /- इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. या रकमेवर तदनंतर जन माहिती अधिकारी आणि अपिलार्थी यांच्यात बराच पत्रव्यवहार होऊन, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-

२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस पाच दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि या कालावधीनंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार आर्थिक वर्षाशी संबंधित त्यांच्या कार्यालयाची माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या अर्जास दिनांक २७-०१-२००९ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत, विहित केलेल्या तपशीलासह पुरविले आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आवश्यक असल्यास, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे या शुल्काचा भरणा प्रथमतः करणे अधिनियमातील कलम ७ (५) च्या तरतुदीप्रमाणे अनिवार्य होते, तथापि या शुल्काचा भरणा करण्यासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याशी बराच पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती प्रथमतः एकत्र करुन, नंतर ती अपिलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी. या माहितीमधील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिपृष्ठ रुपये दोन या

दराने तदनंतर प्राप्त करुन घेऊ शकतील. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे एकूण १५ दिवसांचा कालावधी देण्यात येत असून, या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व या माहितीपैकी जी माहिती अपिलार्थीस आवश्यक आहे ती माहिती त्यांनी, अपिलार्थीस याच कालावधीमध्ये सशुल्क पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्रथमतः तपासणीसाठी व तदनंतर त्यातील आवश्यक ती माहिती अपिलार्थीस सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, रियाज कॉलनी, शामनगर, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग,

लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११८

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. संजय वासुदेवराव टेकाळे,<br>मु. पो. शेळगांव (बु.), तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तलाठी, सजा, शेळगांव (बु.), तालुका परंडा,<br>जिल्हा उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, तालुका परंडा,<br>जिल्हा उस्मानाबाद | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, तहसीलदार, परंडा यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही रितसर कार्यवाही केली नसल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, ' मौजे शेळगांव तलाठी सजा अंतर्गत असलेली जमीन गट नंबर

९४७ मधील खातेदार रामचंद्र महादेव देशमुख यांचे क्षेत्र किती आहे ? ते क्षेत्र मिळावे, जे क्षेत्र आहे ते कशाचे आधारे आहे, तो पुरावा मिळावा ' अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, संबंधित खातेदाराचे क्षेत्र किती आहे याचा बोध त्यांच्याकडील कागदपत्रावरुन होत नाही, असे त्यांना कळविले व गट नंबर ९४७ चा ७/१२ उतारा अपिलार्थीस पुरविला, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परंडा यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास, त्यांनी अपिलार्थीस गट नंबर ९४७ च्या ७/१२ उता-याची प्रत दिनांक १३-०२-२००९ रोजी पुरविल्याचे स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परंडा यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०३-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय वासुदेवराव टेकाळे, मु. पो. शेळगांव (बु.), तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा, शेळगांव (बु.), तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६६

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

१ श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, : अपिलार्थी
मु. पो. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, तालुका
हदगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, तालुका
हदगांव, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तळणी, तालुका हदगाव, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : ग्रामसेवक, ग्रामपंचायत तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन

माहिती अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थीने त्यांच्या २९-१०-२००७ रोजीच्या अर्जान्वये मौजे तळणी येथील घर क्रमांक १०८९, १०८८ या बद्दलच्या मोजणीबाबत व १०८८ या घराच्या जागेवर केलेल्या अतिक्रमणासंदर्भात केलेल्या अर्जावर त्यांनी केलेली कार्यवाही, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांच्याकडे केला होता, त्यांनी अपिलार्थीचा सदरचा अर्ज दिनांक १९-११-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे तो या प्रकरणाशी संबंधित ग्रामसेवक तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला, तथापि त्यांच्या-कडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज व अपील अर्ज संबंधितांकडे प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, ही माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना देण्यासाठी तत्कालीन ग्रामसेवक तथा जन माहिती अधिकारी यांना कोणतीही हरकत नव्हती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती म्हणजे, त्यांनी जन माहिती अधिकारी याच्याकडे दिलेल्या तक्रार अर्जाच्यासंदर्भात, जन माहिती अधिकारी यांनी या विषयावर दिनांक १५-११-२००७ पर्यंत विविध प्राधिकरणाशी केलेला पत्रव्यवहार आणि या विषयावर त्यांच्याकडील अभिलेख्यावर असलेल्या टिपणीच्या प्रती, ही होय. ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देण्यास कोणतीही हरकत नव्हती, तथापि त्यांनी ही

माहिती अपिलार्थीस देण्यासाठी का टाळाटाळ केली, हे सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड म्हणून दिनांक १५-११-२००७ रोजी व तदनंतर तीस दिवसाच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले सर्व ग्रामसेवक यांनी, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन, स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावामुळे ते अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, मौजे तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, मौजे तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. निळकंठ भिवनाजी राऊत, मु. पो. तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत तळणी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६७

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव,<br>मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा विशेष भूसंपादन अधिकारी (ल. सि. का.), नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना दिशाभूल करणारे पत्र देऊन सत्य माहिती न दिल्यामुळे, खरी माहिती मिळण्यासाठी व माहिती मिळाल्यावर नियमानुसार शिस्तभंगविषयक व दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी, अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अर्जासोबत अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-११-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कारभारासंदर्भात स्वच्छ व इमानदार अधिका-यामार्फत चौकशी करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांना प्राप्त झालेल्या भूसंपादन कायद्यातील कलम १२ (२) च्या अंतर्गत दिलेल्या नोटिसीसंदर्भात, काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे खालीलप्रमाणे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी सन २००१ ते २००८ असा आहे.

'१. आपल्याकडे २००१ मध्ये व २/७/०३ मध्ये स्टे ऑर्डर सौ. रेनुकाबाई भ्र. आशोक सुर्यवंशी यांनी दिलेला आसताना आपण श्री रामराव सखाराम लमतुरे यांना रेनुकाबाई यांच्या कोर्टाने दिलेल्या (शेतजमिणी) सहीत १२ (२) ची नोटीस का दीली हया मा. देणे.

२. आपण रामरावला रेनुकाबाई यांच्या जमिणीसहीत १२ (२) ची नोटीस दिल्याने रामराव सखाराम हया व्यक्तीने वाढीव मावेजासाठी मा. विद्यमान कंधार कोर्टामध्ये दावा दाखल केल्यामुळे रेनुकाबाई यांचे कधिही भरुन न निघणारे नुकसान होत आहे. तरी आपण रामरावच्या शेती वाढीव मावेजामध्ये सौ. रेनुकाबाई यांचा ७/१२ प्रमाणे आर्धा हिस्साचे मालक आहेत असे विद्यमान कंधार कोर्टाला व रेनुकाबाई यांना पत्र देवून दुरुस्ती करुन समान न्याय देवून मला हयाची माहीती देणे ही नम्र विनंती.

३. सौ. रेनुकाबाईचे नुकसान झाल्यास आपल्या कार्यालयावर कायदेशिर विद्या कोर्टात कार्यवाही करता येते काय हयाची माहीती देणे ही नम्र विनंती. '

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मागितली होती.

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जसाचा तसा घेतलेला आहे)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस असे कळविले की, संपूर्ण भूसंपादनामध्ये रामराव सखाराम यांचे नांव असल्यामुळे, भूसंपादन कायद्यातील कलम १२ (२) ची नोटीस संबंधितांना देण्यात आलेली आहे. या नोटिसीवर संबधितांनी वाढीव मावेजाबाबत कंधार कोर्टात अपील केलेले आहे. या कार्यालयास प्रतिवादी करुन घेण्यासाठी अपिलार्थी न्यायालयास विनंती करु शकतात. याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुढे, त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना कार्यालयीन वेळेमध्ये तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केले, तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिनांक ०८-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे निर्णय दिला असून, सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ३०-१०-२००८ रोजी प्राप्त झाल्याचे आयोगास आढळून येत आहे. या पत्रामध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही बरोबर असल्याचे प्रतिपादन करुन, अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी

पूर्णपणे विसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे, श्री. रामराम सखाराम यांना नोटीस का दिली, अशा प्रकारची माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास त्यांच्याकडे मागता येते. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयाची कारणे अथवा त्यांच्या निर्णयाचे स्पष्टीकरण मागणे व जन माहिती अधिका-याने अर्जदारास त्यांच्या निर्णयाची कारणे व स्पष्टीकरण देणे, अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही, त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात देय होत नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे, ' श्री. रामराव सखाराम या व्यक्तीने विद्यमान कंधार कोर्टामध्ये दावा दाखल केल्यामुळे रेणुकाबाई यांचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होत आहे, तरी जन माहिती अधिका-याने रामराव सखारामच्या शेती वाढीव मावेजामध्ये सौ. रेणुकाबाई यांचा ७/१२ प्रमाणे अर्ध्या हिश्श्याची मालकी आहे असे कंधार कोर्टाला व रेणुकाबाई यांना पत्र देऊन दुरुस्ती करावी, ' अशी विनंती केली आहे. अपिलार्थीने केलेली अशा प्रकारची विनंती हा ' माहिती'चा विषय होऊ शकत नाही. ही बाब पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाची असल्यामुळे, अशा प्रकारच्या प्रकरणात हस्तक्षेप करुन प्रशासकीय स्वरुपाचा निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होऊ शकत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे अपिलार्थीने, ' सौ. रेणुकाबाई यांचे नुकसान झाल्यास आपल्या कार्यालयावर कोर्टात कायदेशीर कार्यवाही करता येते काय, ' असे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. या मुद्दयासंदर्भात देखील अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ करिता वरील परिच्छेदात आयोगाने स्पष्ट केलेला युक्तिवाद लागू होतो, त्यामुळे या मुद्दयावरील माहिती देखील अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे वरीलप्रमाणे केलेले विश्लेषण पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील कोणत्याही मुद्दयावरील माहिती त्यांना, अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळातच देय होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी (ल. सि. का.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२६८

निर्णय दिनांक २१-०४-२०१०

१ श्री. देसाई सुरेश दिगंबरराव, : अपिलार्थी
मु. पो. चुडावा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आयोगास आढळून येत आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व चुकीची माहिती दिल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील, त्यांच्या कार्यालयातर्फे सन २००५ ते २००७

या कालावधीमधील दिनांक ०२-०७-२००५ ते ३१-०३-२००७ पर्यंत झालेल्या कामांच्या मोजमाप पुस्तिकांच्या झेरॉक्स प्रती, व मोजमाप पुस्तिकांचे क्रमांक, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९,३६० इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित काही मोजमाप पुस्तिका चौकशी प्रकरणी गुन्हे अन्वेषण शाखा, परभणी यांच्याकडे जमा केल्या असल्यामुळे, त्या अपिलार्थीस सध्या ते उपलब्ध करुन देऊ शकत नसल्याचे, अपिलार्थीस कळविले. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००८ रोजी आपला निर्णय पारीत करुन, अपिलार्थीस उर्वरित माहिती त्यांचे आदेश निर्गमीत केल्यापासून दहा दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविल्याचे वाटल्यावरुन, वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे, तथापि अपिलार्थीच्या दिनांक ०३-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये प्रतिसाद न देऊन, दिनांक १०-०१-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९,३६० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन अपिलीय

अधिकारी यांच्या दिनांक १७-०४-२००८ रोजीच्या पारीत केलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने दिनांक ०२-०७-२००५ ते ३१-०३-२००७ पर्यंत झालेल्या कामाच्या झेरॉक्स प्रती मागितल्या असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्या १९८४ सालाच्या पासून पुरविल्याचे दिसून येत आहे या कालावधीशी संबंधीत माहिती अपिलार्थीने मागितली नव्हती. म्हणजेच, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः विलंबाने प्रतिसाद देऊन व तदनंतर अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही, अपिलार्थीस आवश्यक नसलेली व दिशाभूल करणारी माहिती त्यांना सशुल्क पुरविल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीने न मागितलेली माहिती त्यांना सशुल्क उपलब्ध करुन देण्याची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. सबब, जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे त्यांना आवश्यक नसलेल्या माहितीपोटीचे त्यांच्या कार्यालयाने स्वीकारलेले शुल्क त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत परत करावे, तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने व चुकीचा प्रतिसाद देऊन, संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली आणि त्यांचे सर्व संबंधित सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना आवश्यक नसलेल्या माहितीपोटीचे त्यांच्या कार्यालयाने स्वीकारलेले शुल्क त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

४. सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली आणि त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २१-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देसाई सुरेश दिगंबरराव, मु. पो. चुडावा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पूर्णा पाटबंधारे विभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यां-ना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३३
निर्णय दिनांकः २२-०४-२०१०

१. श्री. मलंग अब्दुल रहमान पि. मो.इस्माईल, : अपिलार्थी
रा. दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती उदगीर,
जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. बागवान ए.एस.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार कायद्याचे कोणतेही गांभीर्य न घेता, अपिलार्थीस मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांच्याशी संगनमत करुन माहिती अधिकाऱ्यास शिक्षेपासून वाचविण्यासाठी ४५ दिवसांच्या आत कोणताही निकाल न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २२.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे हजरत मिया शॉ खादरी ऊर्दू प्रा.शा. वाढवणा, बु. ता. उदगीर, जि. लातूर या शाळेशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीमध्ये - वैयक्तिक मान्यता घेतल्याशिवाय शिक्षक श्री. बागवान ए.एस. यांचे नाव शिक्षक हजेरीपटावर घेऊ नये, असा कायदा आहे काय? बोगस नेमणूकीच्या चौकशी दरम्यान आपण चौकशी का केली नाही, वैयक्तिक मान्यता येणे अगोदर श्री. बागवान यांचे नाव डिसेंबर,१९९३ च्या शिक्षक माहिती पत्रकात का घेतले, दि.१६.१२.२००८ रोजी आर.एस.पाटील यांच्या आपणाकडे दाखल केलेल्या माहितीसाठीच्या अर्जाची प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०३.०३.२००९ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस त्यांनी माहिती केव्हा दिली, यासंदर्भात कोणताही खुलासा करता आला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी ते जुलै, २००९ पासून कार्यरत असल्यामुळे, पूर्वीच्या जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी प्रथम अपिलावर सुनावणी का घेतली नाही, याची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत, असे आयोगास स्पष्ट केले.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ज्या तीन मुद्यावरील माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्र. १ पूर्ण व क्र.२ मधील काही भागाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागविली आहे. अशाप्रकारची माहिती ही अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, मुद्दा क्र. २ मधील उर्वरित भागाद्वारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. २ शी संबंधित संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. परंतु अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्यामुळे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर (दि.२२.०१.२००९ रोजी व तदनंतर तीन महिन्यापर्यंत कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी श्री. एस.बी.जाधव (सध्या निलंगा येथे कार्यरत) यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस शिक्षण संचालक,पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली व देय असलेली मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. शिक्षण संचालक,पुणे यांना, संबंधित जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, उदगीर (दि.२२.०९.२००९ रोजी व तदनंतर तीन महिन्यापर्यंत कार्यरत असलेले) यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहमान पि. मो.इस्माईल,रा. दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, लातूरयांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षण संचालक,१७,डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३४
निर्णय दिनांक: २२-०४-२०१०

१. श्री. श्रीकांत विश्वासराव देशमुख, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
२. जन अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती देऊन दुष्ट हेतूने दिशाभूल केल्याने व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे मांडण्याची योग्य ती संधी न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतः विषयी व त्रयस्थ पक्ष श्री. एस.जी.नारायणखेडकर व श्री. एन.एस.भोसले यांच्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये त्रयस्थ पक्ष श्री. एस.जी.नारायणखेडकर व श्री. एन.एस.भोसले यांच्याविरुध्द विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची प्रत व त्या तक्रारीसंदर्भात केलेल्या चौकशीचा अहवाल,

अपिलार्थी सदर विद्यापीठात कार्यरत असताना त्यांच्याविरुध्द श्री. नारायणखेडकर यांनी दाखल केलेल्या तक्रारीसंदर्भात विद्यापीठ तक्रार निवारण समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांताची प्रत, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. संकिर्ण १००८/ प्र.क्र. ७४०/ ०८/ पदुम/ दि. ०५.१२.२००८ आणि विद्यापीठाकडे सादर केलेली कार्यालयीन टिपणी क्र.एमएएफएसयु/ईएसटी/१४९९९/०८ दि.०५.१२.२००८ ची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने त्यांच्या अर्जासोबत संदर्भित तक्रार अर्जांच्या अथवा संदर्भित कागदपत्रांच्या प्रती जोडलेल्या नाहीत व तसेच त्यांच्या तक्रार अर्जांच्या दिनांकाचाही यामध्ये उल्लेख केलेला नाही, असे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे प्रकरण उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असल्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,२, ४ व ५ शी संबंधित माहिती देण्याचे नाकारले व मुद्दा क्र. ६ व ७ शी संबंधित माहितीकरिता आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५६/- इतके अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये भरण्याचे सूचित केले आणि मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीच्या बैठकीच्या दिनांकाचा उल्लेख केला नसल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १९.०२.२००९ रोजी विद्यापीठाच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीस दि. २०.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविण्यात आल्याचा निष्कर्ष काढून, अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागितली आहे. त्रयस्थ पक्षाविषयाची माहिती उघड करताना अधिनियमातील कलम ११ मध्ये विहित केलेल्या तरतुदीस अनुसरुन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कार्यवाही केल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०३.०३.२००९ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता, त्यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे पूर्णपणे मांडण्याची नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार प्राप्त होणारी संधी देखील नाकारली आहे. ही वस्तुस्थिती पाहता, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १९.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीस अनुसरुन, त्रयस्थ पक्षाचे म्हणणे नोंदवून,सुनावणी घेऊन आपला स्पष्ट निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान,महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी अपिलार्थीच्या दि. १९.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीस अनुसरुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशु विज्ञान,महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी अपिलार्थीच्या दि. १९.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीस अनुसरुन, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. श्रीकांत विश्वासराव देशमुख, ९, भाग्यलक्ष्मी नगर, शंकराचार्य मंदिराजवळ, परभणी-४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव,महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर -६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान,महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, सेमिनरी हिल्स, नागपूर -६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३५
निर्णय दिनांक: २२-०४-२०१०

१. श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब, : अपिलार्थी
रा.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा शल्य चिकित्सक,लातूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व याद्वारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केला असल्यामुळे व कर्तव्यात कसूर केला असल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयामध्ये शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांना मिळत असलेल्या वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या बिलासंदर्भात दि. ०१.११.२००४ ते ०१.११.२००६ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये

- वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी सदर झालेल्या वैद्यकीय देयकांच्या दिनांक व जा.क्र., यापैकी किती वैद्यकीय देयके परिपूर्ण करुन जन माहिती अधिकारी यांनी संबंधित कार्यालयास पाठविले त्याचा दिनांक व जा.क्र., वै.प.देयके अपूर्ण असल्याने संबंधितास परत केले असल्यास त्यासंदर्भातील तारीख व जावक क्रमांकनिहाय माहिती, प्रतिपूर्ती झालेल्या देयकांची (पास झालेल्या) रक्कम जन माहिती अधिकारी यांनी शासकीय खजिन्यात जमा केली त्यांचा दिनांक व जमा पावतीनिहाय जा.क्र.,या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे शारीरिक तपासणीसाठी आलेल्या शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांची संख्या, तारीख व आवक क्रमांकनिहाय माहिती व शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांची शारीरिक तपासणी करुन त्याप्रीत्यर्थ जमा झालेल्या शुल्काची रक्कम व ते कोणत्या तारखेमध्ये जमा झाले त्याचा जावक क्रमांक- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या आदेशानुसार त्यांनी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय यांच्याकडे पाठविल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याकरिता अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्याशी त्यांनी पत्रव्यवहार केला असल्याचे व ती माहिती अपिलार्थीस देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता असून माहिती देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी वाढवून देण्याची अपिलार्थीस विनंती केली. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०३.२००९ रोजी परत जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे प्रथम अपील केले. परंतु या अपील अर्जावर त्यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचा कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०५.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार देणे भाग आहे. वास्तविक पाहता, अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे दि.०५.०१.२००९ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या अर्जाची प्रत अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,लातूर यांच्याकडे, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत, अधिनियमातील कलम ६(३)(एक) च्या तरतुदीप्रमाणे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देण्याची कृती करणे, या प्रकरणी गरजेचे होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही न करता, त्यांच्याकडील दि. २१.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे आश्वासन दिले. परंतु अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती दिलेली नाही. अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासन देऊनही या प्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाने अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यांच्याकडून देय असल्यामुळे जन माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,लातूर यांना अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,लातूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख लालासाहेब राजेसाहेब,रा.रियाज कॉलनी, शामनगर,लातूर.

२. जन माहिती अधिकारी,जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३६
निर्णय दिनांकः २२-०४-२०१०

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपनिबंधक सहकारी संस्था,परभणी
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : अवसायक, दि परभणी पिपल्स को-ऑप. बँक लि.परभणी, श्री. कमलाकर राजाराम कुलकर्णी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, उपनिबंधक सहकारी संस्था,परभणी यांनी तीस दिवसात त्यांना माहिती दिली नाही. संबंधित त्रयस्थ पक्षास माहिती देण्याचे आदेशित करुन अपिलार्थीस त्यांच्याकडून माहिती घेण्याचे कळविले तथापि माहिती प्राप्त न झाल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी निर्णय दिला व आयोगाकडे द्वितीय अपील सादर करण्याच्या दिनांकापर्यंत त्यांना माहिती अप्राप्त असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,परभणी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. कमलाकर

राजाराम कुलकर्णी यांनी ज्ञानोपासक नागरी सहकारी बँक,परभणी या बँकेकडून घेतलेल्या कर्जाबाबत व परभणी तालुका सहकारी जिनिंग व प्रेसिंग संस्थेच्या संदर्भात काही माहिती तसेच परभणी पिपल्स नागरी सहकारी बँकेकडे कर्जप्रकरणी काही माहिती एकूण ९ मुद्यांद्वारे मागितली असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी अवसायक, परभणी पिपल्स सहकारी बँक व अवसायक, ज्ञानोपासक नागरी सहकारी बँक यांना देण्याचे सूचित केले असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.०३.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २८.०४.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थी सतत तीन सुनावणीसाठी गैरहजर राहिल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता व तसेच अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधकांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी न दिल्याचे नमूद केले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देताना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ च्या तरतुदींनुसार

त्रयस्थ पक्षाच्या युक्तिवादाचा कोणताही विचार न करता निर्णय दिला असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित दि. २३.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २३.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत, अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीस अनुसरुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.२३.०३.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत, अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीस अनुसरुन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वामन रंगनाथराव मोरे,बी/१५४,विवेकनगर,वसमत रोड,परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१११९
निर्णय दिनांकः २२-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अनिल गणेश गिरी,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,<br>जि.औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड यांच्याकडे दि. ०१.०१.२००७ ते दि. २१.११.२००८ या कालावधीमध्ये मौजे नानेगाव गट क्र.१०७ संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जासोबत, त्यांच्या तक्रार अर्जाची प्रत सोबत जोडून त्यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांनी संबंधित तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याचे सूचित केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यावर काय कार्यवाही केली, अशी माहिती व्यक्तिशः मागितली होती. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये संदर्भित तक्रार

अर्जाची प्रत जोडलेली नाही व तसेच त्यांच्या तक्रार अर्जाच्या दिनांकाचाही यामध्ये उल्लेख केलेला नसल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २३.१२.२००८ रोजी उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांच्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. या अपील अर्जावर उपविभागीय अधिकारी, सिल्लोड तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे तहसीलदार, सिल्लोड यांना आदेशित केले. परंतु यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांनी सशुल्क माहिती पुरविली असल्याचे आयोगास अवगत करुन अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती आयोगासमोर अवलोकनास्तव सादर केली.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर केलेली माहिती ही अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी कोणतेही साधर्म्य दर्शवित नाही. त्याचबरोबर आयोगास असे आढळून आले आहे की, उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांनी त्यांच्या दि. १२.०१.२००९ रोजीच्या दिलेल्या निर्णयामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात

पुरविलेली माहिती ही कशाप्रकारे चुकीची व दिशाभूल करणारी आहे किंवा कसे व तसेच अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती देणे बाकी आहे, याचे सविस्तर विवेचन न केल्यामुळे जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २३.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर,पुनश्च् सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांनी अपिलार्थीच्या दि. २३.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच,तीस दिवसांच्या आत पुनश्च् सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांनी पुनश्च् अपिलार्थीच्या दि.२३.१२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत पुनश्च् सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २२-०४-२०१०**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनिल गणेश गिरी,रा.अयोध्या चौक, सुतारवाडा, चिकलठाणा, ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२८

निर्णय दिनांक २२-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती रुबीना कादरी भ्र खिजर कादरी,<br>रा. प्लॉट नं. ७२, हिना नगर, रशिदपुरा, सिंगापूर<br>बेकरीसमोर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका, औरंगाबाद उर्दू प्राथमिक शाळा, रशिदपुरा,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलावर उप शिक्षणाधिकारी यांनी ७ दिवसात विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही त्यांच्या आदेशाची पूर्तता न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (१) च्या तरतुदीअंतर्गत, "त्यांच्या स्वतःच्या सेवापुस्तिका व त्यांच्या दिनांक १३-०९-२००८, १५-०९-२००८ व ०४-१०-२००८ या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही," ही माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिकेने अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १९-११-२००८ रोजी या संदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चितपणे कोणता निर्णय दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्राअभावी आढळून येत नाही. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. आयोगाच्या कार्यालयातून जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २१-०४-२०१० रोजी दूरध्वनीद्वारे संदेश देऊनही ते अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या सेवापुस्तिका व त्यांनी दिनांक १३-०९-२००८, १५-०९-२००८ व ०४-१०-२००८ रोजी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही अशाप्रकारची माहिती मागितली होती. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. राज्य शासनाच्या प्रचलित नियमानुसार कर्मचाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तिका या शाळेच्या मुख्याध्यापिकेकडेच असणे

अभिप्रेत आहे. मूळ सेवापुस्तिका कर्मचाऱ्यांना देण्यात येऊ नये अशा अर्थाच्या राज्य शासनाच्या सूचना आहेत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना मूळ सेवापुस्तिका हवी आहे की त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेच्या प्रती हव्या आहेत याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. शासनाचे प्रचलित नियम आणि अपिलार्थीच्या माहितीची मागणी याची सांगड घालता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेची प्रत त्यांना देणे सोयिस्कर होईल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दुसऱ्या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती म्हणजे, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संदर्भीत अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विविध प्राधिकरणाशी त्या विषयावर केलेल्या पत्रव्यवहाराच्या आणि या विषयावर त्यांच्याकडील अभिलेख्याच्या टिपणीच्या प्रती, ही होय. ही माहिती अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देण्यास काहीच हरकत नव्हती. जर अपिलार्थीच्या संदर्भीत अर्जांवर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नसेल तर तसे देखिल त्यांनी अपिलार्थीस कळविण्यासाठी त्यांना कोणतीही अडचण नव्हती. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी मूळात अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद न देता अपिलार्थीने दिनांक १९-११-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर अपिलार्थीकडे त्यांच्या दिनांक ३०-०१-२००९ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या दुय्यम सेवापुस्तिकेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देता उलट अपिलार्थीकडे त्यांची दुय्यम सेवापुस्तिका, अद्ययावत नोंद घेण्यासाठी मागणी करण्याची त्यांची ही कृती सर्वस्वी गैर व चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी दिनांक १४-१०-२००८ रोजी सदर सेवापुस्तिका ज्या स्थितीत आहे त्या स्थितीतील सेवापुस्तिकेच्या प्रती देणे अभिप्रेत असताना, जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले आहेत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अशाप्रकारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन व तदनंतर चुकीचा प्रतिसाद

देऊन आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी टाळाटाळ केली असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, औरंगाबाद उर्दू प्राथमिक शाळा, औरंगाबाद यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्याध्यापिका, औरंगाबाद उर्दू प्राथमिक शाळा, रशिदपुरा, हिनानगर, औरंगाबाद (दिनांक १४-१०-२००८ पासून पुढील ३ महिन्यापर्यंत कार्यरत असलेले सर्व मुख्याध्यापक) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांच्यावर ६६ दिवस विलंबाकरिता विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५० प्रमाणे एकूण रु. १६,५००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा. या कालावधीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांना या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन, हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना स्पीड पोस्टाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-११-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे भाग होते. तथापि या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०१-२००९ रोजी म्हणजेच ६६ दिवसाच्या विलंबाने प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून आले आहे. हा प्रतिसाद देखिल अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सकारात्मक नाही. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांच्या दिनांक १३-०९-२००८, १५-०९-२००८ व ०४-१०-२००८ रोजीच्या अर्जांवर त्यांनी काय कार्यवाही केली याचा उल्लेख नाही. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या मनातून

अपिलार्थीस त्यांच्या मूळ सेवापुस्तिका अद्ययावत करुन द्यावयाची होती असे जरी गृहीत धरले तरी, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-१०-२००८ रोजी ही माहिती मागितली होती. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीचे सेवापुस्तक दिनांक १४-१०-२००८ रोजी ज्या स्थितीत होते त्याच स्थितीत त्यांनी अपिलार्थीस सेवापुस्तिकेची प्रत त्यांना देण्यसंदर्भात कार्यवाही करणे गरजेचे होते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती देण्याकरिता सकारात्मक दृष्टीकोन असल्याचे जरी गृहीत धरले तरीही अपिलार्थीच्या दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी एकूण ६६ दिवसाच्या विलंबाने प्रतिसाद दिला आहे, हे सत्य शेवटी उरत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेली त्यांच्या सेवापुस्तिकेची प्रत व त्यांच्या ३ अर्जांवर केलेली कार्यवाही ही माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत स्पीड पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका (दिनांक १४-१०-२००८ पासून पुढील ३ महिन्यापर्यंत कार्यरत असलेले सर्व मुख्याध्यापक) यांना या प्रकरणी एकूण रु. १६,५००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत सरळ सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती रुबीना कादरी भ्र खिजर कादरी, रा. प्लॉट नं. ७२, हिना नगर, रशिदपुरा, सिंगापूर बेकरीसमोर, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, औरंगाबाद उर्दू प्राथमिक शाळा, रशिदपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०२९

निर्णय दिनांक २२-०४-२०१०

१ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, : अपिलार्थी
मु. पो. गडगा, ता. नायगांव खै., जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, नायगांव, जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना कोणतीही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, नायगांव यांच्याकडे, सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत नायगांव तालुक्यासाठी सन २००२ ते २००८ अखेरपर्यंत प्राप्त झालेला निधी, निधीचे गावनिहाय व शाळानिहाय वितरण, या योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाचा गाव व शाळानिहाय अहवाल, एम. बी.

रेकॉर्ड, इस्टीमेट, मस्टर, स्टॉक रजिस्टरच्या शिक्षकाच्या अथवा मुख्याध्यापकाच्या स्वाक्षरीनिशी झालेल्या खर्चाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे आणि अद्यापपावेतो त्यांना ही माहिती मिळाली नसल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला .

अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी, आयोगाने त्यांच्या कार्यालयात दूरध्वनीद्वारे दिनांक २१-०४-२०१० रोजी संदेश देऊनही उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०१-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी. ही माहिती अपिलार्थीस दिनांक ०२-०२-२००९ रोजी देय असताना अद्यापपावेतो, म्हणजे आयोगाकडील सुनावणीच्या दिवसापर्यंत त्यांना ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता असद्हेतूने टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, पंचायत समिती नायगांव यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अविनाश पुंडलिकराव ईटकापल्ले, मु. पो. गडगा, ता. नायगांव खै., जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, नायगांव, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३०

निर्णय दिनांक २२-०४-२०१०

१ श्री. रत्नशेखर प्रेमचंद साहूजी, : अपिलार्थी
द्वारा- गोमटेश इलेक्टॉनिक्स, सराफा रोड, खादी
भांडारासमोर, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,
अहमदनगर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार तहसीलदार, सामान्य प्रशासन तथा जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी माहिती

अधिकाराखाली अर्ज करुन मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून नाकारली गेल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०९-०२-२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०३-२००९ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती देण्यासंदर्भात सूचित करुनही अद्यापपावेतो त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १५-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वातंत्र्य सैनिकांच्या संदर्भात काही माहिती एकूण ८ कलमी प्रपत्रामध्ये मागितली होती. या प्रपत्रामध्ये - स्वातंत्र्य सैनिकाचे पूर्ण नाव, पत्ता, फोन क्रमांक, हयात / मृत असल्यास त्याची सद्य:स्थिती, त्यांची जात व धर्म, यांचा सहभाग असलेल्या स्वातंत्र्य संग्रामाचे नाव मराठवाडा, हैद्राबाद, गोवा, देश स्वातंत्र्य इत्यादी, निवृत्ती वेतन कोणाकडून मिळते राज्य सरकार / केंद्र सरकार, स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कार्याचा थोडक्यात तपशील व शेरा - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार कायदा २००५ या कायद्यातील माहिती या संज्ञेत न बसणारी असल्यामुळे अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला व तसे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३१-१२-२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७

दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांना स्वातंत्र्य सैनिकांच्या संदर्भात पुस्तक काढण्याकरिता मागितलेली माहिती एकमेव अहमदनगर जिल्हा वगळता, राज्यातील सर्व जिल्ह्यांनी त्यांनी मागणी केल्याप्रमाणे ती पुरविली आहे. परंतु अहमदनगर जिल्ह्यातील उपजिल्हाधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजतागायत माहिती प्राप्त होऊ शकलेली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयात अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या बाबतीत जी माहिती उपलब्ध आहे ती जरी त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळाली तरीही त्यांचे काम भागण्यासारखे आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका विशिष्ट प्रपत्रामध्ये माहिती मागितली आहे. या प्रपत्रामध्ये कदाचित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जतन करुन ठेवली गेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने, त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज निकाली काढला असावा. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकाऱ्यास अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांनी विहित केलेल्या प्रपत्रामध्ये देण्याचे त्यांना बंधन नाही. **तथापि या प्रपत्रामधील मुद्याद्वारे अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील ज्या कागदपत्रामध्ये उपलब्ध आहे त्या कागदपत्राची प्रत त्यांनी अर्जदारास देणे अनिवार्य आहे**. त्यामुळे या

प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सामान्य प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या संदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेली व अपिलार्थीने मूळ अर्जातील प्रपत्रामध्ये नमूद केलेल्या सर्व मुद्यांवरील संपूर्ण माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

या कालावधीत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्यास ते अधिनियमातील कलम १८ मधील तरतुदीप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे या संदर्भात तक्रार करु शकतील. जेणेकरुन या प्रकरणी आयोगास दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८(१९०८चा ५) मधील तरतुदीअन्वये या प्रकरणाची अर्थन्यायीक चौकशी करणे आयोगास सुकर होईल. या प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त होईल, असे पहावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सामान्य प्रशासन यांनी अपिलार्थीस त्यांनी ज्या विषयावर माहितीची मागणी केली आहे त्या विषयाशी संबंधित कागदपत्राच्या प्रती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. रत्नशेखर प्रेमचंद साहूजी, रा. श्री. दिगंबर जैन, सेवा समिती, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३१

निर्णय दिनांक २२-०४-२०१०

१ श्री. विकास कुमार बागडी, : अपिलार्थी
रा. नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे सिंचन, जिल्हा परिषद,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उप विभाग, अंबड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने आणि अर्धवट माहिती प्राप्त झाली असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील

आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक ०४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये, त्यांच्या कार्यक्षेत्रातील अंबड उपविभागामार्फत रोजगार हमी योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेच्या संदर्भात केलेल्या कामाची काही माहिती एकूण १२ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अंबड उपविभागामार्फत करण्यात आलेल्या कामांची संख्या, रोजगार हमी योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत केलेल्या कामांच्या संख्या, या कामाचे स्वरुप, स्थळ, गावाचे नाव, गट क्रमांक, भूजल सर्वेक्षण खात्याकडून अहवाल मागविण्यात आला होता का? या कामाशी संबंधित शाखा अभियंता व जे. ई. यांचे नाव, काम पूर्ण झाल्यावर क्वॉलिटी कंट्रोलकडून अहवाल मागविण्यात आले का? या योजनेवरील काम करणाऱ्या मजुरांचे ओळखपत्र तपासण्यात आले होते का? काम करणाऱ्या मजुरांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधाची माहिती व खर्च वितरण, या कामांच्या मजुरांच्या हजेरी मस्टरचे चावडी वाचन झाले होते का?, या कामांची तपासणी करण्यात आली होती का? असल्यास तपासणी अहवाल व या कालावधीमध्ये एकूण किती टेंडर मंजूर करण्यात आले होते - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी जून २००६ ते ऑगस्ट २००८ असा होता.

अपिलार्थीने माहितीसाठीचा सदरचा अर्ज कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे सिंचन, जिल्हा परिषद, जालना यांना उद्देशून केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अंबड उपविभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीच्या अर्जाची छायांकित प्रत त्यांच्याकडील दिनांक ०८-१०-२००८ रोजीच्या पत्राद्वारे उप अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, अंबड तथा जन माहिती अधिकारी

यांच्याकडे पाठविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि उपअभियंत्याकडून अपेक्षित माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक ०५-०१-२००९ पर्यंत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-१२-२००८ रोजी काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती अर्धवट असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-१२-२००८ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील कामासंदर्भात एकूण १२ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. त्यापैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ७ , ८, १० व ११ अंशतः - विभागीय दक्षता पथकामार्फत व रोहीया समितीबाबत तपासणी करण्यात आली का? - या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे अभिप्राय व त्यांच्या कृतीबद्दलचे कारणे,

स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागता येत नाही. या अधिनियमामध्ये अर्जदाराने मागणी केलेली जी माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास देणे जन माहिती अधिकारी यांना अनुज्ञेय आहे, ती माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे इतपत सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील वरील मुद्यांवर माहिती प्राप्त होऊ शकणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेली आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती यांचे अवलोकन केले असता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे केलेल्या कामाचे गट क्रमांक ही मुद्दा क्रमांक २,३,४ शी संबंधित माहिती त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आली नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ द्वारे, या योजनेवर काम करणाऱ्या मजुरांवर सुविधा पुरविण्यासाठी आलेल्या खर्चाची माहिती जन माहिती अधिकारी यांना मागितली होती. तथापि त्यांनी या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस दिलेली नाही. तसाच प्रकार अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १२ च्या संदर्भात झाला असून अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधीमध्ये एकूण किती टेंडर मंजूर करण्यात आलेले आहेत, याची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. बांधकाम खात्याच्या प्रचलित कार्यप्रणालीप्रमाणे कामाच्या निविदा मंजूर करण्यात आल्यानंतर या निविदेची प्रत उपविभागाला देणे सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. त्यामुळे ही माहिती देखिल उपअभियंता यांच्या स्तरावर सर्वसाधारण परिस्थितीत उपलब्ध असावयास हवी आणि जर समजा ही माहिती संबंधित उप अभियंत्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी या मुद्यासंदर्भात अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे कार्यकारी अभियंता यांच्याकडे सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवावयास हवी होती. तथापि त्यांनी या प्रकरणी अशाप्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील या सर्व मुद्यांवरील उर्वरित

माहिती ही अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्यामुळे ती माहिती आता जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग अंबड यांना अपिलार्थीस पुरवावी लागेल. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व शीघ्र टपालाद्वारे पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०८-११-२००८ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे अपेक्षित असताना, या प्रकरणी प्रत्यक्षात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-१२-२००८ रोजी म्हणजेच, ४४ दिवसाच्या विलंबाने अर्धवट माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता श्री. सानप यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २,३,९ व १२ शी संबंधित मुद्यांवरील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उपविभाग, अंबड

श्री. सानप, यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विकास कुमार बागडी, रा. नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद उप विभाग, अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१०३२

निर्णय दिनांक २२-०४-२०१०

१ श्री. अकबर अमीर कुरैशी, : अपिलार्थी
द्वारा, मिलन बुक बाईडिंग शॉप, सिल्लीखाना सिग्नलजवळ,
पंजाब ॲन्ड सिंध बँकेच्या बाजूला, सिल्लीखाना, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : आरोग्य अधीक्षक, नगर परिषद, जालना
जन अपिलीय अधिकारी : मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दिनांक ०२-०३-२००९ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात दिनांक ०६-०३-२००९ रोजी प्राप्त झाला त्यान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडून बिफ विक्रीच्या परवान्यासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"१) बिफ विक्रीचा परवाना नगर परिषदेमार्फत देतांना ज्या जागेवर परवाना देतात तेंव्हा जागेचा पुरवठा बघून देतात का?

२) बिफ विक्रेता परवानाधारक श्री. शेख आतेफ शे. इस्माईल दिनांक २७-०६-२००१ यांना बिफ विक्रीचा काद्राबाद येथे जो परवाना / नुतनीकरण परवाना भाजी मंडई काद्राबाद येथे नगर परिषदेने दिलेला आहे. दुकान/गाळाजागेचा पुरावा आपण बघुन दिला का? ती जागा त्यांचे मालकीची किंवा भाडेतत्वावर आहे का? नगर परिषदेची आहे. याबाबतची माहिती शेख आतेफ ईस्माईल यांनी जो जागेचा जो पुरावा नगर परिषदेकडे सादर केला असेल तर त्याची सत्यप्रत उपलब्ध करुन द्यावी".

(टीप :- अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकुर जसाचा तसा घेतलेला आहे.)

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक ११-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जिल्हाधिकारी यांनी दिनांक २१-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना सूचित केले. त्यांनी यानंतर परत दिनांक २९-०४-२००९ रोजी अपिलार्थीस, पूर्वीच दिनांक ०४-०४-२००९ रोजी पुरविलेली माहिती दिनांक २९-०४-२००९ रोजीच्या पत्राद्वारे पुरविली. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-०४-२००९ व २९-०४-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविल्याचा आयोगासमोर युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील दोन्ही मुद्यांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण व अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील, "शेख आतेफ शे. इस्माईल यांनी जागेचा जो पुरावा नगर परिषदेकडे सादर केलेला असेल तर त्याची सत्यप्रत" ही माहिती वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कृतीबद्दलचे कारण अथवा स्पष्टीकरण अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रियाचा समावेश नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील "शेख आतेफ शे. इस्माईल यांनी नगर परिषदेकडे त्यांच्या बिफ विक्रीच्या परवान्याचे नुतनीकरण करताना संबंधित जागेच्या मालकी हक्काबाबत दिलेल्या पुराव्याची प्रत" या मुद्यावरील माहिती मात्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, नगर परिषदेने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात उत्तर देताना नगर परिषदेतर्फे परवाना देताना जागेचा पुरावा बघूनच असे परवाने देण्यात येतात, असे कबूल केले आहे. मात्र अपिलार्थीने श्री. शेख आतेफ शे. इस्माईल यांच्या अशाप्रकारच्या पुराव्याची माहिती मागितली असता या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना कोणतेही भाष्य केलेले नाही. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस अशाप्रकारे अर्धवट माहिती देण्याची आणि महत्त्वाची माहिती न देण्याची कृती ही त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करीत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ

अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील शेख आतेफ शे. इस्माईल यांनी नगर परिषदेकडे त्यांच्या बिफ विक्रीचे नुतनीकरण करताना जागेसंदर्भात जो पुरावा सादर केला आहे त्या पुराव्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस द्यावी. किंवा जर नगर परिषदेने अशाप्रकाचा कोणताही पुरावा न तपासता श्री शेख आतेफ शे. इस्माईल यांच्या परवान्याचे नुतनीकरण केले असेल तर त्यांनी अपिलार्थीस तसे कळवावे. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणाची दिनांक ०२-०३-२००९ रोजीची तत्कालीन स्थिती, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात आयोगास या प्रकरणाच्या वस्तुस्थितीचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी बिफ विक्रीचे नुतनीकरण करताना काही अनियमितता संबंधितांच्यांकडून झाली असल्याचे आढळून येत आहे. मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांनी या प्रकरणी वैयक्तिक लक्ष घालणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील अपिलार्थीस देय असलेली वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अकबर अमीर कुरैशी, द्वारा- मिलन बुक बाईडिंग शॉप, सिल्लीखाना सिग्नल-जवळ, पंजाब ॲन्ड सिंध बँकेच्या बाजूला, सिल्लीखाना, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा आरोग्य अधीक्षक, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२०

निर्णय दिनांक २२-०४-२०१०

१ श्रीमती शकुंतला चंद्रसेन बोंदर, : अपिलार्थी
महसूल कॉलनी, कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम, तालुका भूम,
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगा-समोर उपस्थित नाहीत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाची छाननी केली असता, या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या-

मार्फत दिनांक १०-०२-२००९ रोजी व आयोगास सरळ दिनांक १८-०२-२००९ रोजी अशी दोन स्वतंत्र व्दितीय अपिले दाखल केल्याचे आयोगास आढळून येत आहे, तथापि अपिलार्थीने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्यामार्फत सादर केलेल्या दिनांक १०-०२-२००९ रोजीच्या अपील प्रकरणी आयोगाने दिनांक २२-०२-२०१० रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय दिला असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील चालविण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती शकुंतला चंद्रसेन बोंदर, महसूल कॉलनी, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५२

निर्णय दिनांक २२-०४-२०१०

१ श्री. परमेश्वर साहेबराव बिडे, : अपिलार्थी

ई-७९, शिवधन, शिवशंकर कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फर्दापूर, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २२-०४-२०१० रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,

विचाराधीन व्दितीय अपिलासंदर्भातील मूळ अर्जान्वये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीसंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नाही, त्यामुळे ते त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक १२५२/२००९ स्वखुषीने मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीनेच त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने व ते रद्द करण्याची त्यांनी विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. परमेश्वर साहेबराव बिडे, ई-७९, शिवधन, शिवशंकर कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, फर्दापूर, तालुका सोयगांव, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५३

निर्णय दिनांक २२-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. लक्ष्मण मुंजाजी सोन्नर,<br>रा. खळी (पुर्नवसित वस्ती), तालुका गंगाखेड,<br>जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,<br>खळी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड,<br>तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०७-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, खळी यांच्याकडे ११० रुपये इतक्या रकमेचा भरणा करुनही त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने व माहिती देण्यासाठी ते टाळाटाळ करत असल्याने त्यांनी गट शिक्षणाधिका-याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी यावर कोणतीही कार्यवाही न केल्याने, अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०४-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, खळी यांच्यासंदर्भात काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ग्रामपंचायत खळी अंतर्गत जिल्हा परिषद शाळा वर्ग कोणत्या योजनेमार्फत उघडण्यात येत आहेत व त्याला किती निधी मंजूर झाला, कामांची अंदाजपत्रके व खोल्यांची संख्या, कामाच्या जाहीर निविदा वर्तमानपत्रामध्ये दिल्या होत्या का ? जिल्हा परिषद शाळेचे काम हे पुनर्वसन केलेल्या ठिकाणी होत आहे काय ? सदरील कामाचे अंतर आणि पुनर्वसन झालेल्या ठिकाणाचे अंतर किती आहे ? सदरील शाळा बांधकाम ज्या ठिकाणी चालू आहे त्या ठिकाणी जिल्हाधिकारी, पुनर्वसन विभागाची परवानी आहे का ? - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०७ इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे, अपिलार्थीस सूचित केले. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक २४-०४-२००९ रोजीच्या पत्राचा स्वीकार केला, परंतु दिनांक २७-०४-२००९ रोजीचे यासंदर्भातील पत्र स्वीकारण्याचे नाकारले. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्काचा भरणा करुनही त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, या कारणास्तव, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०५-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने आणि अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी गैरहजर व अपिलार्थी आणि जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ११० इतक्या रकमेचा भरणा केला, तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्याची पावती, त्यांच्याकडे पावतीबुक नसल्यामुळे दिली नाही व माहिती देखील दिली नाही.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, खळी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीने त्यांच्याकडे कधीही भरले नाही, उलट माहिती अधिकारांतर्गत मागणी केलेला अर्ज त्यांना दाखवून, ' आता किती पैसे देता ' अशी त्यांच्याकडे खंडणी मागितली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार असून, ही माहिती ते अपिलार्थीस सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरल्याची पावती अथवा इतर कोणताही पुरावा आयोगास उपलब्ध करुन दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी पत्र पाठविले असता, सदर पत्र घेण्यासाठी अपिलार्थीने नकार दिला, या बाबींचा जन माहिती अधिकारी यांनी पंचनामा केला आहे, त्यामुळे आवश्यक त्या पुराव्याअभावी, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे शुल्क भरले आहे, हा त्यांचा युक्तिवाद आयोगास मान्य करता येणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी तयार आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत सशुल्क व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती वरील कालावधीमध्ये प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अपिलार्थीवर राहील. अपिलार्थी यांनी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, खळी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांच्या कार्यालयातून हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी व पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून सदर माहिती व्यक्तिशः व सशुल्क हस्तगत करुन घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत सशुल्क व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. लक्ष्मण मुंजाजी सोन्नर, रा. खळी (पुनर्वसित वस्ती), तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,

खळी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२२७१

निर्णय दिनांक २२-०४-२०१०

१ श्री. जयदीप जे. विर्धे, : अपिलार्थी

रविवार पेठ, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई,

तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई,

तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अर्जानुसार मागणी केलेली माहिती ही अर्धवट व ती ठराविक मुदतीनंतर मिळाली असल्याने आणि त्यांचे पहिले अपील चुकीच्या पध्दतीने निकाली काढल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, जन माहिती अधिकारी यांना कलम २० प्रमाणे शास्ती लावून, संबंधित महसूल अधिका-यास प्रस्तुतचा फेरफार हा अर्जदाराच्या नावे मंजूर करावा असे आदेश देण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, बक्षिसपत्र रजिस्टर्ड अ. क्र. ५८८६/२००४ च्या आधारे मौजे अंबाजोगाई येथील सर्व्हे नंबर १४, हिस्सा क्रमांक १ मधील ०.९४ आर जमिनीवर बक्षिस पत्राआधारे फेर घेण्याबाबत असलेली फेरफार क्रमांक ११९९७ ची संचिका देण्यात यावी, फेरफार घेण्यासाठी तलाठी कार्यालय, अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक १०-११-२००६ रोजी दिलेल्या अर्जावर फेरफार रजिस्टर क्रमांक ११९९७, दिनांक १०-११-२००६ ची लेखी माहिती व त्यावर झालेल्या सक्षम महसूल अधिकारी यांनी केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली आहे काय ? बक्षिस पत्राआधारे अद्यापपावेतो कोणत्याही कोर्टाचा मनाई हुकूम नसताना अथवा न्यायप्रविष्ठ नसताना फेरफार का मंजूर झाला नाही, या मुद्दयांवर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीचा मूळ अर्ज संबंधित तलाठी, अंबाजोगाई यांच्याकडे पाठविला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली, तथापि यानंतरही अपेक्षित माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक १७-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०२-२००८ रोजी निर्णय देऊन, संबंधित तलाठी अंबाजोगाई यांना, अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले, तथापि यानंतरही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील बक्षिसपत्र रजिस्टर्ड क्रमांक ५८८६/२००४ च्या आधारे अंबाजोगाई येथील सर्व्हे नंबर १४ हिस्सा क्रमांक १ मधील ०.९४ आर इतके क्षेत्र असलेल्या जमिनीचा फेर तलाठी, अंबाजोगाई यांनी घेतला नसल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली आहे. यातील मुद्दा क्रमांक १ व्दारे, अपिलार्थीने फेरफार क्रमांक ११९९७ सन २००६ या फेरफाराच्या संचिकेची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे, ती जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा अंबाजोगाई यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील प्रथम भागावरील, अपिलार्थीने तलाठी कार्यालय, अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक १०-११-२००६ रोजी दिलेल्या अर्जावर, तलाठी, अंबाजोगाई कार्यालयाने दिनांक १९-११-२००७ पर्यंत केलेली कार्यवाही म्हणजे, या प्रकरणाच्या अनुषंगाने तलाठी अंबाजोगाई यांनी इतर प्राधिकरणाकडे, या विषयाच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयासंदर्भातील अभिलेख्यावरील टिपणीच्या प्रती, ही माहिती देखील तलाठी, अंबाजोगाई यांना अपिलार्थीस द्यावी लागेल, परंतु अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मधील, उर्वरित भागाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, महसूल प्राधिकरणाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली आहे काय ? अशा प्रकारची मागितलेली माहिती अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशा प्रकारची स्पष्टीकरणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे मूळात अभिप्रेत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे अपिलार्थीने, प्रकरण न्यायप्रविष्ठ नसताना फेरफार का मंजूर झाला नाही ? अशी जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची कारणे अपेक्षित करणारी माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी

यांच्याकडे मागितली आहे. याही मुद्दयावर वरीलप्रमाणे युक्तिवाद लागू होत असून, जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्या कृतीबद्दलची अथवा निर्णयाबद्दलची कोणतीही कारणे, अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देणे बंधनकारक नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील याही मुद्दयावर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होणार नाही.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, त्यांनी मागणी केलेल्या संचिकेची नक्कल, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आली असल्याचे नमूद केले आहे. ती निश्‍चितपणे कोणत्या तारखेस पुरविण्यात आली त्याचा उल्लेख त्यांनी, आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केला नसल्यामुळे, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्‍चितपणे किती दिवसाचा विलंब लावला गेला, हे आयोगास आढळून येत नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठीचे मूळात संपूर्ण उत्तरदायित्व अपिलार्थीचे होते. हे उत्तरदायित्व अपिलार्थीने कशा प्रकारे पार पाडले याचा कोणताही पुरावा, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही, त्यामुळे अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्दल, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाही करण्याची त्यांची विनंती, आयोगास मान्य करता येणार नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांना प्रत्यक्षात पुरविण्यात आलेली माहिती यांचे केलेले वरील विश्लेषण पाहता, आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने तलाठी, अंबाजोगाई यांच्याकडे दिनांक १०-११-२००६ रोजी दिलेल्या अर्जावर, त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलार्थीस पुरवावी लागेल. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २२-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जयदीप जे. विर्धे, रविवार पेठ, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१६
निर्णय दिनांक: २३-०४-२०१०

१. श्री. विष्णुपंत शंकरराव धाबेकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,ल.पा.
(सिंचन) विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कायदा, कलम, पोटकलम यांचा विचार न करता अर्थहीन व मोघम स्वरुपाचा निकाल दिला असल्यामुळे आणि जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई केली नसल्यामुळे व एकतर्फी बेकायदेशीर निर्णय दिल्यामुळे त्यांना कायदेशीर व योग्य न्याय मिळाला नाही. तसेच त्यांनी या अपील अर्जामध्ये असेही नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी संबंधितांनी दिलेली माहिती प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांना अवगत करुनही त्यांचे म्हणणे विचारात न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २८.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातर्फे दि. १ एप्रिल, १९९५ ते २५ जुलै, २००८ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाने पूर्ण केलेल्या, प्रगतीपथावरील व सर्व प्रकारच्या पाझर तलावाबाबत काही माहिती एकूण ५ मुद्दे आणि त्यातील २३ उपमुद्दे याद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना ७५ पृष्ठांची माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०९.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी दि. ३०.०८.२००८ रोजी ७५ पानांची माहिती अपिलार्थीस पुरविली. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर अपिलार्थीस परत दि. ११.०२.२००९ रोजी विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप आणि अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयासंदर्भात घेतलेले आक्षेप पाहता आणि अपिलार्थीस त्यांचे म्हणणे पूर्ण मांडण्याची संधी

देण्याच्या दृष्टीने, अपिलार्थीच्या दि. १६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी परत सुनावणी घेणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची पूर्ण संधी देऊन त्यांचे म्हणणे नोंदवून अपिलार्थीच्या दि. १६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच त्यांनी तीस दिवसांच्या आत पुनश्च् सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१६.०९.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत पुनश्च् सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विष्णूपंत शंकरराव धाबेकर,रा.तांबरी विभाग, विद्यानगर,उस्मानाबाद-४१३ ५०१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,ल.पा. (सिंचन) विभाग, जिल्हा परिषद,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१७
निर्णय दिनांकः २३-०४-२०१०

१. श्री. मो. मोईज खान पठाण, रा.नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), नांदेड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. २१.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करुनही व या अपील अर्जाची सुनावणी घेण्याची विनंती दि. ०५.०३.२००९ रोजी अर्ज देऊनही नांदेड जिल्हा परिषद,प्राथमिक शिक्षण विभागाच्या अपिलीय अधिकाऱ्याने त्यांच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी न घेतल्यामुळे व त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे शिक्षण विस्तार अधिकारी पदासाठी जुन, २००८ मध्ये घेतल्या गेलेल्या परीक्षेच्या संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जुन, २००८

मध्ये झालेल्या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, निवड झालेल्या उमेदवारांचा लेखी, तोंडी परीक्षेतील गुणांचा तपशील, लेखी परीक्षेतील प्रश्नपत्रिका व निवड झालेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती, त्यांचे शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेचा दिनांकासह तपशील, पदभरतीची देण्यात आलेल्या जाहीरातींची साक्षांकित प्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.०१.२००९ रोजी जन अपिलीय अधिकारी, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. यानंतर अपिलार्थीने दि. ०४.०३.२००९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास स्मरणपत्र देऊन त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नसल्याचे संबंधितांच्या निदर्शनास आणून दिले. तथापि एवढे होऊनही संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणी अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.आयोगातर्फे दि. २२.०४.२०१० रोजी नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील श्री. तरवटे यांना आज रोजीच्या सुनावणीची कल्पना आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनीद्वारे देऊनही त्यांच्या कार्यालयाचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १७.११.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.३ मधील, 'लेखी परीक्षेतील प्रश्नपत्रिका' हा अंशतः माहितीचा भाग अपिलार्थीस देय होत आहे. मात्र या मुद्यातील,

निवड झालेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती', ही माहिती देय होत नाही.उत्तरपत्रिकांच्या माहितीसंदर्भात आयोगाकडे वेळोवेळी प्राप्त झालेल्या अपील अर्जांवर उत्तरपत्रिकांच्या प्रती उघड न करण्याची आयोगाने यापूर्वी भूमिका घेतली असल्यामुळे याही प्रकरणी अपिलार्थीस, "निवड झालेल्या उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती", ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. मात्र उर्वरित मुद्दा क्र. १,२,३अंशत:,४ व ५ या मुद्यांवरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्यामुळे आणि तिचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना देणे भाग आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता या परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे देय होत असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी,शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस दि. १७.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ मधील अंशतः भाग वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. यासंदर्भात संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी आयोगाने दि. ०४.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे देऊनही व दि. २२.०४.२०१० रोजी आजच्या सुनावणीची कल्पना संबंधित जन माहिती अधिकारी यांना दूरध्वनीद्वारे देऊनही ते आयोगासमोरील सुनावणीसाठी आज रोजी अनुपस्थित आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देय माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असावी, असे आयोगास आढळून येत नाही. तथापि एवढे असूनही या प्रकरणी अपिलार्थीस आजतागायत त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी

यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांचे कार्यालय (दि.१७.११.२००८ ते पुढील तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत कार्यरत असलेले) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस,त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

प्रसंगावशात, या प्रकरणी नांदेड जिल्हा परिषदेमधील शिक्षण विभागाने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीसंदर्भात अंगिकारलेल्या कार्यपध्दतीकडे सचिव, शालेय शिक्षण यांचे लक्ष वेधण्यात येत आहे. त्यांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, नांदेड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणाधिकारी हे त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रथम अपील अर्जावर एखादा अपवाद वगळता, कधीही सुनावणी घेऊन आपला निर्णय देत नाहीत. या विभागाकडील माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी हे आयोगाकडील सुनावणीस एखादा अपवाद वगळता, कायम अनुपस्थित राहतात. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीबाबत सचिव (शालेय शिक्षण) यांनी त्यांचे स्तरावर यथायोग्यरित्या नोंद घेऊन त्यांना आवश्यक त्या सूचना सचिवांच्या पातळीवरुन निर्गमित कराव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन

खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद,प्राथमिक शिक्षण विभाग, नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ मधील उत्तरपत्रिकांचा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत शीघ्र टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३-०४-२०१०** — **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो. मोईज खान पठाण,द्वारा राम संगनवार,"ओम निवास", प्र.नि.हा. शाळेजवळ, कैलासनगर, नांदेड-१

२. जन माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांचे कार्यालय यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२२
निर्णय दिनांकः २३-०४-२०१०

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे, : अपिलार्थी
माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई,
जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई,जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०१.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

"क्र. २००६/जमा/दोन/कावि-४५५,दि.२१.०२.२००६ ने फुले पिंपळगाव ता.माजलगाव येथील गायरान जमीन गट नं.२० व २६० चे जमीन विक्री परवानगी बाबत पाठविलेल्या प्रस्तावाच्या संपुर्ण झ ेरॉक्स प्रती सहीनिशी द्याव्यात."

(टीप : अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मजकूर जशाचा तसा घेतला आहे.)

अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्षात दि. २२.०८.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. या अर्जावर जन माहिती

अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संचिकेत उपलब्ध आहे, ती संचिका उपलब्ध होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले व संचिकेचा शोध लागल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यात येईल, असे अपिलार्थीस आश्वासित केले. तथापि माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १०.१०.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.११.२००८ रोजी सुनावणी घेतली व सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली आणि सदरचे प्रकरण बंद केले.तथापि अपिलार्थीने नंतर त्यांच्या दि. २९.११.२००८ रोजीच्या पुनर्विचार अर्जाद्वारे पुन्हा सुनावणी घेण्याबाबत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनंती केली. यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०१.२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस अपेक्षित माहिती पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचा अर्ज नामंजूर केला. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३.०४.२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत आणि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना दि. ०७.११.२००८ रोजी विनामूल्य व व्यक्तिशः हस्तांतरित करण्यात आली आहे.

वरील प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०७.११.२००८ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य व व्यक्तिशः प्राप्त झाली आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये गायरान जमीन वाटप झालेल्या श्री. मारोती साळवे यांची ताबा

पावती आणि या जमिनीच्या चतु:सिमा दर्शविलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये आढळून येत नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत पुर्नविलोकनासाठी प्रथम अपील केले व तदनंतर आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीमध्ये प्रथम अपील अर्जावर निर्णय दिल्यानंतर फेरविचारासाठी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत प्रथम अपील करण्याची तरतुद नाही, याची अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी नोंद घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये श्री. मारोती साळवे यांना जागा दिलेल्या ताबा पावतीची प्रत व जमिनीची चतु:सिमा दाखविणारी कागदपत्रे अशाप्रकारची माहिती अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये मागितली नव्हती, त्यामुळे जर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार हवी असतील तर त्यांनी या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे नव्याने अर्ज करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच त्यांना असेही अवगत करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात ती माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अपिलार्थीस दि. ०७.११.२००८ रोजी व्यक्तिश: पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे,पंचशिलनगर (मंजरथ रोड), माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०५

निर्णय दिनांक २३-०४-२०१०

१ श्री. सोनाजी अन्नासाहेब घडसे, : अपिलार्थी

मु. पो. शेलापुरी (नवीन वसाहत), ता. माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, शेलापुरी , ता. माजलगांव, जि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी

गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, माजलगांव, जि. बीड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या ग्रामपंचायतीविषयी एकूण ७ मुद्यांद्वारे व्यापक व्याप्ती असलेली माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागविली असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक हे अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक २७-०२-२००९ रोजी देण्यासाठी गेले असता, अपिलार्थीने ही माहिती घेण्याचे नाकारले. याबाबतचा पंचनामा ग्रामसेवकाने दिनांक ०२-०४-२००९ रोजी केला. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०३-२००९ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०३-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर दिनांक ३०-०३-२००९ रोजी ग्रामसेवकाने ही माहिती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. तथापि माहिती स्वीकारण्यास अपिलार्थीने नकार देऊन आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी माहिती देऊ केली असता अपिलार्थीने माहिती नाकारली. या घटनेचा त्यांनी दिनांक ०२-०४-२००९ रोजी पंचनामा केला आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती स्वीकृत केल्याचे नाकारल्याने त्यांनी दिनांक ३०-०३-२००९ रोजी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविली असताना देखील अपिलार्थीने सदर टपाल न स्वीकारता आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात कधीही स्वतःहून उपस्थित झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००९ रोजी तयार करुन ठेवली आहे, इतपत आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन सिध्द होत आहे. जर अपिलार्थीने दिनांक २७-०२-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे नाकारले होते तर संबंधित ग्रामसेवकाने दिनांक २७-०२-२००९ रोजीच पंचनामा करुन या घटनेची नोंद त्यांच्याकडील अभिलेख्यावर घेणे गरजेचे होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती न केल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००९ रोजी माहिती देऊ केली होती, हा त्यांचा युक्तिवाद आयोग अमान्य करीत आहे. त्याचबरोबर या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत, ही बाब जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगाच्या लक्षात आणून दिली आहे. तथापि या नंतर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेल्या दिवशीच संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीस दिनांक ३०-०३-२००९ रोजी माहिती रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. तथापि संबंधित पोस्टमनच्या "मुदतीत स्वीकारली नाही परत" या अभिप्रायासह संबंधित टपाल जन माहिती अधिकाऱ्यास प्राप्त झाले आहे. यावरुन या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठवूनही ती त्यांनी स्वीकारली नसल्याचे सप्रमाण सिध्द होत आहे. सबब जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०२-२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती, त्यांनी अपिलार्थीस संबंधित ग्रामसेवक तथा जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत त्यांच्या कार्यालयामध्ये दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य हस्तांतरित करावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात त्यांना हव्या असलेल्या नमुना नंबर १० च्या

प्रतीकरिता अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु. २ या प्रमाणे शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करावा लागेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ मधील नमुना नं १० च्या रजिस्टरच्या प्रती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत दोन साक्षीदारांच्या उपस्थित विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सोनाजी अन्नासाहेब घडसे, मु. पो. शेलापुरी (नवीन वसाहत), ता. माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, शेलापुरी, ता. माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगांव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/८०७

निर्णय दिनांक २३-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील,<br>रा. लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड, शाहुनगर, बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>सचिव, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त, बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलाची सुनावणी संबंधितांनी मुदतीत न घेतल्यामुळे व तसेच त्यांना जन माहिती अधिकाऱ्याने अयोग्य व अपुरी माहिती पुरविल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या संस्थेच्या दिनांक ०१-०४-२००३ ते ३१-१२-२००८ या कालावधीमध्ये झालेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीच्या सूचना पत्राच्या नकला, या बैठकीच्या इतिवृत्ताच्या नकला, सर्वसाधारण सभेच्या सूचना पत्राच्या व इतिवृत्ताच्या नकला आणि मागील ३ वर्षाच्या ऑडीट बॅलेन्सशिटच्या नकला, अशी माहिती टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष या नात्याने त्यांच्याकडेच उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस अवगत केले व अपिलार्थीस ही बाब माहिती असूनही त्यांनी खोटा अर्ज माहितीच्या अधिकाराखाली पाठविला असल्याचे अपिलार्थीस ज्ञात केले व या पत्रासोबत त्यांनी संस्थेचा तीन वर्षाचा ताळेबंद संस्थेच्या लेखापरिक्षकाकडून प्राप्त करुन घेऊन ताळेबंदच्या प्रती अपिलार्थीस दिल्या. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांच्याकडे या संदर्भात दिनांक २६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजी सुनावणी ठेवली असता सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर राहिल्याने ते अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय देऊ शकले नाहीत. मात्र यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

सर्व संबंधितांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. सर्व संबंधितांनी वस्तुस्थितीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, बीड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संस्थेच्या संदर्भात काही माहिती एकूण ६ मुद्यांद्वारे मागितली होती. यापैकी एका मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०७-०२-२००९ रोजी पुरविली गेली आहे. परंतु उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे, त्यांना ती पुरविता आली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०७-०२-२००९ रोजीच्या

पत्रावरुन असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती ही, माहितीशी संबंधित अभिलेखे हे अपिलार्थीने ते या संस्थेचे अध्यक्ष असताना त्यांच्या स्वतःकडे अनधिकृतरित्या ठेवले होते. अपिलार्थीने नंतर नियुक्त झालेल्या अध्यक्षांना हे अभिलेखे हस्तांतरित केले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकत नाही. या प्रकरणी निर्णय देण्यापूर्वी, मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने मुख्य विश्वस्त श्री. गोविंद रामानंद समर्थ सद्‌गूरु प्रल्हाद महाराज, रामदासी संस्थान साखरखेर्डा, जि. बुलढाणा विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांच्या संदर्भात रिट याचिका क्रमांक ५२९४/२००८ दिनांक २८-०४-२००९ रोजी दिलेला निर्णय विचारात घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने त्यांचे अभिप्राय खालीलप्रमाणे दिले आहेत.

".............. It is, therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the Public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. ................If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचे वरील अभिप्राय पाहता, मूळात अपिलार्थीने या प्रकरणी ज्या संस्थेकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीची मागणी केली आहे, त्या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी लागू होत नाहीत, असे दिसून येत आहे. तसेच या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने या संस्थेच्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे

दिनांक २६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले आहे. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे एकाच प्राधिकरणाशी संबंधित असणे अनिवार्य आहे. या प्रकरणी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, बीड व सहायक धर्मादाय आयुक्त यांचे प्राधिकरण एकच व सामाईक नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्ताच्याकडे केलेला त्यांचा प्रथम अपील अर्ज हा अवैध असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस जर या संस्थेसंदर्भात काही माहिती हवी असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय, बीड यांच्याकडून, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अथवा इतर कायद्यातील प्रचलित तरतुदीनुसार प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बलभीम लक्ष्मणराव जाहेर पाटील, लक्ष्मण व्हिला, पांगरी रोड, शाहुनगर, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, बीड यांना या निकाल-पत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१२

निर्णय दिनांक २३-०४-२०१०

१ श्री. पांढरपोटे ज्योतिराम सर्जेराव, : अपिलार्थी
मु. पो. शेलापुरी (नवीन वसाहत), ता. माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग माजलगाव,
जि.बीड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अंबाजोगाई, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम असल्याने त्यांचे प्रथम अपील फेटाळले असल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ३१ मार्च २००७ ते ३० एप्रिल २००८ व

३१ मार्च २००८ ते १२-०१-२००९ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालयाने केलेल्या विकास कामासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००९ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील, त्यांनी मागणी केलेली माहिती "विस्तृत प्रमाणावर असल्यामुळे माहिती देण्याचा नेमका बोध होत नाही" या कारणावरुन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी त्यांच्या युक्तिवादामध्ये कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे, त्यांना माहिती देण्यात आली नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका विशिष्ट कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या कामासंदर्भात एकूण ६ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम नसून ती विशिष्ट स्वरुपाची अशी आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप जन माहिती अधिकारी म्हणतात त्या प्रमाणे मोठे व मोघम असल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत

आहे.  अपिलार्थीने या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिश: माहिती मागविली असल्यामुळे, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी गेले होते, याचा पुरावा अपिलार्थीकडे उपलब्ध असल्यास तो पुरावा सादर करण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले असता, अपिलार्थीने ते जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे स्वत: हजर राहिल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे.  या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी असा खुलासा केला आहे की, सुनावणीची वेळ ११.०० वाजता ठेवण्यात आली होती.  तथापि सुनावणीची वेळ टळून गेल्यानंतर अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात हजर झाले. यावर अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दुपारी १२.०० वाजता हजर राहिले असता त्यावेळी जन अपिलीय अधिकारी दुपारी १२.०० वाजेपर्यंत त्यांच्या कार्यालयात उपस्थित नव्हते व त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये अपिलार्थी हजर नव्हते हे असत्य विधान नोंदविलेले आहे.  यावरुन जरी अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सुनावणीसाठी वेळेत हजर होते किंवा कसे हा मुद्दा जर बाजूला ठेवला तर त्यांनी, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात संपर्क साधल्याचे सिध्द होत आहे.  त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य देय होत आहे.  सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिश: उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१.  अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांढरपोटे ज्योतिराम सर्जेराव, मु. पो. शेलापुरी (नवीन वसाहत), ता. माजलगांव, जि. बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, माजलगाव, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१३
निर्णय दिनांक २३-०४-२०१०

१ श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी
मु. जानापुरी, पो. वडेपुरी, ता. लोहा, जि. नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा,
जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षात : जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०३-२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती आणि अपिलीय अधिकारी उपस्थित आणि अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०३-०४-२०१० रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती

प्राप्त झाली आहे व याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विचाराधीन द्वितीय अपील क्रमांक ९१३/२००९ ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या अर्जामध्ये अखेरीस अपिलार्थीने सदर अपील रद्द करण्यात यावे, अशी विनंती आयोगास केलेली आहे.

अपिलार्थीच्या या पत्राचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नसल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ९१३/२००९, दिनांक ०६-०३-२००९ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी, ता. लोहा, जि. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१४

निर्णय दिनांक २३-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा,<br>जिल्हा परभणी | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अपर कोषागार अधिकारी,<br>जिल्हा कोषागार कार्यालय, परभणी | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा कोषागार अधिकारी,<br>जिल्हा कोषागार कार्यालय, परभणी | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्यामुळे, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयास जिल्ह्यातील तालुका कृषि अधिका-यांनी एप्रिल २००७ ते

मार्च २००८ या कालावधीमध्ये कोणकोणत्या योजनेची देयके त्यांच्याकडे सादर केली त्या योजनांची नावे मंजूरी दिलेल्या रकमेसह, अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीमध्ये कर्मचा-यांच्या पगाराच्या देयकाशिवाय त्यांना ही माहिती अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे जिल्हा कोषागार कार्यालयाने अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीनुसार जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी पाठविला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदा-मध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या माहितीची मागणी केली आहे ती माहिती, त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसते. वेगवेगळ्या शासकीय यंत्रणांकडून त्यांच्या कार्यालयात सादर करण्यात आलेली देयके मूळ स्वरुपात ते महालेखापालाकडे दरमहा पाठवित असतात, तथापि प्रत्येक कार्यालयाची महालेखापाल कार्यालयाकडे पाठविलेल्या बिलाची सूची त्यांच्याकडे उपलब्ध असते. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे योजनानिहाय माहिती मागविली आहे आणि त्यांच्या कार्यालयात योजनानिहाय माहिती ठेवत

नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पुरविणे शक्य झाले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये अपर कोषागार अधिकारी, परभणी यांच्याकडे, जिल्ह्यातील तालुका कृषि अधिका-यांनी जिल्हा कोषागार कार्यालयामध्ये सादर केलेल्या देयकाच्या योजना आणि मंजूर केलेल्या रकमा अशा दोन वेगवेगळ्या मुद्दयावर माहिती मागविली असल्याचे दिसून येत आहे. योजनांची नावे जिल्हा कोषागार कार्यालयात असणे, जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादामध्ये वर स्पष्ट केलेली कोषागार कार्यालयाची कार्यपध्दती पाहता, संभवत नाही, परंतु तालुका कृषि अधिकारी कार्यालयाच्या बिलांना मंजूरी दिलेल्या रकमेचा तपशील, जिल्हा कोषागार अधिका-याकडे असणे अनिवार्य आहे. सबब, अपर कोषागार अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील मागणी केलेली, तालुका कृषि अधिकारी कार्यालयांनी एप्रिल २००७ ते मार्च २००८ या कालावधीमधील त्यांच्याकडे सादर केलेल्या देयकातील त्यांनी मंजूरी दिलेल्या रकमेची माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. उर्वरित माहितीकरिता अपिलार्थीस आता महालेखापाल कार्यालयाशी संपर्क साधावा लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील माहिती मागविली असताना देखील, त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे अपिलार्थीचा माहितीसाठी-चा मूळ अर्ज जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, परभणी यांना अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्यासाठी पाठविण्याची त्यांची कृती चुकीची आहे. या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील योजनांच्या नावासंदर्भातील मुद्दयावर अपिलार्थीचा अर्ज जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्या-कडे पाठविणे गरजेचे असताना त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांचा अर्ज जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे पाठविला, ही त्यामध्ये

झालेली चूक आहे, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. इत:पर त्यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळून, त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जावर अर्जदारास जास्तीत जास्त माहिती कशी देता येईल असे पहावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील एप्रिल २००७ ते मार्च २००८ या कालावधीतील तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातील मंजूर देयकाप्रीत्यर्थ त्यांना दिलेल्या रकमेची, कार्यालयासह यादी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा अपर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, परभणी परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/९१५

निर्णय दिनांक २३-०४-२०१०

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश बाबुराव खंडाळे,<br>सायली निवास, भिमनगर, कळंब, तालुका कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग,<br>लातूर | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २३-०१-२००९ पर्यंत माहिती पुरविण्यासाठी उपसंचालकांनी आदेश देऊनही, त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५-०६ ते २००८-०९ या कालावधीतील काही माहिती एकूण ९ मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०२-२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी, त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०६-०२-२०१० रोजी व तदनंतर दिनांक ०६-०३-२०१० व दिनांक २२-०४-२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ ते ८ शी संबंधित माहिती त्यांच्या विभागाच्या उपसंचालकांच्याकडे असून, ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, त्यामुळे ज्या मुद्यांवरील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे ती माहिती, त्यांनी अपिलार्थीस या पत्रांव्दारे पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्यानंतर आवश्यक ती माहिती पुरविली आहे, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन केले

असता, त्यामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील बरीच माहिती उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे. विशेषत: अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ ते ८ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देताना सदरचे अभिलेखे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अनुपलब्ध आहेत, असे त्यांनी अपिलार्थीस अवगत केले आहे. अपिलार्थीस अशा प्रकारे माहिती देण्याची पध्दत, ही अधिनियमातील तरतुदीस धरुन नाही. जर ही माहिती संचालक कार्यालयाकडे उपलब्ध होती तर, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्रथमत: प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसाच्या आत त्या अर्जाची प्रत संचालक कार्यालयाकडे पाठवून, त्या पत्राची प्रत अपिलार्थीस देणे त्यांना या प्रकरणी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे अनिवार्य होते, तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही त्यांनी केली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, या प्रकरणी तत्कालीन जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड, श्री. अशोक गिरी यांनी केलेल्या कथित अपहार प्रकरणी पोलिसांनी त्यांच्या कार्यालयाचे बरेच अभिलेखे जप्त केले असून, या अभिलेख्यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती असण्याची शक्यता आहे. ही वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो त्यांना द्यावयाच्या राहिलेल्या माहितीशी संबंधित अभिलेख्यांचा शोध त्यांच्या कार्यालयात, उप संचालक व संचालक कार्यालयात घेऊन, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अद्यापपावेतो त्यांना द्यावयाची उर्वरित माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, संबंधित जन माहिती अधिकारी श्री. अशोक गिरी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना, संबंधित जन माहिती अधिकारी श्री. अशोक गिरी, यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रकाश बाबुराव खंडाळे, सायली निवास, भिमनगर, कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/११२१

निर्णय दिनांक २३-०४-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती कमरुन्नीसा बेगम शेख मोहोयोद्दीन,<br>रा. जिगर गल्ली, किल्ला रोड, दरबार मस्जिदजवळ,<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव,<br>तालुका नायगांव, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नायगांव, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : तहसीलदार, नायगांव, जिल्हा नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत दिनांक १६-०९-२००८ रोजी तहसीलदार, नायगांव यांच्याकडे माहितीची मागणी केली असता त्यांनी, ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत न पुरविल्यामुळे त्यांनी जिल्हाधिका-याकडे, अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले असता,

जिल्हाधिका-याने यावर कोणताही निर्णय न दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगा-कडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष ' श्री. शेख मोहीयोद्दीन पेशकार हे आपल्या कार्यालयात होते त्यांच्या सेवापुस्तिकाबाबत व त्यांच्या कायमच्या पत्त्याबाबत लेखी माहिती ' अशी माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदरचा अपील अर्ज जिल्हाधिकारी, नांदेड यांना उद्देशून केला होता. त्यांच्या या प्रकरणी तहसीलदार, नायगांव हे अपिलीय अधिकारी असल्यामुळे त्यांनी तो अपील अर्ज तहसीलदार, नायगांव यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर तहसीलदार, नायगांव यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-१२-२००८ रोजीच्या पत्रादारे आवश्यक ती माहिती टपालाव्दारे पुरविली, तथापि माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून, अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेले विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-०४-२०१० रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर व जन माहिती अधिकारी आणि अपर जिल्हाधिकारी, नांदेड, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी टपालाव्दारे अपिलार्थीस दिनांक ०८-१२-२००८ रोजी पुरविली आहे. त्यांच्या या विधानापुष्ट्यर्थ त्यांनी आवश्यक ते पुरावे आयोगास सादर केले आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने पुढे आयोगास असे अवगत केले की, ज्यावेळी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षासंदर्भात

माहिती मागितली होती त्यावेळी त्रयस्थ पक्ष सेवेतून निलंबीत झाले होते व त्यांनी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे त्यांची सेवापुस्तिका आवश्यक त्या नोंदी घेण्यापुष्ट्यर्थ पाठविली होती. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना थोडा विलंब लागला, हा विलंब त्यांनी हेतुपुरस्सर अथवा अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळण्याच्या दृष्टीने लावलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येत आहे की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील त्रयस्थ पक्षाच्या ' सेवापुस्तिका-बाबत ' या मुद्दयावर मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. ' सेवापुस्तिकेबाबत ' म्हणजे नेमकी कोणत्या मुद्दयावर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ' त्यांचा कायमचा पत्ता ' या मुद्दयावरील माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होते. अपिलार्थीने मागणी केलेली या मुद्दयावरील माहिती ही जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी, तिचे स्वरुप सार्वजनिक असल्यामुळे ती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षास कोणताही प्रत्यावाय नसावा. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीपैकी काही भाग मोघम स्वरुपाचा असूनही तहसीलदार, नायगांव यांनी त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेच्या प्रथम पृष्ठाची प्रत, ज्यामध्ये त्रयस्थ पक्षाचा कायमचा पत्ता आहे ती अपिलार्थीस दिनंक ०८-१२-२००८ रोजी टपालाव्दारे पाठवून दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस टपालाने माहिती पाठवून दिल्याचा आवश्यक तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे, हे पाहता, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना देय असलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे मिळाली असावी असे अनुमान, विशेषतः त्यांच्या आजच्या अनुपस्थितीवरुन काढण्यास हरकत नाही. सबब, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविली

गेल्यामुळे, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २३-०४-२०१०** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ कमरुन्नीसा बेगम शेख मोहोयोद्दीन, रा. जिगार गल्ली, किल्ला रोड, दरबार मजीद जवळ, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नायगांव, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४ निर्णय नस्ती.